Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४१५
23५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठी रियासत

१ शहाजी

गो.स.सरदेसाई

८९ म/२३६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओ३म्

पुस्तक संख्या...... 232

पञ्जिका संख्या...... २८८४६

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई सज्जन पन्द्रह दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

28697

CHECKED 1973

डाक प्रमाणीकरण १९८४-१९८५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

A History of Modern India

IN THREE PARTS

Mussalmani, Marathi & British Riyasats

II

Marathi Riyasat

1 LIFE OF SHAHAJI

BY

Govind Sakharam Sardesai, B. A.

Publisher

Keshav Bhikaji Dhawale,

Shri Samarth Sadan, Benam Hall Lane,

Girgaon, Bombay

1935

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

A History of Modern India

IN THREE PARTS

Mussalmani, Marathi & British Riyasats

II

Marathi Riyasat

1 LIFE OF SHAHAJI

BY

Govind Sakharam Sardesai, B. A.

Publisher
Keshav Bhikaji Dhawale,
Shri Samarth Sadan, Benam Hall Lane,
Girgaon, Bombay

1935

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रीसमर्थ सदन-प्रकाशन

३

मराठी रियासत

१ शहाजी राजे भोसले

पुस्तक सं०................
आगत सं०...............
दिनांक.................
गुरुकुल ... कांगडी.

गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए.

प्रकाशक

केशव भिकाजी ढवळे,

श्रीसमर्थ सदन, बनाम हॉल लेन, गिरगांव, मुंबई.

१९३५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकाशक :
केशव भिकाजी ढवळे,
गिरगांव, मुंबई.

किंमत ८ आणे

मुद्रक :
एस्. व्ही. परुळेकर,
मुंबईवैभव प्रेस, मुंबई.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्रो जनपदस्तदानींतत्समाश्रयात्
अन्वर्थतामन्वभवत् समृद्धजनतान्वितः ॥
शि. भा. १०-३२

*　　*　　*

सुविक्रान्तस्य नृपतेः सर्वमेव महीतलम् ।
शि. भा. १६-४५

*　　*　　*

"It is evident that there is no quality upon which the success of a nation so much depends as upon its courage. No nation can rise to a high place without being brave; it cannot maintain its independence even; and cannot push forward upon any path of life without courage. Nations that are cowards must fail."

—D. G. E. Hall
(The Soul of the People)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

	प्रस्तावना	६
	साधन-ग्रंथांचें विवेचन	११
१	सगाईचा दावा	१७
२	तारुण्याची सळसळ	२८
३	चहूंकडून कोंडमारा	४०
४	'इत साहजी हैं, उत साहजहां'	५२
५	इकडे आड, तिकडे विहीर	६१
६	बेलरोटीवर शपथा	७०
७	अखेरची पुण्याई	७७
	सूची	८९

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्र स्ता व ना

मराठी रियासतीच्या पहिल्या भागाची प्रथमावृत्ति सन १९०१ मध्यें व द्वितीयावृत्ति सन १९१५ सालीं प्रसिद्ध झाली. त्यानंतर पेशवाई कालाचे भाग तयार होऊन पहिलें संकलित कार्य नुकतेंच सन १९३२ त समाप्त झालें. एवढ्या दीर्घ कालांत मराठ्यांच्या इतिहासाचीं पुष्कळच नवीन साधनें उपलब्ध होऊन तो सर्व प्रबंध पुनः लिहिण्याची आवश्यकता वाटूं लागली. शिवाय महाराष्ट्रांत त्रिशत सांवत्सरिक शिवोत्सव दोनदां झाले, त्या निमित्तानें शिवकालीन इतिहासांतील नानाविध प्रसंगांचें भरपूर विवेचन होऊन पूर्वींच्या संशयित बाबती पुष्कळशा निश्चित झाल्या. इंग्रजी, फ्रेंच, पोर्तुगीझ, डच वगैरे युरोपियन भाषांतील माहिती बाहेर आल्यानें काल, स्थल, व्यक्ती इत्यादींचे तपशील यथाक्रम ठरविण्यास साधन झालें; आणि सन १९३३ सालीं पेशवे दप्तराच्या कामांतून मोकळा होतांच मी या रियासती पुनः लिहिण्याचें काम हातीं घेतलें.

सुरुवातीसच मुख्य प्रकार नजरेस आला तो असा कीं, गेल्या दहा वीस वर्षांतील चर्चेनें इतिहासाभ्यासाची उत्कटता फारच वाढली आहे; नवीन माहितीनें पुष्कळ घडामोडींचें स्वरूप निर्णीत करितां येऊन कित्येक विषय जे पूर्वीं इतिहास या सामान्य नांवाखालीं मोडत, ते आतां स्वतंत्र अभ्यासाचे विषय बनले, तेणेंकरून मुख्य विषयास सुटसुटित स्वरूप आलें आहे. चौतीस वर्षांपूर्वीं मराठी रियासतीचा पहिला भाग मीं प्रसिद्ध केला, तेव्हां मराठी भाषा व तिचे उगम, महाराष्ट्राची भू-रचना व वसाहत, मराठे व त्यांची उत्पत्ति, कवि व संत यांची कामगिरी, शिवपूर्वकालीन धार्मिक व इतर घडामोडी अशा अनेक विषयांचा अंतर्भाव मला या इतिहासांत करावा लागला होता. पण हे विषय आतां विशिष्ट अभ्यासकांच्या क्षेत्रांत गेले आहेत. रामदासी वाङ्मय व समर्थांचें कार्य हा विषय सुद्धां आतां स्वतंत्र अभ्यासकांनीं हातीं घेतला आहे. अर्थात् एकाच व्यक्तीनें अनेक विषयांवर पाहिजे तशी लेखणी चालविण्याचे दिवस निघून गेले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असून, त्यांचे स्वतंत्र उपासक निर्माण झाल्यामुळें पूर्वींच्या आवृत्तींतले हे भाग मी आतां कमी केले आहेत.

इतकें करूनही पुढें मुख्य भाग लिहूं लागल्यावर जुनी प्रत हातीं घेतली तेव्हां असें दृष्टोत्पत्तीस आलें कीं, निव्वळ साधनांच्या चर्चात्मक लिखाणानें अनवश्यक मजकूर वाढून पुष्कळ जागा अडून गेली होती. म्हणून शिवाजीच्या चरित्राचा हा बाह्य फुगीरपणा काढून टाकल्यास तें आतां दोनतीनशें पानांच्या लहान साच्यांत व्यवस्थित बसविणें शक्य आहे. ही पद्धत स्वीकारतांच पूर्वींचीं पानें भराभर कमी होऊन सर्व विषय पुनः लिहून काढावा लागला. सबब पुनरावृत्ति हें नांव या कृतीस आतां बिलकूल लागू पडणार नाहीं. ऐतिहासिक मांडणीच्या दृष्टीनेंही एकंदर विषय जास्त शास्त्रशुद्ध व व्यवस्थित बनला आहे असें म्हणतां येईल. शिवकालीन घडामोडींचा पूर्वींचा विस्तार पुष्कळसा काल्पनिक व भरमसाट विधानांनीं भरलेला होता, त्या ऐवजीं त्यास आतां शुद्ध मानवी व्यवहाराचें स्वरूप प्राप्त होऊन तें इतिहासाध्ययनास पोषक व्हावें अशी सोय झाली आहे. केवळ अद्भुत व लोकोत्तर दृष्टीनें शिवाजी चरित्राकडे पाहण्याचे दिवस जाऊन कार्यकारणभावाच्या निर्देशानें ऐतिहासिक प्रसंग कसे बनले हें समजून घेणें सुलभ झालें आहे. मुख्यतः शिवपूर्वकालीन भागांत अवास्तव मुद्द्यांची गुंतागुंत एवढी वाढली होती कीं, तींतून निश्चित असें कांहींच दाखवितां येत नव्हतें. परंतु दक्षिणेंतील विजयनगरचें साम्राज्य व उत्तरेंतील मोगल बादशाही यांचें स्वरूप अलीकडील संशोधनानें सिद्ध होऊन पूर्वींचे अपसिद्धान्त निरास पावल्यामुळें शहाजीची व त्याच्या पूर्वजांची चरित्ररेखा ठरवितां येते. सारांश, अनेकांच्या परिश्रमानें एकंदर मराठशाहीचा संपूर्ण व साधार इतिहास पूर्वींचा पाल्हाळ गाळून अवश्य तेवढ्या तपशिलानें आतां व्यवस्थित मांडतां येतो. तथापि संशोधन सारखें वाढतच आहे; आणि इतउत्तरही अनेक नवीन बाबती बाहेर येण्याचा संभव असल्यामुळें, पुढील अभ्यासाची सोय होऊन सामान्य वाचकांनाही पुस्तक उपयुक्त व्हावें अशी याची योजना बनविली आहे. शिवकालीन भागाचें हें काम हातावेगळें होतांच पेशवेकालीन भागही याच धर्तीवर पुनः लिहून प्रसिद्ध करण्याचा माझा विचार आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पूर्वींची ग्रंथरचनाही हल्लीं अनेक कारणांस्तव बदलली आहे. आठशें पानांचा एक मोठा ग्रंथ भारी किंमतीस विकत घेणें पुष्कळांना शक्य नसतें. शिवाय कित्येकांस सर्व ग्रंथाची जरूर नसून त्यांतील कांहीं भागच चरित्ररूपानें पाहिजे असतात. तसेंच प्रकाशकांनाही लहान लहान भाग थोड्या किंमतींत देणें सोयीचें पडतें. शिवाय अलीकडे निरनिराळे इतिहास चरित्ररूपानें लिहून चित्ताकर्षक करण्याची चालही विशेष प्रचारांत येत आहे. अशा कित्येक गोष्टी लक्षांत घेऊन शहाजी, शिवाजी, संभाजी, राजाराम व ताराबाई, अशा चार भागांत मराठ्यांचा पूर्व वृत्तांत हल्लीं प्रसिद्ध करावयाचा असून हे भाग एकदम किंवा स्वतंत्र पाहिजे तसे ग्राहकांस मिळावे अशी योजना ठरविली आहे. विषयप्रतिपादनांत देखील त्या त्या व्यक्तींच्या चरित्राच्या दृष्टीनें योग्य ते फेरफार केले असून, एकंदर इतिहासाची हानि होऊं नये व विषय तर कंटाळवाणा वाटूं नये अशी मांडणी केली आहे. अशाच प्रकारें मराठशाहीचा सर्व इतिहास चरित्ररूपांत प्रसिद्ध करावा असा माझा विचार आहे. म्हणजे माझा पहिला संकल्प हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास ठोकळ मानानें इ. स. १००० पासून प्रस्तुत कालापर्यंत सांगण्याचा होता तो कायम आहे. मुसलमानी, मराठी, व ब्रिटिश रियासत असे जे त्याचे मूळचे तीन भाग, त्यांपैकीं मुसलमानी रियासत पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा दोन पुस्तकांत पुरी झाली आहे. ही मराठी रियासत आतां पुनः निरनिराळ्या भागांत वाचकांपुढें येत आहे. ब्रिटिश रियासतीचा पूर्वार्ध प्रसिद्ध झाला असून उत्तरार्ध अद्यापि संकल्पांत आहे. अशी ही एकंदर विषयाची विभागणी सोयीसाठीं केली आहे.

तथापि प्रस्तुत चरित्रांत वादग्रस्त मुद्दे नाहींत असें नाहीं. पण सांप्रदायिक अभिनिवेशाच्या भरीस पडून केवळ काल्पनिक विवेचनें करण्यांत येतात तीं शक्य तितकीं टाळलीं आहेत. उपलब्ध साधनांचा निर्देश मात्र भरपूर केला असून त्यांवरून सत्य ठरविणें हें काम ज्यानें त्यानें आपल्या मगदुराप्रमाणें करावें, असें मला वाटतें; आणि माझ्या लिखाणाचा एवढा उपयोग झाला तरी मला त्यांत समाधान आहे. ह्यापेक्षां अधिक आकांक्षा मी धरली नाहीं.

कामशेत,
ता. २४ फेब्रुआरी, १९३५ } गो. स. सरदेसाई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साधन-ग्रंथांचें विवेचन

शिवकालीन साधन-ग्रंथांची चिकित्सा आजपावेतों अनेक विद्वान लेखकांनीं भरपूर केलेली असल्यामुळें तिचें विस्तृत विवेचन करण्याची आतां बिलकूल जरूर नाहीं. म्हणून विद्यार्थ्यांना कांहीं थोडें मार्गदर्शन करण्यापुरतीच प्रमुख ग्रंथांची नांवनिशी व त्यांचें अल्प वर्णन पुढें दिलें आहे. फारसी, मराठी, संस्कृत व हिंदी या एतद्देशीय भाषांत व इंग्रजी, फ्रेंच, पोर्तुगीझ व डच या युरोपियन भाषांत शिवकालीन इतिहासाचें साहित्य उपलब्ध आहे. पैकीं फारसी व मराठी या भाषांतील लिखाणें बहुशः मुसलमान व हिंदु लेखकांचीं असल्यामुळें त्यांत त्यांची विशिष्ट भावना उतरलेली आढळेल. संस्कृत लेखकही शिवाजीची प्रशंसा करणारे व भावनाप्रधानच समजले पाहिजेत. खरें म्हटलें तर सर्वच इतिहासांत लेखकांच्या भावना उतरतात; आणि मनुष्यबुद्धि ही सर्वथैव निर्विकार असणें शक्य नसल्यामुळें त्यांत वैयक्तिक मतें प्रतिबिंबित दिसतात यांत संशय नाहीं. म्हणून कोणत्याही जुन्या कागदाची योग्यता ठरवितांना लेखकाची मनोभावना लक्षांत ध्यावी लागते. या दृष्टीनें पाहिल्यास, शिवाजीसंबंधानें इंग्रज, फ्रेंच वगैरे लेखकांची मनोवृत्ति बरीचशी तटस्थ मानतां येईल. कारण सतराव्या शतकांत हे युरोपियन हिंदुस्थानांत केवळ व्यापाराच्या उद्देशानें वावरत असल्यामुळें, त्यांचा स्वार्थ नसेल तेव्हां, हिंदु व मुसलमान दोनही सत्ताधीश त्यांस सारखेच वाटत. सबब त्यांनीं आपापल्या वरिष्ठांकडे लिहून पाठविलेल्या येथील घडामोडींच्या हकीकती, प्रत्यंतर पुरावा म्हणून विशेष महत्त्वाच्या मानल्या पाहिजेत. वखारींचा पत्रव्यवहार (फॅक्टरी रेकॉर्ड्स्) आतां मुबलक छापला असून शिवकालीन इतिहासास त्यांचा फार मोठा उपयोग आहे. म्हणून खालील यादींतील *English Records on Shivaji* व डॉ॰ सुरेंद्रनाथ सेन यांचे दोन ग्रंथ, *Foreign Records on Shivaji* व *Historical Records of Goa* यांचा उपयोग विशेष होईल. डॉ. बाळकृष्ण यांनीं शिवाजी चरित्राचे दोन भाग इंग्रजींत काढले आहेत, त्यांत बहुधा वरील वखारींचा पत्रव्यवहारच उद्धृत केला आहे. ग्रँट डफचा इतिहास पूर्वी आधारभूत मानला जात असे, पण अलीकडील संशोधनानें तो आतां मागें पडला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. बनारसी प्रसाद सक्सेना यांचा शहाजहान बादशहाचा इतिहास नवीन संशोधनानें तयार केलेला शहाजीचे चरित्रास विशेष लागू आहे. सर जदुनाथ सरकारांचें शिवाजी चरित्र व औरंगजेबाचा इतिहास या दोन पुस्तकांशिवाय मराठ्यांचा इतिहास बिलकूल उभा राहूं शकणार नाहीं. त्यांचीं मतें व अभिप्राय यांजबद्दल मतभेद होणें शक्य आहे; पण काल, स्थल, व्यक्ति इत्यादिकांचे परिश्रमपूर्वक एकत्र केलेले भरपूर तपशील दुसरीकडे कोठेंही आढळणार नाहींत. संभाजी व राजाराम यांचा इतिहास तर त्यांनींच बहुतेक निश्चित रूपांत मांडला आहे असें म्हणणें अत्युक्त नाहीं.

अन्यभाषीय सामुग्रीसंबंधानें इतकें सांगितल्यावर आतां मराठींतील साधनांचा विचार करूं. कोणत्याही सामान्य वर्णनापेक्षां तत्कालीन पत्रें हाच इतिहासाचा मुख्य आधार होय. अशा दृष्टीनें शिवकालीन पत्रव्यवहाराचे सुमारें १३ भाग वरील यादींत नमूद असूनही त्यांत प्रत्यक्ष शिवाजीचा भाग फारच अल्प आहे. मात्र तत्कालीन परिस्थिति समजण्यास अशा कागदांचा कांहीं थोडा उपयोग होतो. मुधोळचीं फर्मानें व बखर नुकतीच प्रसिद्ध झाली, तेणेंकरून भोसले व घोरपडे यांची उत्पत्ति मूलतः सिसोदे राजपूत घराण्यांतून झाली ही गोष्ट सिद्ध आहे. 'पत्रसार-संग्रहानें एकंदर शिवकालीन कागदांचें एकीकरण झालें तें अभ्यासकांस विशेष सोयीचें वाटेल. जेध्यांची व इतर शकावल्या या तर इतिहासाचा मुख्य गाभाच म्हणतां येतील. त्यांतल्या त्यांत जेधे शकावलि व शिवभारत हीं दोनही प्रकरणें एकाच मूळ आधारावर रचिलेलीं असून शिवभारतांतील काव्य वजा केलें तर, शकावलींतील विधानेंच तेवढीं शिल्लक राहतील. तंजावरचा शिलालेखही त्याच आधारावर पण अगदीं अलीकडे रचला असला तरी तो सर्वथा त्याज्य मानतां येणार नाहीं. पारसनीस-मावजींनीं छापलेलीं सनदापत्रें व कैफियती आणि अमात्यांची राजनीति हीं प्रकरणें शिवाजीचा राज्यकारभार समजण्यास विशेष उपयोगी आहेत. पेशवेदप्तराच्या प्रकरणांपैकीं भाग ३१ यांत कांहीं शिवकालीन कागद आहेत.

बखरींविषयीं आज पावेतों पुष्कळ खल होऊन गेला आहे. नुसत्या रचना-कालावरून त्यांचें महत्त्व मापणें धोक्याचें होईल. बखरींत पुष्कळदा बऱ्याचशा भाकडकथा असूनही लेखकाच्या माहितीप्रमाणें त्यांत कांहीं अंश खरे अस्सलही निघूं शकतात. म्हणून या बखरी सर्वथा त्याज्यही नाहींत व सर्वथा ग्राह्यही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहींत. म्हणजे फिरून त्यांच्या खरेपणाची कसोटी प्रत्यंतर पुराव्यावर व लेखकांच्या भावनेवरच अवलंबून राहणार. रा. वाकस्करांनीं छापलेल्या पांच बखरींचें मूळ आतां एकच असें ठरलें असून, त्यांपैकीं राजवाड्यांनीं प्रथम प्रकाशिलेली प्रभात बखर ही किंवा तिचा मुख्य भाग शिवाजीचा मंत्री दत्ताजीपंत वाकनीस यानें तयार केलेला अतएव बहुंशीं ग्राह्य आहे. सभासद बखर अत्यंत नेमस्त व विश्वासार्ह होय. शेडगांवकर बखरींतही कांहीं अंश फार उच्च दर्जाचा आहे. शिवदिग्विजय बखरीचें लेखन पुराणाच्या धर्तीवर वाढविलेलें आहे, तथापि तें सर्वच कांहीं अग्राह्य नाहीं. तिच्या लेखकापुढेंही अस्सल कागद होते यांत संशय नाहीं. श्रीशिवाजीप्रताप बखर ही चिटणिशी बखरीचें ऱ्हस्व स्वरूप असून चिटणीस घराण्यांतूनच झालेली दिसते. एकंदरींत शास्त्र या दृष्टीनें इतिहासाचा अभ्यास करूं इच्छिणारांनीं सर्व साहित्य काळजीपूर्वक वाचून आपापले अभिप्राय बनवावे हेंच इष्ट होय.

ENGLISH

History of Shah Jahan	—*Dr. B. P. Saksena*
Aurangzeb, *Vols.* 1 to 5	—*Sir J. N. Sarkar*
A History of the Maratha People	—*Grant Duff*
Shivaji & His times	—*Sir J. N. Sarkar*
Shivaji Souvenir	—(*Shivaji Ter–Centenary Committee 1927*)
English Records on Shivaji	—(*Bharat Itihas Samshodhak Mandal*)
Foreign Biographies of Shivaji	,,
Historical Records of Goa	—*Dr. S. N. Sen*
Shivaji the Great, *Parts* I & II	—*Dr. Balkrishna*
The Modern Review	(Sir Jadunath's articles)

फारसी, पोर्तुगीज, फ्रेंच, व डच या भाषांतील साहित्याचा निर्देश येथें केला नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सस्कृत

शिवभारत–परमानन्द कविकृत (शि. भा.).
पर्णाल–पर्वत–ग्रहणाख्यान–जयरामकृत (प. प.).
राजव्यवहारकोश, प्रशस्ति व उपसंहारसह (रा. को.).
राधामाधवविलासचंपू (रा. मा.).
शिवराज्याभिषेक कल्पतरु (त्रै. भा. इ. मं.).

मराठी

मुधोळचा इतिहास (मु. इ.) द. वि. आपटेकृत.
जेधे शकावलि (जे. श.), शिवचरित्र प्रदीप (शि. च. प्र.).
९१ कलमी बखर वगैरे पांच बखरी, वाकस्करकृत (९१ क.).
सभासदी, चिटणिसी, शेडगावी बखरी शिवाजीच्या.
शिवदिग्विजय (शि. दि.).
श्रीशिवाजीप्रताप (शि. प्र.).
तंजावरचा शिलालेख (तं. शि.).
शिवकालीन पत्रव्यवहार राजवाड्यांचे खंड, (रा. खं.).
८, ९, १५–१८, २०,२१.
शिवचरित्र साहित्य भाग १–४ (शि. च. सा.).
ऐतिहासिक संकीर्ण साहित्य (ऐ. सं. सा.).
सनदापत्रें (स. प.) मावजी व पारसनीस.
कैफियती व यादी (कै. या.) मावजी व पारसनीस.
अमात्यांची राजनीति (अ. रा.) विविधज्ञानविस्तार.
पत्रसारसंग्रह, शिवचरित्रनिबंधावली वगैरे वाङ्मय (भा. इ. मं.).
इतिहाससंग्रह पारसनीसकृत (इ. सं.).
काव्येतिहास संग्रह सानेकृत (का. सं.).
भा. इ. सं. मंडळाचे ग्रंथ (भा. इ. मं.).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठी रियासत

१ शहाजी राजे भोसले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— १ —

सगाईचा दावा

१ भोसल्यांचें दक्षिणेंत आगमन २ मालोजीचा उदय, जाधवरावाशीं सगाई ३ जहांगीर बादशहाचें दक्षिणेंत आक्रमण, रोशनगांवची लढाई

१ भोसल्यांचें दक्षिणेंत आगमन.—या भूतलावर थोर व्यक्ती कधीं काळीं निर्माण होतात आणि जगाच्या रहाटींत प्रचंड क्रांति घडवून आणितात. अशा प्रकारचें एक मोठें कार्य शिवछत्रपतींनें सिद्धीस नेलें. ह्या महत्कार्याचा अर्थ 'शककर्ता' या उपपदांत व्यक्त होतो. अशा या कालकर्त्या पुरुषाचें संकलित व संशुद्ध चरित्र लोकादरार्थ निवेदन करण्याचा उद्देश आहे. परंतु तसें चरित्र सांगण्यापूर्वी त्यांच्या वाडवडिलांची पूर्वपीठिका समजून घेणें जरूर असून तो प्रकार या शहाजीराजाच्या चरित्रांत अंतर्भूत होतो. सबब पूर्वपरिस्थितीचा हा भाग प्रथम या पुस्तकांत द्यावयाचा असल्यामुळें शिवाजीचें पितृकुल भोसले व मातृकुल जाधव यांची प्राथमिक हकीकत पहिल्यानें देऊं.

शहाजीचा जन्म भोसले कुलांत झाला. हें भोसले घराणें चितोड येथील सूर्यवंशी सिसोदे राजपुतांपासून उगम पावलें. अर्थात् हे जातितः उच्चवर्गीय क्षत्रिय होत. यादव, पवार, मोरे, सिंदे, साळुंके वगैरे अनेक राजपूत घराणीं उत्तर हिंदुस्थानांतून केव्हां तरी दक्षिणेंत येऊन राहूं लागलीं, त्यांच्याशीं पुढें भोसल्यांचे शरीरसंबंध झाले. आपण राजपूत व क्षत्रिय आहों ही त्यांची भावना सदैव कायम होती. बहुतेक क्षत्रिय मराठे व्यवहारांत आपल्या नांवांपुढें राजे हें उपपद लावितात. उदेपूरच्या सिसोदे वंशापासून आपण उदय पावलों ही भोसल्यांची भावना जुन्या कागदांत व्यक्त झालेली आढळते. खुद्द शिवाजीनें आपल्या अभिषेक-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रसंगीं व अगदीं अखेरीस सातारकर छत्रपति प्रतापसिंहानें उदेपुरास स्वतःचीं माणसें पाठवून तिकडील तपास आणिला, तो या मूळच्या भावनेस पुष्टि देतो. पंडित, कवि, लेखक, भाट, आचार्य इत्यादि प्रतिष्ठित मंडळींनीं भोसल्यांच्या क्षत्रियत्वाची ग्वाही दिलेली आढळते. भोसल्यांचे वेदोक्त संस्कार लुप्त झाले होते ते शिवाजीनें पुनः चालू केले.

मेवाडांत चितोड व सिसोदें अशीं एकाच वंशाचीं दोन राज्यें असून त्यांच्या अधिपतींना रावळ व राणा या संज्ञा होत्या. स. १३०३ सालीं दिल्लीचा सुलतान अलाउद्दीन खिलजी यानें मेवाडवर स्वारी केली आणि चितोडच्या किल्ल्यास वेढा घालून तें राज्य काबीज केलें हा प्रकार इतिहासप्रसिद्ध आहे. या संग्रामांत चितोडचा रावळ रत्नसिंह आणि त्याचे मदतीस आलेला सिसोद्याचा राणा लक्ष्मणसिंह धारातीर्थी पतन पावले. लक्ष्मणसिंहाचे सात मुलगेही त्याजबरोबरच मारले गेले. फक्त एक मुलगा अजयसिंह जिवंत राहिला तो पुढें सिसोद्याचा राणा झाला. या अजयसिंहास दोन मुलगे झाले, एक सजनसिंह § व दुसरा क्षेमसिंह. अजयसिंहानें आपल्या पश्चात् पुतण्या हमीर यास गादीचा वारस ठरविलें, त्यामुळें सजनसिंह व क्षेमसिंह अत्यंत नाराज झाले. मुसलमानांच्या आक्रमणानें सर्व प्रदेश उजाड झाला होता, अशा स्थितींत ते दोघे बंधू नशीबाची परीक्षा पहात राजपुतान्यांतून दक्षिणेंत आले (स. १३३४). त्यांच्यापासून पुढें घोरपडे व भोसले या दोन घराण्यांची उत्पत्ति झाली.

सजनसिंह व क्षेमसिंह दक्षिणेंत आले, त्यावेळीं दिल्लीस महंमद तुघ्लकाची कारकीर्द सुरू असून त्यानें दौलताबादेस राजधानी करण्याचें ठरविलें आणि पुष्कळ कुटुंबांस दक्षिणेंत आणिलें. त्यानंतर दक्षिणेंत बंडें उद्भवलीं, तीं मोडण्यासाठीं तुघ्लकानें दिल्लीहून हुसेन जाफरखान या सरदारास स.१३४५त रवाना केलें. जाफरखानास शूर व विश्वासू हस्तकांची जरूर लागली, तेव्हां सजनसिंह व त्याचा पुत्र दिलीपसिंह यांनीं त्याचें उत्कृष्ट साह्य केलें. स.१३४७ त जाफरखानानें

§ हें नांव सुजनसिंह असेंही लिहिलेलें आढळतें. मूळ हिंदींत सजणसिंह असा शब्द आहे, तो सज्जन या संस्कृत नांवाचा अपभ्रंश दिसतो. सजणा, सजणे हे शब्द जुन्या मराठींत भला गृहस्थ या अर्थानें योजलेले आढळतात. अर्थात् सजनसिंह हेंच प्रचारांतलें मूळचें रूप असावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अलाउद्दीन हें नांव धारण करून कलबुर्गा येथें बहामनी राज्याची स्थापना केली, तेव्हां सजनसिंहास त्यानें मोठी सरदारी व खर्चास दौलताबादेजवळ दहा गांवांची जागीर दिली. पुढें बहामनी राज्यांत सजनसिंहाचे कुटुंबाचा उत्कर्ष होत गेला.

सजनसिंह स. १३५२ त मरण पावला. त्याचा पांचवा वंशज उग्रसेन म्हणून होता, त्यास पुत्र दोन, वडील कर्णसिंह व धाकटा शुभकृष्ण. कर्णसिंह व त्याचा पुत्र भीमसिंह हे बहामनी वजीर महमूद गावान याजबरोबर स. १४६९ त खेळणा किल्ला जिंकण्यास गेले असतां, कर्णसिंहानें घोरपड लावून किल्ला हस्तगत केला. त्यावरून महंमदशहा बहामनीनें संतुष्ट होऊन, कर्णसिंह संग्रामांत मृत्यु पावल्यामुळें त्याचा पुत्र भीमसिंह यास 'राजा घोरपडे बहादर' हा किताब व मुधोळजवळ ८४ गांवांची नवीन जागीर नेमून दिली. तेव्हांपासून भीमसिंहाचे वंशास घोरपडे आडनांव प्राप्त होऊन त्याचें वास्तव्य मुधोळास झालें, तें अद्यापि चालू आहे. त्यांच्या या नवीन जागिरींत रायबागपासून वाईपर्यंतचा टापू व त्यांतील किल्ले मोडत होते. कर्णसिंहाचा भाऊ शुभकृष्ण हा दौलतवादेकडील वेरूळ वगैरे वतनांचा मालक होऊन त्याचे वंशास भोसले उपनांव प्राप्त झालें. या भोसले आडनांवाची उत्पत्ति निश्चित लागत नाहीं. § शुभकृष्णाचा तिसरा वंशज बाबाजी भोसले होय. यावरून लक्षांत येईल कीं, मुधोळकर घोरपडे व सातारकर भोसले हीं दोनही घराणीं एकाच सिसोदे येथील राणा वंशाच्या दोन शाखा असून घोरपडे वडील व भोसले कनिष्ट. घोरपड्यांनीं मुसलमानांच्या ताबेदारींत कृतार्थता मानिली आणि भोसल्यांनीं मुसलमानांचा पाडाव करून स्वतंत्र राज्य स्थापिलें, या कारणास्तव या दोन शाखांत भाईबंदकीचे कलह बहुधा कायमचेच चालू राहिले. †

शुभकृष्णाचा वंशज बाबाजी भोसले याचा जन्म स. १५३० चा समजतात. बाबाजीनें जमिनी वगैरे दान दिल्याचे कागद आहेत. बाबाजीचे मुलगे मालोजी व विठोजी पराक्रमी निपजले. त्यांजपासून पुढील इतिहास व्यवस्थित सांपडतो. लक्ष्मण-

§ भोसे नामक गांव किंवा भोसाजी नामक व्यक्ति यांपासून भोसले शब्द निघाला असें सांगतात तें विशेष सयुक्तिक दिसत नाहीं. तसेंच भोसल, भृशबल, भवशाल इत्यादि प्रकारचें संस्करण कवींनीं केलेलें निरनिराळ्या ग्रंथांत आढळतें. कोणी भोसले शब्द 'होयसल' नांवाचा अपभ्रंश मानितात.

† मुधोळकर घोरपडे घराण्याचा इतिहास द. वि. आपटेकृत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सिंहापासून मालोजीपर्यंत जो तीनशें वर्षांचा काळ गेला (१३००–१६००), त्यांत भोसल्यांच्या सुमारें बारा पिढ्या झाल्या. संधि मिळेल तेव्हां नोकरीपेशा स्वीकारावा, नाहीं तेव्हां शेतीभाती करून निर्वाह करावा असा त्यांचा क्रम दिसतो. त्यांनीं कित्येक गांवच्या पाटिलक्या खरेदी करून आणि वतनवाडी संभाळून गरिबीनें परंतु अब्रूनें कालक्रमणा चालविली. भोसल्यांचीं हीं वतनी गांवें औरंगाबाद, पैठण, अहंमदनगर व पुणें या टापूंत होतीं. § बहामनी राज्याच्या ज्या चार शाखा झाल्या, त्यांपैकीं या भोसले मंडळीचें वास्तव्य निजामशाहींत झालें.

२ मालोजीचा उदय, जाधवरावाशीं सगाई.—मालोजीचा जन्म स. १५५२ त झाला. तो व बंधु विठोजी वेरूळ येथें राहून संधि येईल त्याप्रमाणें निजामशाही लष्करांत नोकरी करीत. सिंदखेड येथें लखूजी जाधव नांवाचा एक प्रतिष्ठित मराठा सरदार निजामशहाचे पदरीं रहात होता, त्याचे पथकांत मालोजीला चाकरी मिळाली. तो शरीरानें धिप्पाड असून त्याचे स्वारीस घोडें टिकेना म्हणून जाधवरावानें त्यास बाहेर स्वारीस न पाठवितां आपल्या देवडीवर पहारा करण्याचें काम दिलें. दोघेही बंधू उद्योगी व निष्ठावंत होते. नाना युक्त्या करून लौकिक व पैसा मिळविण्याची त्यांनीं शिकस्त केली; आणि त्यासंबंधीं कारणेंही तशींच घडत गेलीं.

मालोजीची बायको उमाब्वा ही फलटणच्या जगपाळ निंबाळकराची बहीण असून तिला बरेच दिवस मूल होत नव्हतें. अहंमदनगरजवळ शहाशरीफ म्हणून एक मुसलमान सिद्ध पुरुष रहात होता, त्यास उमाब्वानें पुत्रप्राप्तीसाठीं नवस केला. नंतर तिला दोन मुलगे झाले. त्यांचीं नांवें तिनें त्या पीराच्या नांवावरून शहाजी व शरीफजी अशीं ठेविलीं. शहाजीचा जन्म जय संवत्सर शके १५१६ चैत्र शु. ५ (ता. १८–३–१५९४) रोजीं झाला. †

सन १५९९ च्या होलिकोत्सवांत सिंदखेडास जाधवरावाच्या वाड्यांत रंगपंचमीचा दरबार झाला, त्यास मालोजी गेला होता. बरोबर लहान मुलगा शहाजी होता.

§ त्यांच्या पाटिलकीचे गांव सांगण्यांत येतात ते असेः—दौंड नजीक हिंगणी, बेरडी, देऊळगांव, खानवट व जिंती; इंदापुर तालुक्यांत कळस; सिन्नर तालुक्यांत वावी; नगर जिल्ह्यांत मुंगी पैठण व नानजव; आणि वेरूळचे उत्तरेस बनसेंद्र.

† रु. १–शेडगाव–बखर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

४१५ ... २८६२६
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचें सुस्वरूप व चलाखी पाहून जाधवरावानें त्यास आपल्याजवळ बसविलें. जाधवरावाची मुलगी जिजाबाई शहाजीहून सुमारें एक वर्षाची लहान बापाजवळ दरबारांत बसली होती. रंगाचा खेळ चालू झाल्यावर हीं दोन मुलें मूलस्वभावेंकरून एकमेकांवर रंग व गुलाल उधळूं लागलीं, तें पाहून जाधवरावास कौतुक वाटून तो सहजगत्या म्हणाला, 'हा जोडा मोठा सुंदर दिसतो.' हे शब्द ऐकतांच मालोजी उठून बोलला, 'ऐका हो, जाधवराव आजपासून आमचे व्याही झाले.' आपल्या विनोदी शब्दांचें असें पर्यवसान झालें तें जाधवराव किंवा त्याची बायको म्हाळसाबाई यांस बिलकूल आवडलें नाहीं. त्यानें मालोजीस सांगितलें, 'हे थट्टेचे शब्द तुम्ही खरे मानूं नयेत.' या उत्तरानें मालोजीस दुःख होऊन आपल्या गरिबीची खंती उत्पन्न झाली; आणि हीच मुलगी आपल्या मुलास करावयाची असा मनाचा निश्चय करून तो जाधवरावाची नोकरी सोडून बाहेर निघाला; आणि भीमा नदीचे कांठी पांडेपेडगांवजवळ वतनवाडी होती ती या दोघांनीं सांभाळून जाधवरावाशीं सगाईचा दावा आरंभिला. सिसोद्यांचें उपास्य दैवत एकलिंगजी, त्याची भक्ति मोठ्या निष्ठेनें चालवून शिवाय द्रव्यप्राप्तीचे व्यावहारिक उपायही त्यांनीं सुरू केले. धर्माचरणाच्या भावनेंत साक्षात्कार होऊन मालोजीस द्रव्याचा ठेवा सांपडला, तो वेंचून त्यानें पदरीं लष्करी जमाव उभारिला आणि कित्येक धार्मिक व लोकोपयोगी कामें करून प्रतिष्ठा वाढविली. वेरूळ येथें घृष्णेश्वराचें पुरातन मंदिर मोडकळीस आलें होतें, त्याचा त्यानें जीर्णोद्धार केला, आणि शिंगणापुर येथील महादेवाच्या डोंगरावर यात्रेकरूंना पाण्याची सोय नव्हती, ती तेथें विस्तीर्ण तलाव बांधून करून दिली. अशा रीतीनें त्याचा लौकिक वाढत गेला. अमात्यांच्या दप्तरांतील एका कागदांत खालील मजकूर आहे, 'राजश्री मालोजी राजे ईश्वरभजनीं तत्पर, गोब्राह्मणांचे प्रतिपालक, निरंतर साधुसज्जन भले रयत यांचे प्रतिपालक, दुष्टांचा निःपात करणार. त्यांची स्त्री मातुश्री उमाब्वा. मालोजी राजांनीं शिखरीं तळें बांधिलें, जीवन केलें, इमारती केल्या, जनयात्रा येऊं लागली.'§ तेव्हां वेरूळ (म्हणजे दौलताबाद) पासून साताऱ्याजवळील शंभुमहादेवापर्यंतच्या विस्तीर्ण प्रदेशांत मालोजीचें नांव गाजूं लागलें.

श्रीगोंदें येथें शेषाप्पा नाईक पुंडे म्हणून एक प्रतिष्ठित सावकार मालोजीच्या परिचयाचा होता. त्याजपाशीं त्यानें आपलें द्रव्य ठेवून त्याचा विनियोग चालविला;

§ रा. खं. ८ ले. ७१.

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि मनुष्यबल व द्रव्यबल उत्पन्न होतांच त्यानें शहाजीसाठीं जाधवरावाकडे मुलीची मागणी घातली. भोसले व जाधव यांची कौटुंबिक तेढ निजामशहा व त्याचा मुख्य कारभारी मलिकंबर यांचे कानावर जाऊन त्यांनींही उभय कुटुंबांचा आपल्या राज्यास उपयोग आहे असें जाणून त्यांच्या शरीरसंबंधास आपला पाठिंबा दिला; आणि त्यांच्याच मध्यस्थीनें शहाजी व जिजाबाई यांचें लग्न मार्गशीर्ष शु॥ ५ श.१५२० स. १६०५च्या डिसेंबरांत मोठ्या थाटानें पार पडलें. त्या प्रसंगीं मालोजीला निजामशाहींतून पंचहजारी मनसब, शिवनेर व चाकण हे दोन किल्ले आणि पुणें व सुपें हे दोन परगणे जागीर मिळाले. जिजाबाईच्या लग्नाचा काळ म्हणजे अकबर बादशहाची अखेर होय. त्यापूर्वींच्या दहा वर्षांत निजामशाहीचें राज्य जिंकण्याचे अकबराचे प्रयत्न किती जोराचे चालले होते हें ध्यानांत वागविल्यास, भोसले जाधव वगैरे पराक्रमी मंडळींस संतुष्ट ठेवून राज्यरक्षणाचे कामीं त्यांचें साह्य मिळविण्याची एवढी जरूर मलिकंबरास कां वाटली हें स्पष्ट होतें. त्यानेंच भोसल्यांना हातीं धरिलें आणि भोसल्यांनीही अनेक अडचणीच्या प्रसंगांतून निजामशाहीचा बचाव करण्यांत स्वामिनिष्ठेची कमाल करून दाखविली, हा प्रकार इतिहासांत प्रसिद्ध आहे. याच परिस्थितींतून पुढें शिवाजीचा उदय झाला, ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे.

शहाजीच्या लग्नानंतर कांहीं काळानें शरीफजीचें लग्नही जुन्नरास विश्वासराव म्हणून सरदार होता त्याच्या मुलीशीं झालें. तिचें नांव गंगाव्वा ऊर्फ दुर्गाबाई. हा शरीफजी स. १६२४ त भातवडीचे संग्रामांत मरण पावला. § त्यास महादाजी व त्रिंबकजी असे दोन पुत्र होते. मालोजी व विठोजी हे मलिकंबराच्या शिस्तींत वाकबगार होऊन उदयास आले. विठोजीस आठ पुत्र झाले ते सर्व वडिलांच्या उद्योगांत सामील झाल्यानें घरचे घरीं मनुष्यबळ वाढून भोसल्यांची जमात सामर्थ्यवान् बनली. थोड्या फार प्रमाणांत हे सर्व पुरुष बाणेदार असून त्यांस निजामशाही व आदिलशाही या दोन राज्यांच्या लष्करांत पराक्रमानें पुढें येण्यास अवसर मिळत गेला.

§ शिवभारत ४.५९ व रा. खं ८.७१. शरीफजी दोन मुलगे होऊन मग लढाईत मरण पावला, व जिजाबाईचें वय मृत्युसमयीं ८०चे घरांत होतें, यावरून शहाजी स. १६०२ त जन्मला हें म्हणणें गैर ठरतें. अर्थात् शहाजीचा जन्म स. १५९४ व शरीफजीचा त्याचे मागून दोन एक वर्षांनीं झाला असला पाहिजे. स. प. पृ. १३२ व पे. द. ३१.३५ चीं पत्रें शरीफजीच्या नांवचीं आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पश्चिम महाराष्ट्राचा डोंगराळ प्रदेश या दोन राज्यांत मोडत असून त्यांची सरहद्द निर्णीत नव्हती. सामान्यतः भीमेच्या उत्तरेकडील प्रदेश निजामशाहीचा व दक्षिणेकडील आदिलशाहीचा असें धोरण मानलें जात होतें. तथापि मलिकंबरासारखे आक्रमणशील पुरुष शक्य तोंवर आपली हद्द वाढविण्यास टपलेले असत. शिवाय या डोंगराळ प्रदेशाच्या आश्रयानें रहाणारीं अनेक मराठ्यांचीं घराणीं स्वतंत्र वृत्तीनें वागून कोणाचाच अंमल सुरळीत चालूं देत नसत. ठोकळ मानानें बोलायचें तर वाई सातार्‍यापासून जुन्नरपर्यंतच्या सह्याद्रीच्या पूर्व उतरणीवरील प्रदेशास मावळ अशी संज्ञा असून त्यांत लहान मोठीं पुष्कळ दुर्गम खोरीं आहेत. या मावळ प्रदेशाची रचना, त्यांतील नद्यांचीं, डोंगरांचीं व खोर्‍यांचीं नांवें आणि त्यांतील पर्वतशिखरांवर बंदोबस्तासाठीं बांधलेले लहान मोठे किल्ले इत्यादि प्रकार यथावकाश पुढें सांगावयाचे असून त्यांची रचना नीट लक्षांत आणावी तेव्हांच शिवाजीच्या उद्योगाचें विशिष्ट स्वरूप बिनचूक लक्षांत येईल. त्याचप्रमाणें या मावळ प्रदेशांतील सह्याद्रीच्या पश्चिम उतरणीवरील घाट व पुढील कोंकणपट्टी याही प्रदेशाचें स्वरूप लक्षांत ठेविलें पाहिजे. तूर्त आपणांस स. १६०० पासून स. १६३६ पावेतों मालोजी शहाजींनीं प्रथम कोणती गोष्ट साध्य केली तें समजण्याकरितां मोगल बादशहांचें दक्षिणेंतील आक्रमण ध्यानांत आणणें जरूर आहे. त्यासाठीं बराच विस्तार करावा लागेल, पण त्यास इलाज नाहीं. तत्कालीन परिस्थिति व तिच्यांतून उद्भवलेला शहाजीचा उत्कर्ष हे प्रकार समजण्यास दक्षिणेंतील एकंदर ऐतिहासिक घडामोडी व त्यांत भाग घेणार्‍या व्यक्ती यांच्या हकीकती खुलासेवार दिल्या पाहिजेत.

३ जहांगीरचें दक्षिणेंत आक्रमण, रोशनगांवची लढाई (१६१६).— दक्षिणदेश जिंकल्याशिवाय आपल्या बादशाहीची सार्थकता नाहीं असें जाणून, अलाउद्दीन खिलजीप्रमाणेंच, नर्मदेपासून थेट कन्याकुमारीपर्यंतचा प्रदेश जिंकण्याची अकबर बादशहास मोठी उत्कंठा लागली होती. तदनुसार खानदेश व वर्‍हाडप्रांत जिंकून नंतर त्यानें अहंमदनगरच्या निजामशाहीवर चढाई सुरू केली. ता. २१-१२-१५९५ रोजीं तें राजधानीचें शहर हस्तगत केल्यावर मग बाकीचा प्रांत जिंकण्याचा उद्योग त्यानें आरंभिला. या कामीं त्याचे मुलगे दानियाल व मुराद, आणि अबुल–फज्ल वगैरे सरदार कसे खपत होते आणि चांदबिबीनें त्यांच्याशीं कसा झगडा केला, तो प्रकार मोगल इतिहासांत सुप्रसिद्ध आहे. चांदबिबीनंतर मलिक अंबर नांवाचा एक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हबशी सरदार दक्षिणेंत प्रसिद्धीस आला. हा आरंभीं एक लहानसा गुलाम असून बगदाद येथील एका व्यापाऱ्यानें त्यास हिंदुस्थानांत आणून, अहंमदनगर येथें चंगीजखान म्हणून वजीर होता त्यास विकलें. त्यानें चंगीजखानाचे वशिल्यानें व आपल्या बुद्धिबळानें निजामशाही राज्य बहुतेक परत मिळविलें आणि अकबरानें जिंकलेला प्रदेश सोडवून घेतला. अकबराच्या अंतकाळांत व त्याचे पश्चात् दक्षिणेंतून मोगलांचा दरारा साफ नाहींसा झाला; आणि अहंमदनगर त्यांचे ताब्यांत होतें तें संभाळणें सुद्धां त्यांस जड पडूं लागलें. अकबराचे पश्चात् जहांगीर तख्तनशीन झाला, त्याला बापाची आवरशक्ति नव्हती. थोडीशी स्थिरस्थावर झाल्यावर त्यानें स. १६०८ त दक्षिण देश जिंकण्याचें काम हातीं घेऊन पंधरा वीस वर्षेंपावेतों अनेक प्रयत्न केले, पण ते मलिकंबरानें हाणून पाडिले.§ मोगल फौजा चालून आल्या कीं मलिकंबर तात्पुरती माघार घेई व त्यांची पाठ वळतांच पुनः आपली चढाई सुरू करी. अहंमदनगर राजधानी मोगलांचे हातीं असल्यामुळें मलिकंबरानें कांहीं अल्पकाळ जुन्नर येथें व नंतर दौलताबादेस निजामशहाची सोय केली आणि त्याच हेतूनें त्यानें खडकी येथें नवीन शहर वसविलें, त्यास पुढें औरंगाबाद नांव प्राप्त झालें. या कामीं त्यानें भोसले वगैरे सरदारांस हाताशीं घेऊन विजापुरच्या आदिलशहाचेंही साह्य मिळविलें. निजामशाही नष्ट झाल्यास मोगलांची गदा विजापुरावर येणार हें स्पष्ट दिसत असल्यामुळें तें धक्केखाऊ राष्ट्र टिकविणें आदिलशहालाही जरूरच होतें. मोगलांसारख्या वरचढ शत्रूला आपले हद्दीस भिडूं देणें किती धोक्याचें आहे हें तो जाणून होता. यामुळें त्याचें व मलिकंबराचें एवढें सख्य जमलें कीं, मलिकंबराचा पुत्र फत्तेखान यास इब्राहिम आदिलशहानें विजापुरास आणून आपल्या एका प्रमुख सरदाराची मुलगी देऊन तो लग्नसमारंभ चाळीस दिवसपावेतों मोठ्या थाटानें स्वतःच्या खर्चानें सिद्धीस नेला (ता. ५-२-१६०९).

मलिकंबराचा उद्योग सर्वांगीण होता. त्यानें रयतेस दिलदिलासा देऊन ताब्यांतील प्रदेशाची आबादानी ठेविली; त्यामुळें वसुलाची उपज होऊन पदरीं लढाऊ

§ सर जदुनाथ सरकारांनीं नुकतेंच मलिकंबराचें एक जुनें चरित्र प्रसिद्ध केलें असून त्या आधारानें हा अज्ञात भाग आतां बराच विशद होत आहे. शिवाजीला स्वराज्याचे कामांत मोठें यश येण्यास काय कारणें झालीं तें यावरून स्पष्ट होईल. (इंडियन हिस्टॉरिकल कार्टर्ली, कलकत्ता, सेप्टेंबर १९३३).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फौज वाळगण्याचें त्यास सामर्थ्य आलें. त्याच्या लष्करांत मराठे व मुसलमान सारखेच खूष असत. मोगलांशीं लढण्यांत त्यानें डोंगराळ प्रदेशाच्या आश्रयानें गनिमी काव्याचा उपयोग केला; आणि मोगलांशीं टक्कर देण्याकरितां आदिलशाही व कुत्बशाही यांच्याशीं सख्य ठेविलें. अशा रीतीनें पंचवीस वर्षेंपावेतों या चतुर मुत्सद्द्यानें जो प्रयत्न निजामशाही तारण्यासाठीं केला, त्याची वाखाणणी सर्वत्र होत आहे. हाच मलिकंबराचा उद्योग पुढें शहाजी व शिवाजी यांना मार्गदर्शी झाला.

मलिकंबरास जिंकण्याकरितां जहांगीर बादशहानें खानखानान या अनुभवी सरदारास मोठी फौज देऊन रवाना केलें. त्याच्याशीं उघड सामना न करितां मलिकंबरानें नम्रतेचीं बोलणीं लावून कालहरण चालविलें. तेणेंकरून दोन तीन वर्षें झालीं तरी वऱ्हाडच्या पलीकडे मोगलांचा रिघाव होईना. तेव्हां जहांगीरनें आपला पुत्र पर्वीज यास आणखी मोठी फौज देऊन खानखानानचे मदतीस पाठविलें. त्याजबरोबर आसफखान, राजा मानसिंग वगैरे दुसरेही नामांकित सरदार त्यानें दक्षिणेंत पाठविले. पण एवढ्या तयारीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. बऱ्हाणपुरास बादशाही थाटाचे विलास करण्यापलीकडे पर्वीजनें दुसरें कांहीं केलें नाहीं. उलट मलिकंबरानेंच त्यांस अन्नसामुग्री बिलकूल पोचूं न देतां, अडचणीच्या जागीं रात्रीं-अपरात्रीं गांठून छापे घालावे, व सांपडतील त्यांची कत्तल करावी, अशा रीतीनें अत्यंत हैराण केलें.

हे प्रकार ऐकून जहांगीर चिडून गेला. त्याजकडे अशाही कागाळ्या गेल्या कीं, अंबरकडून लाच घेऊन खानखानान आपला उद्योग मुद्दाम बिघडवितो. तेव्हां खानखानानचा मुलगा शहानवाजखान यास बादशहानें दक्षिणेंत पाठविलें. पर्वीज बऱ्हाणपुरास होता त्याची रजा घेऊन शहानवाजखान मलिकंबरावर जालनापुरचे बाजूस चालून आला. मलिकंबर व निजामशहा यांनीं आपले सरदार जमवून युद्धाची तयारी केली, आणि इख्लासखान यास आपला सेनाध्यक्ष नेमिलें. त्याच्या हाताखालीं आदमखान, आतशखान, म्हालदारखान, भोसल्यांची जमात, जाधवांची जमात, बाबाजी काटे, उदाराम असे पुष्कळ नामांकित सरदार जमा झाले होते. जालना व खडकी याच्या दरम्यान हीं उभय दळें कैक दिवस युद्धासाठीं सज्ज होऊन राहिलीं. पण एकदम चालून जाण्याची छाती कोणासही होईना. कांहीं काळ भेदनीति व गनिमी कावा यांचा अवलंब उभयतांनीं केला. त्यांत मोगलांस बरेंच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यश मिळालें. लखूजी जाधवराव व त्याचें बंधुमंडळ, बाबाजी काटे व त्याचे बंधु, माहूरचा उदाराम, विठोजीच्या पुत्रांपैकीं कित्येक भोसले असे बरेचसे हिंदु सरदार फितवून शहा नवाजखानानें आपल्या बाजूस आणिले. बाळापुरास येऊन ते बादशाही लष्करांत सामील झाले. आदमखान हबशी, याकुतखान वगैरे कित्येक मुसलमान सरदारही मलिकंबरास सोडून मोगलांकडे आले. तेव्हां मलिकंबरावर आणीबाणीचा प्रसंग ओढवला.

अशा संकटसमयीं मलिकंबरानें आदिलशहाकडे याचना केली कीं, 'आमचा संहार होण्याचा समय येऊन ठेपला आहे, तर आपण आमची निभावणूक करा. आमचे एक एक सरदार फुटून चालले, त्यांस प्रथम थांबविलें पाहिजे. हें काम आपले प्रतिष्ठित सरदार मुल्लाबाबा महंमदच करूं शकतील, तर त्यांस तावडतोब पाठवून आमची लाज राखा.' आदिलशहानें लगेच मुल्ला महंमद यास मलिकंबराचे भेटीस खडकी येथें पाठविलें, आणि त्याजबरोबर मोठी फौजही त्याचे मदतीस रवाना केली. या फौजेवर मुल्लाचा जांवई महंमद अमीन ऊर्फ मुस्ताफाखान हा मुख्य अंमलदार होता. मिळून राजकारण व लष्करी जमाव अशा दोनही साधनांनीं मोगलांचा प्रतीकार करावा अशी मलिकंबराची योजना होती.

मुल्लानें मलिकंबरास भेटून नंतर शहानवाजखानाकडे शिष्टाई चालविली. तो जाऊन खानास भेटला. शहा नवाजनें त्याचा चांगला सत्कार केला. त्यावरून मलिकंबरास संशय आला कीं, मुल्ला मोगलांस सामील होऊन आपला घात करणार. त्यावरून आदिलशहास लिहून त्याजकडून मलिकंबरानें मुल्लास परत बोलावून घेतलें; आणि स्वतःच्याच हिंमतीवर मोगलांशीं एकवार सामना करण्याचा बेत ठरविला. त्याचे हबशी सरदार मोगलांकडे गेले होते त्यांनीं शहानवाजखानास निकड लाविली कीं, तुम्ही एकदम मलिकंबरावर चढाई करा; जितका विलंब कराल तितका घातक होईल. परंतु शहा नवाजखानाला पर्वीज व खानखानान यांनीं बिलकूल मदत केली नाहीं. इकडे निजामशाही लष्करांतील मराठे लोक झडप घालून दिवसेंदिवस मोगली लष्करास तोंडीतच होते. तेव्हां शहा नवाजनें मनाचा धडा केला कीं, आतां विलंब करण्यांत हांशील नाहीं. म्हणून होती नव्हती तेवढी फौज जमा करून त्यानें बाळापुराहून अंबराचे छावणीवर चाल केली. त्या वेळीं त्याजवळ फक्त दहा हजार फौज असून अंबराची चाळीस हजार होती. वाटेंतच त्यास म्हालदारखान, दानिशखान, दिलावरखान वगैरे अंबराच्या बाजूचे सरदार आडवे आले; त्यांचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पराभव करून शहानवाजखान अंबराचे तळानजीक येऊन जालनापुरचे पश्चिमेस दहा मैलांवर रोशनगांव § येथें दुधनानदीचे वांकणांत सोयीची जागा पाहून उतरला. या ठिकाणीं ता. ४-२-१६१६ रोजीं सकाळपासून सायंकाळपावेतों तुंबळ संग्राम होऊन मलिकंबर पराभव पावला आणि अंधार पडल्यावर पळ काढून दौलताबादच्या किल्ल्यांत जाऊन तो बंदोबस्तानें राहिला. पण लढाईंत त्याचें मनस्वी नुकसान झालें. शहा नवाजखानाचे लोक थकून गेले होते म्हणूनच अंबराचा पाठलाग न होतां तो बचावला. तरी दुसरे दिवशीं खान लगेच पुढें चालून आला; आणि मलिकंबरानें वसविलेलें खडकी शहर व सभोंवतालचा प्रदेश उद्ध्वस्त करून तो रोहिणखेडच्या खिंडींतून परत बाळापुरास गेला. हत्तीघोडे, सामान वगैरेची अपरंपार लूट त्यास मिळाली.

भोसले-जाधवांच्या वितुष्टांतून शिवाजीचा उदय झाला ही गोष्ट लक्षांत ठेविली म्हणजे वरील रोशनगांवच्या लढाईचें महत्त्व कळून येईल. या लढाईपूर्वीच लखूजी जाधवराव, बाबाजी काटे व कित्येक भोसले मंडळी मोगलांस मिळाली, यामुळें त्यांजवर निजामशाही दरबाराची जी इतराजी झाली, तिचें पर्यवसान लखूजीचे खुनांत झालें हें पुढें दिसून येईल. शहाजीचें लग्नच मुळीं जुलमाचा रामराम होता; तसेंच पुढें जाधवराव मोगलांस मिळाल्यानें उभयतांस समरांगणावर एकमेकांशीं लढण्याचे प्रसंग वारंवार येत गेल्यानें, त्या दाव्यास पुष्टि मिळाली. भोसले जाधवांचा हा दावा शाहूच्या कालापर्यंत शंभरएक वर्षें तरी चालला. लखूजी जाधवाबरोबर बाबाजी काटे मोगलांस मिळाला, तो पुढें विश्वासघातानें मारला गेला. त्याचे पश्चात् विठोजी काटे याचें नांव ऐतिहासिक कागदांत आढळतें. †

---

§ या लढाईस पैठणच्या नदीची म्हणजे गोदावरीची लढाई असेंही नांव आढळतें.

† जहांगीर आपल्या आत्मचरित्रांत कायथा, कैता म्हणतो, ते काटे याचें फारसी रूप होय. बाबाजी काटे याचें वतन सुपें बारामती येथें असून बाबाजीचे मुलगे धर्मोजी व संभाजी यांचा तंटा शहाजीनें तोडिला. पहा शिवभारत, स. प. पृ. ४४; रा. खंड २०-९, १८, २४, २५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

—२—

तारुण्याची सळसळ

१ शहाजहानच्या दक्षिणेंतील स्वाऱ्या २ शहाजहानचा जुन्नर येथें अज्ञातवास ३ भातवडीचा संग्राम, शहाजीचा पराक्रम ४ शहाजीचा आदिलशाहींत प्रवेश

१ शहाजहानच्या दक्षिणेंतील स्वाऱ्या (स. १६१७ व १६२१).— रोशनगांवच्या लढाईनें मोगलांचा कार्यभाग कांहींच साधला नाहीं. लगेच मलिकंबरानें आपला पूर्वक्रम चालवून मोगलांस मागें रेटीत नेलें. ही बातमी जहांगीर बादशहास पोंचून तो चिंताक्रांत झाला. त्यानें आपला पुत्र खुर्रम् यास दक्षिणच्या कामगिरीवर रवाना केलें आणि त्याचा पाठपुरावा यथायोग्य व्हावा म्हणून तो स्वतः अजमिरास येऊन राहिला. खुर्रम् यासच पुढें शहाजहान हें नांव बापानें दिलें. म्हणून सोयीसाठीं तेंच नांव इतउत्तर उपयोगांत आणूं. ता. ६–१०–१६१६ रोजीं शहाजहाननें अजमिराहून प्रयाण केलें. नर्मदेवर येतांच त्याला खानखानान, खानजहान, महाबतखान वगैरे सरदार दक्षिणेंत कामगिरीवर होते ते येऊन सामील झाले. अशी ही भक्कम फौज व प्रचंड तयारी पाहून मलिकंबर व आदिलशहा लगेच सुतासारखे नरम आले त्यांनीं भले मोठे नजराणे पाठवून शहाजहानची समजूत केली. मलिकंबरानें शहाजहानची भेट घेऊन बालाघाट प्रांत परत दिला आणि अहंमदनगर व इतर किल्ले सोडून देण्याची कबुली लिहून दिली. खानखानान व त्याचा मुलगा शहानवाजखान§ यांना शहाजहाननें दक्षिणचा कारभार सोंपिला; आणि इतर सर्व व्यवस्था ठीक करून तो परत जाऊन एक वर्षानें बापास अजमीर येथें भेटला. बापानें त्याचें मोठ्या आनंदानें स्वागत केलें; आणि खानजहान लोदी, उदाराम वगैरे अनेक दक्षिणी सरदार शहाजहानबरोबर गेले होते त्यांच्या भेटी व नजराणे स्वीकारले.

§ शहानवाजखानाची मुलगी पुढें शहाजहानची बायको झाली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परंतु शहाजहानचा हा सर्व उद्योग केवळ पोकळ देखावा होता. मोठ्या फौजा परत जातांच मलिकंबरानें आपला पूर्वीचा उपक्रम जास्तच जोरानें चालविला. त्यानें कुत्बशहा व आदिलशहा यांचें साह्य मिळविलें; आणि पन्नास हजार फौज जमवून मोगलांचे कब्जांत गेलेला प्रदेश सोडविण्यास सुरुवात केली. त्याच्या हाताखालीं ठिकठिकाणचे मराठे सरदार आपापलीं पथकें घेऊन तयारीनें आले आणि गनिमी काव्यानें लढून मोगलांस मागें हटवूं लागले. खानखानानची त्यांनीं इतकी हैराण गत केली कीं फक्त बऱ्हाणपुर व अहंमदनगर या दोन शहरांपलीकडे मोगलांची सत्ता दक्षिणेंत मुळींच उरली नाहीं. ही परिस्थिति दोन तीन वर्षांत घडून आली. खुद्द बऱ्हाणपुरास मलिकंबरानें वेढा घातला आणि त्याचे मराठे सरदार नर्मदा ओलांडून मांडवगडापावेतों पोंचले. मोगल सुभेदार खानखानाननें सहा महिने-पर्यंत शिकस्तीनें लढून बऱ्हाणपुरचा बचाव केला आणि बादशहाकडे फौज व मदत पाठविण्याविषयीं निकडीची विनंति लिहून पाठविली. त्यावरून जहांगीर अत्यंत चिंतातुर होऊन त्यानें पुनरपि शहाजहान यास दक्षिणेंत पाठविलें. मात्र या वेळीं त्याजवर बापाची मर्जी पहिल्यासारखी संतुष्ट नव्हती. जहांगीरची प्रकृति दिवसेंदिवस खालावत जाऊन आतां तो सर्वस्वी नूरजहानच्या तंत्रानें वागूं लागला; आणि तिनेंही शहाजहानच्या विरुद्ध खटपट चालू केली. त्याचा वडील भाऊ खुस्रू अटकेंत होता तो आपल्याविरुद्ध कारस्थान रचील अशी भीति वाटून त्यासही शहाजहाननें बापापासून मागून आपल्याबरोबर घेतलें; आणि लवकरच पुढें त्या खुस्रूचा बऱ्हाणपुरास अंत झाला, तो बहुधा शहाजहाननेंच घडवून आणिला असें निदर्शनास आलें. ता. ४-४-१६२१ रोजीं शहाजहान बऱ्हाणपुरास दाखल झाला, त्या वेळीं मलिकंबराचा प्रचंड वेढा त्या शहरास पडला होता. पण शहाजहान कर्तृत्ववान होता. त्यानें आपल्या फौजेचे निरनिराळे विभाग करून चहूंकडून मलिकंबरावर चाल केली; आणि बालाघाट सोडवून मोगल फौजा पुढें आल्या; खडकी शहर मलिकंबरानें वसवून भरभराटीस आणिलें होतें तें त्यांनीं पुनः धुळीस मिळविलें आणि दौलताबादेजवळ मुक्काम केला (ता. ५-५-१६२१). या ठिकाणीं मलिकंबरानें मोगलांस अत्यंत त्रस्त केलें. पर्जन्यकाळ आल्यामुळें त्यांना दाणा वैरण मिळेना आणि पुढें चाल करण्याचे किंवा परत जाण्याचे मार्ग बंद झाले. मलिकंबरानें अहंमदनगरास वेढा घातला होता, तो उठवण्याची शहाजहाननें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिकस्त केली. पावसाळा संपतांच पुनः नीट व्यवस्था करून तो पैठणपावेतों चालून आला, तेव्हां मलिकंबरास दिसून आलें कीं, आतां आपला इलाज चालत नाहीं. त्यानें शहाजहानकडे शरणचिठ्ठी लिहून पाठविली, ती स्वीकारून स. १६२१ च्या नोव्हेंबरांत शहाजहान पैठणहून परत फिरून बऱ्हाणपुरास गेला. तेथें खुस्रूचा शेवट लावून त्यानें ता. २४-३-१६२२ रोजीं उत्तरेंत प्रयाण केलें. अर्थात् मोगलांचा दक्षिणेंतील उद्योग याही वेळीं अपुराच राहिला.

स. १६२० च्या सुमारास मालोजी भोसले मरण पावला. § त्या वेळीं दक्षिणची परिस्थिति कशा प्रकारची होती हें वरील हकीकतीवरून कळून येईल आणि त्यावरून भोसले जाधवांच्या हालचालींचा अंदाजही करितां येईल.

वरील युद्धांत मालोजी व शहाजी यांनीं प्रत्यक्ष भाग कोणता घेतला याचा निर्देश आढळत नाहीं. पण ते निजामशहाच्या तर्फेनें मोगलांशीं लढत होते यांत संशय नाहीं. जाधवराव तर उघड उघड मोगलांकडे मिळाल्यामुळें सासरेजांवयांचा विरोध घटकोघटकीं येऊं लागला. आकस्मिक कारणांनींही हा वैराग्नि कसा पेट घेत असे याचें एक उदाहरण शिवभारतकारानें रसभरित भाषेनें वर्णिलें आहे. मालोजीच्या मृत्यूनंतर एकदां निजामशहाचे दरबारास सरदार मंडळी गेली होती. दरबार आटोपल्यावर ते घरीं जाऊं लागले तेव्हां महाद्वारापाशीं गर्दी झाली. तींत खंडागळे सरदाराचा हत्ती बेफाम होऊन लोकांस तुडवीत चालला. तें पाहून लखूजी जाधवाचा मुलगा दत्ताजी यानें हत्तीवर चाल करून त्यास व त्याचे मालकास वठणीस आणिलें. तें पाहून शहाजी व विठोजीचे मुलगे संभाजी व खेळोजी खंडागळ्याचे मदतीस धावून गेले. तेव्हां लखूजी जाधवही आपल्या मुलाच्या मदतीस परत आला. अशी दंगल माजली, त्यांत दत्ताजी जाधव व संभाजी भोसले ठार झाले; आणि शहाजीस जबर जखमा लागल्या. भोसले-जाधवांचें वैर सारखें चालू असल्याबद्दल सर्व बखरींचें ऐकमत्य आहे. त्याचाच पुरावा वरील तंटा होय.

§ शेडगाव बखर. शिवभारतकार म्हणतो, मालोजी निजामशहाचे आज्ञेनें इंदापुरच्या स्वारीवर गेला असतां लढाई होऊन स. १६०६ त रणांगणीं मरण पावला, तेव्हां शहाजी लहान होता, त्याचा प्रतिपाळ विठोजीनें केला. राजवाडे खं. १५ ले. ४०० व ४०७ यांवरून मालोजी तिस्सां अशर आलफ सालीं जिवंत असलेला दिसतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२ शहाजहानचा जुन्नर येथें अज्ञातवास.—खुस्रू, पर्वीज, खुर्रम् व शहर्यार असे जहांगीरचे चार पुत्र होते. खुस्रूच्या मृत्यूपासून शहाजहानासंबंधानें बापाचें मन साफ विटलें. त्याचा पराक्रम व आवरशक्ति हे गुण पाहून जहांगीरास वाटूं लागलें कीं, हा आपणासुद्धां केव्हांच गुंडाळून ठेवील. नूरजहानही तितकीच जहांबाज होती, आणि नवरा तर सर्वस्वी तिच्या तंत्रानें वागूं लागला. यास्तव शहाजहान आपल्या कलानें वागणारा नव्हे, अशी तिची खात्री होतांच दरबारचें वातावरण ती त्याजविरुद्ध बनवूं लागली. शहाजहानचा वडील भाऊ पर्वीज हाही कर्तृत्ववान होता, पण त्याला पराक्रम गाजविण्यास शहाजहानसारखी संधि मिळाली नाहीं म्हणून तो मागें पडला. नूरजहानची पहिल्या नवऱ्यापासून झालेली मुलगी लादिलीबेगम म्हणून होती, तिचें लग्न तिनें शहर्यारशीं करून त्यालाच बादशाही पद मिळवून देण्याची खटपट चालविली. जहांगीरच्या उत्तरावस्थेंत नूरजहानचें प्रस्थ अतोनात वाढलें. तिनें शहाजहानच्या जागिरी काढून घेतल्या, तेव्हां बापाशीं नम्रभावानें वागण्याऐवजीं त्यानें उघड बंडखोरी आरंभिली. बऱ्हाणपुर सोडून उत्तरेंत गेल्यावर त्यानें आगऱ्याचा किल्ला व तेथील संपत्ति हस्तगत करण्याचा प्रयत्न केला, तो सिद्धीस गेला नाहीं. लखूजी जाधवराव व उदाराम आपल्या फौजा घेऊन उत्तरेंत त्याचें साह्य करीत होते. बादशहानें पर्वीज व महाबतखान यांस शहाजहानला पकडून आणण्यास पाठविलें. दिल्लीजवळ बिलोचपुर येथें ता. १ ऑगस्ट १६२३ रोजीं लढाई होऊन शहाजहान पराभव पावून पळून गेला, तो ता. १७ ऑगस्ट रोजीं मांडवगडास पोंचला. तेथें निभाव न लागून तो लगोलग नर्मदा उतरून बऱ्हाणपुरास आला, (ता. १०-९-१६२३). मलिकंबर व आदिलशहा यांजकडे माणसें पाठवून त्यानें आश्रय मागितला तो त्यांनीं दिला नाहीं, तेव्हां त्यानें गोवळकोंड्याच्या हद्दींतून ओढ्या प्रांतांतून बंगालप्रांतांत प्रयाण केलें. बंगालचा सुभेदार इब्राहिमखान याची व शहाजहानची राजमहल येथें लढाई झाली, तींत इब्राहिमखान मारला गेल्यामुळें बंगाल प्रांतांतील संपत्ति व सत्ता शहाजहानास मिळून त्याचें बळ वाढलें. हें पाहून पर्वीज व महाबतखान बऱ्हाणपुराहून परत अलाहाबादेकडे शहाजहानच्या बंदोबस्तास धावून गेले. जोनपुरजवळ शहाजहानचा पराभव होऊन तो आश्रयार्थ रोठसच्या किल्ल्यांत गेला (ऑगस्ट, १६२४); पण महाबतखान पाठीवर चालून आल्याचें कळतांच तो पुनः ओढ्या प्रांतांतून तेलंगणांत येऊन निजामशहाच्या हद्दींतून बऱ्हाणपुरास आला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या वेळीं मलिकंबरानें त्यास मदत देऊन त्याची व्यवस्था लाविली. शहाजहानबरोबर त्याचे मुलगे दारा व औरंगजेब हे या प्रवासांत होते. बऱ्हाणपुर त्यास हस्तगत होण्यापूर्वी पर्वीज व महाबतखान त्याजवर पुनः उत्तरेकडून चालून आले, तेव्हां मात्र शहाजहानला अगदींच कठिण अवस्था प्राप्त झाली; आणि कांहींच गत्यंतर न राहिल्यामुळें त्यानें बापाकडे क्षमेची याचना केली. बापानें दारा व औरंगजेब या दोघांस ओलीस म्हणून आपले कबजांत घेऊन शहाजहानचे अपराध माफ केले. तथापि परत बापाकडे जाण्याची त्यास छाती झाली नाहीं. तो नाशिक येथें मलिकंबराचे आश्रयास राहिला. मलिकंबरानें मात्र या मोगल यादवीचा चांगलाच फायदा करून घेतला. याच सुमारास भातवडीचें युद्ध होऊन मोगल व आदिलशहा यांच्या संयुक्त फौजांचा मलिकंबरानें कसा फन्ना उडविला हें प्रथम सांगितलें पाहिजे. कारण या भातवडीच्या लढाईंतच शहाजीचा पराक्रम प्रथम लोकांचे नजरेस आला.

३ भातवडीचा संग्राम, शहाजीचा पराक्रम.—शहाजहानचा पाठलाग करीत बादशहाचा सेनापति महाबतखान नर्मदा उतरून अलीकडे आला, त्यानेंही मलिकंबर व आदिलशहा यांची मदत मागितली. आदिलशहानें ती गोष्ट मान्य करून मुल्ला महंमद यास फौज देऊन रवाना केलें. मलिकंबरास हा प्रकार रुचला नाहीं. त्यानें आदिलशहास कळविलें, या वेळीं बादशाहींत यादवी माजली आहे, तरी याचा आपण पुरेपूर फायदा करून घ्यावा. ही गोष्ट जरी खरी होती, तरी मलिकंबराची चढती कळा आदिलशहास अलीकडे इतकी उद्वेगकर वाटूं लागली होती कीं, हाच आपणास ग्रासून टाकील कीं काय अशी धास्ती वाटून त्यानें बादशहाचाच पक्ष स्वीकारिला. शहाजादा पर्वीज माळव्यांत होता, त्याचे भेटीस आदिलशहानें मुल्ला महंमदास पाठविलें. त्यांची भेट नालछा येथें झाली. भेटींत उभयतांच्या दोस्तीचा रंग उत्कृष्ट बनून आला. शहाजाद्यानें मुल्लास मुख्य सेनाध्यक्ष नेमून त्याच्या हाताखालीं लष्करखान, सिफादारखान, खानखानाच्या मुलीचा मुलगा मीर्झा मिनूचहर वगैरे आपले मोठमोठे सरदार दिले आणि सांगितलें, तुम्ही सर्वांनीं जाऊन प्रथम त्या हरामखोर अंबराचा चांगला समाचार घ्या. पूर्वी फुटून आलेले मराठे व हबशी सरदारही या वेळीं बादशाही फौजेस सामील झाले. अर्थात् जाधवराव, काटे, म्हालदारखान, आदमखान हे सर्व मलिकंबरावर चालून आले. 'आतां अंबर कोठें पळतो ! आम्ही त्यास रेड्यावर बांधून आपल्या पुढें हजर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करितों, ' अशी या सर्वांनीं प्रतिज्ञा केली. ही सिद्धता करून देऊन पर्वीज अलाहाबादच्या बाजूस शहाजहानवर चालून गेला.

मोगलांच्या या प्रचंड स्वारीची बातमी आली तेव्हां अंबर भयभीत झाला, पण डगमगला नाहीं. मुल्ला महंमदास परत बोलवून घ्या, म्हणजे मी इकडे मोगलांचा समाचार घेतों, असें त्यानें वारंवार लिहून आदिलशहास विनविलें. परंतु तें शहानें बिलकूल मानलें नाहीं. पुढें अंबरानें गोवळकोंडा विजापुरपावेतों त्वरेनें स्वारी करून पैसा जमविला आणि मोगलांशीं सामना करण्याची सिद्धता केली. उत्तरेकडून मोगल फौजा निजामशाहीवर चालून येऊं लागल्या, तेव्हां विजापुराहून आदिलशहानें आणखी कित्येक सरदार अंबरावर रवाना केले. त्यांत अंकुशखान, फर्हादखान, खैर्यतखान, याकुतखान सर्जा, रणदुल्लाखान यांचीं नांवें आहेत. अशी दोन बाजूंनीं फौज चालून आलेली पाहून मलिकंबर बचावासाठीं भातवडीच्या गढींत जाऊन राहिला. हें ठिकाण नगरचे पूर्वेस सुमारें दहा मैलांवर डोंगराळ प्रदेशांत गनिमी युद्धपद्धतीला अत्यंत अनुकूल आहे. तेथें एक विस्तीर्ण तलाव होता, तो फोडून मलिकंबरानें मोगलांच्या वाटेवर पाणी व चिखल पसरून दिला. पर्जन्यकाळांतच मोहीम सुरू झाल्यानें दोनही पक्षांची धान्यावांचून मोठी कुचंबणा झाली. बाहेरून धान्य येण्याच्या वाटा अंबरानें अडवून धरिल्या. त्यामुळें उपासमार झालेले कित्येक मोगल सरदार अंबरास येऊन मिळाले. त्यांस बक्षिसें वगैरे देऊन अंबरानें इतकें खूष केलें कीं, आणखी तसे लोक मोगलांचा पक्ष सोडून वरचेवर त्याजकडे येऊं लागले. शिवाय अंबरानें आपल्या कांहीं टोळ्या वेळीं अवेळीं बाहेर फिरतीस पाठवून मोगलांस हैराण केलें. खरें म्हटलें म्हणजे मोगलांच्या बाजूस सर्व भाडोत्री लोक स्वार्थानें एकत्र झाले असून आवळ्यांची मोट एकत्र बांधणारा चतुर पुढारी त्यांच्यांत कोणी नव्हता. याचे उलट मलिकंबराविषयीं त्याचे हस्तकांस मोठा आदर असून आपण निजामशाही तारण्यासाठीं जमलों आहों अशी त्यांची भावना होती. मोगल जसजसे पुढें येऊं लागले तसतशी त्यांच्यामध्यें वाचावाची सुरू होऊन त्यांच्या अंतःकरणांत सर्वत्र भीतीची छाया पसरली. शेवटीं मोगल व आदिलशाही दळें आपल्या कावूंत आलीं असें पाहून त्यांजवर एकदम हल्ला करण्याचा विचार मलिकंबरानें ठरविला. स. १६२४ च्या ऑक्टोबर अखेरीस मोगल बेसावध असल्याची खबर आणवून अंबरानें त्यांस अचानक गांठलें. दोनही फौजांची भीड पडून कापाकापी सुरू झाली आणि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुल्ला महंमद लारी मारला गेला. तेणेंकरून विजापुरी फौजा धूम ठोकून पळून गेल्या. तसेंच उदाराम§, जाधवराव वगैरे सरदारही रणांगण सोडून निघून गेले. इख्लासखान व आणखी पंचवीस आदिलशाही सरदार मलिकंबराकडे पाडाव आले. त्यांपैकीं फर्हादखानाचा अंबरानें शिरच्छेद करविला. मोगलांपैकीं लष्करखान, मीर्झा मनूचिहर व आकिदतखान हे पाडाव आले. खंजरखानानें पळून जाऊन नगरचे किल्ल्याचा आश्रय केला. बाकीच्यांनीं आणखी कोठें जाऊन जीव बचावले. अशा रीतीनें मलिकंबरास अपेक्षेबाहेर यश मिळून त्याची चहूंकडे दहशत बसली. दुसऱ्या वर्षी मुल्कमैदान तोफ आणून तिच्या साह्यानें त्यानें १५-६-१६२५ रोजीं सोलापुर हस्तगत केलें.

मलिकंबराचें सर्वांगीण शहाणपण भातवडीच्या प्रसंगानें उत्कृष्ट निदर्शनास आलें. सुमारें एक वर्ष पावेतों हा हातघाईचा सामना हळू हळू बनून येत होता. आरंभीं सर्व गोष्टी अंबरास प्रतिकूळ असतां त्यानें प्रत्येक बाब आपणास पाहिजे तशी घडवून आणिली. दोहोंकडून चालून येणाऱ्या फौजांच्या चिमट्यांत सांपडलेला हा गृहस्थ निश्चित अपयशाऐवजीं प्रचंड विजय संपादूं शकला हें केवळ त्याच्या बुद्धीचें सामर्थ्य होय. स्थल आणि वेळ हे तर त्यानें आपल्या सोईचे बनवून ते प्रतिपक्षावर लादले. भातवडीचें स्थल त्यानें होऊन पसंत केलें. पावसाळ्याच्या अखेरीचे दिवस त्यानें संग्रामासाठीं मुद्दाम निवडले. नाना प्रकारच्या युक्त्यांनीं त्यानें प्रतिपक्षास हैराण केलें, आणि मोगल, आदिलशहा व कांहीं अंशीं कुत्बशहा अशा तीन राज्यांच्या या संघावर मात केली. मुल्ला महंमद म्हणजे आदिलशाहीचा मोठा नामांकित मुत्सद्दी. तो इतका हताश होऊन गेला होता कीं, आपणांस मृत्यु येईल तर बरा अशीच त्याची स्थिति बनली होती. भातवडीच्या युद्धानें निजामशाहीचा बचाव झाला, म्हणून इतिहासांत हा प्रसंग महत्त्वाचा गणतात. †

§ या उदारामाचें व जाधवरावाचें ऐकमत्य होतें. शि. च. सा. ४–७३१ यांत उदारामानें तलाव बांधल्याचा निर्देश आहे.

† जेधे शकावलींत या संग्रामाची नोंद आहे ती अशी:–' शके १५४६ रक्ताक्षी कार्तिक मासीं मोगलांचा सुभेदार लष्करखान व येदिलशाही मुल्ला महंमद ऐशी दोन कटकें मलिकंबरें बुडविलीं.' अर्थात् जेधे-भोसल्यांचा उदय दाखविणाऱ्या या महत्त्वाच्या प्रसंगानें जेधे शकावलीचा आरंभ झाला आहे. फारसी ग्रंथांत या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४ शहाजीचा आदिलशाहींत प्रवेश.—मलिकंबरानें मोगलांशीं पंचवीस वर्षें जो हा प्रचंड झगडा केला, त्यांत मालोजी व शहाजी हे पितापुत्र उत्साहानें सामील झाले, आणि त्याच कारणानें त्यांस युद्ध व राजकारण या दोन विषयांचा जो बहुमोल अनुभव मिळाला, तो पुढें शिवाजीस मार्गदर्शी झाला. भातवडीच्या युद्धानें शहाजीची प्रतिष्ठा वाढून त्याला वगळून दक्षिणेंत कोणतेंही राजकारण सिद्धीस नेणें अशक्य झालें. मुख्यतः गनिमी काव्याची युद्धपद्धति हें एक उत्कृष्ट साधन अनुभवानें सिद्ध झालें. एकदम समोर सामना न करितां शत्रूस दाणावैरणीचा तोटा पाडून जंगली प्रदेशाच्या आश्रयानें त्यास जिंकावयाचें, हा जो क्रम पुढें शंभर दीडशें वर्षें मराठ्यांत रूढ झाला, त्याचा आरंभ वरप्रमाणें झालेला आहे. जहांगीर, शहाजहान व औरंगजेब या त्रयींवर मराठ्यांनीं या प्रयोगानें मात केलेली आढळते.

तूर्तच्या प्रसंगीं मात्र शहाजीचा पराक्रम पाहून मलिकंबरास तो डोईजड वाटूं लागला. तारुण्याचें रक्त शहाजीचे अंगीं सळसळत असल्यामुळें उभयतांत धुसपूस

संग्रामांत प्रमुख भाग घेणाऱ्या शहाजी भोसल्याची हकीकत आढळत नाहीं. तें वैगुण्य शिवभारतकारानें भरून काढिलें आहे. वरील विवेचनांत नानाविध सरदारांच्या लांब नामावळ्या मुद्दाम दिल्या आहेत. यांपैकीं बरेच सरदार शहाजीच्या आयुःक्रमाशीं संबद्ध असून त्यांपैकीं कित्येकांचा निर्देश पुढें प्रसंगानुसार येणार आहे. भातवडीच्या संग्रामांत मलिकंबरास यश मिळवून दिल्याचें मुख्य श्रेय शिवभारतकारानें शहाजीचे पदरांत टाकलें आहे; पण फारसी हकीकतींत त्याचें नांव नसलें तरी मोगल व आदिलशाही सरदारांचीं मिळून सुमारें पंचवीस तीस मुसलमानी नांवें फारसी इतिहासांत दिलेलीं असून त्यांतलीं निदान पंधरा तरी नांवें शिवभारतांत आहेत. शिवभारत व जेधे शकावली हे दोनही ग्रंथ मूळचे एकाच आधारानें तयार झाले हें उघड आहे. भातवडीच्या प्रसंगांतलीं मलिकंबराच्या व मोगलपक्षांतील हिंदूंचीं नांवें शिवभारतांत आढळतात तीं हीं:— शहाजी, शरीफजी, विठोजीचे सात मुलगे, विठूजी काटे, दत्ताजी नागनाथ, मंबाजी, नरसिंहराव पिंगळे, हंबीरराव चव्हाण, मुधोजी फलटणकर, जगदेवपुत्र इत्यादि. मोगलांकडे गेलेल्या पुढील हिंदु सरदारांचीं नांवें शिवभारतांत आढळतात,—राजा ढुंढीराज, उदाराम ब्राह्मण, दादाजी विश्वनाथ व जाधव रघूजी, अचलोजी, यशवंतराव व बहादूरजी.

शि. भा. ४-१०-२७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्पन्न होऊन शहाजीचा घटकोघटकीं अपमान होऊं लागला. बहुधा मलिकंबरानें त्याची जागीर काढून घेतली, तेव्हां स. १६२५ त त्यानें निजामशहास सोडून आदिलशहाचा आश्रय केला. एका राज्यांत नाराज झालेला सरदार दुसऱ्या राज्यांत गेल्याचीं उदाहरणें त्या वेळीं पुष्कळ आढळतात. मात्र शहाजी विजापुरचे नोकरींत गेला याचा अर्थ तो पुण्याचे बाजूस वावरत नव्हता असा नाहीं. पुण्याची जागीर कशाही प्रकारें टिकवावयाची ही त्याची मोठी उत्कंठा होती. त्यासाठीं निजामशाहीचा पश्चिम प्रदेश जिंकून तुम्हांला देतों असें कांहीं तरी आश्वासन त्यानें आदिलशहास दिलें असावें. त्याच्या या कृतीचें स्पष्ट कारण कोठेंही नमूद नाहीं. मात्र आदिलशहानें त्यास सरलष्कर म्हणजे सेनापति करून मावळांतील प्रदेश हस्तगत करण्याचीच कामगिरी दिली. ता. २८-७-१६२५ च्या पत्रांत सरलष्कर शहाजीनें पुणें परगण्यांतील इनाम जमीन उपाध्यास दिल्याचा हुकूम$ पुण्याचे कारकुनास सोडिला आहे; यावरून तो विजापुरचे तावेदारींत असूनही पुण्याचे कारभारावर आहे हें स्पष्ट होतें. पुढें शहाजीला सजा करण्याचें काम निजामशहानें किंवा मलिकंबरानें हातीं घेऊन त्याजवर फौज पाठविली § आणि सालप्याचे घाटांत त्यास कोंडिलें. या प्रसंगांत त्यास संभाजी मोहित्याचें साह्य होतें. या संभाजीची शिफारस आदिलशहाकडे करून शहाजीनें त्यास तळबीडची देशमुखी देवविली (ता. १०-१-१६२६). यानंतर किंवा किंचित् अगोदर संभाजी मोहित्याची बहीण तुकाबाई इच्याशीं शहाजीचें लग्न झालें, ती त्याची दुसरी बायको होय.

शहाजीचें हें दुसरें लग्न केव्हां झालें हें नक्की कळत नाहीं. तुकाबाईच्या पोटीं एकोजी पुत्र स. १६३० त झाला असा उल्लेख † आहे, त्यावरून शहाजी विजापुरचे नोकरींत गेल्यावर हें लग्न झालें असें मानतां येईल. तसेंच जुन्नरचा श्रीनिवास विश्वासराव याची मुलगी जयंतीबाई इचें लग्न शहाजीचा वडील पुत्र संभाजी याच्याशीं पुढें केव्हां तरी झालें. म्हणजे जुन्नरास विश्वासराव उपनामक मराठे घराणें असून त्यांतले विजयराज व श्रीनिवासराव यांच्या मुली एक (दुर्गाबाई) शरीफजीस व दुसरी (जयंतीबाई) संभाजीस अशा केल्या असल्याचें दिसतें. *

$ खं. १५·३९८
§ शि. च. सा. ले. २२
† तं. शि. ले.
* पहा शिवाजीप्रताप पृ. ५०; शिवभारत ८.१०–१५, २·६५; व तं. शि. ले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिवाजी हाच जिजाबाईचें शेवटचें अपत्य होय. कारण तुकाबाई शहाजीच्या जवळ नांदूं लागल्यावर जिजाबाई नवऱ्यापासून दूर झालेली आढळते. शिवाजी व एकोजी या सावत्र बंधूंमध्यें रहस्य असें कधींच नव्हतें आणि पुढें पुष्कळदां त्यांजमध्यें उघड रणसंग्राम झाले, त्याचीं कारणें या आरंभींच्या परिस्थितींत शोधलीं पाहिजेत.

पुण्याजवळील मावळच्या सरहद्दीवरील प्रदेशावर निजामशहा व आदिलशहा आपापले हक्क सांगत असत. आतां आदिलशहाच्या तर्फेनें तो प्रदेश जिंकण्यास शहाजी आला, तेव्हां मलिकंबरानें त्यास विरोध केला. कानदखोऱ्याच्या मरळ देशमुखास मलिकंबरानें विजापुरी फौजेवर रवाना केलें. ता. ४-२-१६२६ रोजीं त्यांची लढाई $ झाली. पुढें लवकरच म्हणजे ता. १४-५-१६२६ रोजीं मालिकंबर मरण पावला आणि त्याचा पुत्र फत्तेखान निजामशाहीचा कारभार पाहूं लागला, तेव्हां मावळांतील मसलतीकरितां विजापुराहून आगा हैदर निजामशहाकडे आला § (सेप्टेंबर स. १६२६). अशा परिस्थितींत खुद्द शहाजहान जीव वांचविण्यासाठीं निजामशहाचे आश्रयास येऊन राहिला, तो प्रकार प्रथम सांगितला पाहिजे.

नूरजहाननें महाबतखानास हाताशीं धरून शहाजहानचा पाडाव केला, पण त्या योगानें महाबतखानाचें प्रस्थ वाढून त्याची नवीनच धास्ती नूरजहानला उत्पन्न झाली. महाबतखान व पर्वीज ह्यांची हुकमत फौजेवर होती. म्हणून नूरजहाननें महाबतखानास काढून त्याचे जागीं खानजहान लोदी यास पर्वीजजवळ नेमून त्यांचे हातीं फौज दिली, त्यावरून महाबतखानानेंही बंडखोरी आरंभिली, ती शहाजहानच्या पथ्यावर पडली. मलिकंबर मरण पावल्यानें शहाजहानचा दक्षिणेंतला आधार तुटला, म्हणून त्यानें पुनः एकवार नशिबाची परीक्षा पाहण्याकरितां, पूर्वी हुमायुनानें स्वीकारलेल्या मार्गाचा अवलंब करून, सिंध प्रांतांतून इराणास जाण्याचा प्रयत्न केला. पण इराणच्या शहानें त्यास मदत करण्याचें नाकारिलें, त्यामुळें सिंध-प्रांतांत निभाव न लागतां तो स. १६२६ च्या नोव्हेंबरांत परत नाशकास आला. तेथें बंधु पर्वीज मरण पावल्याची बातमी कळून त्याची चिंता दूर होणार तोंच खुद्द त्याची प्रकृति एकाएकीं बिघडली, म्हणून त्यानें मूर्तजा निजामशहाचीं आर्जवें करून जुन्नरास राहण्याची परवानगी मिळविली; आणि त्या ठिकाणीं एक टोलेजंग सुंदर वाडा

$ खंड १६·१२

§ खंड १५·३३२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मलिकंबरानें बांधिला होता, त्यांत शहाजहान येऊन राहिला. तेथून त्यानें विजापुर येथें इब्राहिम आदिलशहास गोडगोड पत्रें लिहून खूष ठेविलें; आणि इब्राहिमनेंही पैसा व सामान पाठवून शहाजहानचा परामर्ष घेतला. शंहाजहान जुन्नरला असतांच इब्राहिम आदिलशहा ता. १२-९-१६२७ रोजीं मरण पावला आणि लगेच पुढें ता. २९-१०-१६२७ रोजीं जहांगीर बादशहा लाहोरनजीक मरण पावल्यानें शहाजहानचे अनिष्ट ग्रह बदलले. मोठ्या पुरुषांचे मृत्यु राजकारणांतलीं परिवर्तनें होत.

शहाजहानचें जुन्नरचें वास्तव्य गुप्त रूपाचें होतें. कारण बादशहाच्या फौजा त्याचा माग काढून पकडण्यासाठीं फिरत होत्या. सिंध प्रांतांतून परत येतांना सुरतेवरून तो नाशकाकडे आला तेव्हां त्यानें आपली वायको (मुम्ताजमहल) व मुलें माहीमजवळ अशेरी किल्ल्यावर ठेविलीं आणि त्यांचे रखवालीस विश्वासु राजपूत सरदार गोपाळदास † यास नेमिलें. नूरजहाननें त्यांस पकडण्याचे प्रयत्न पुष्कळ केले, पण त्यांचा थांग तिला लागला नाहीं. ' शहाजहां बागी होऊन जुन्नरास आले ' असा उल्लेख मराठी कागदांत आहे.

शहाजहानचा सासरा बादशहाजवळ वजिरीवर होता, त्यानें अत्यंत सावधपणानें वागून नूरजहानच्या कारस्थानांपासून जांवयाचा बचाव केला. जहांगीर मरण पावल्याची बातमी त्यानें आपला खास दूत बनारसीदास यास जुन्नरास पाठवून शहाजहानास कळविली; आणि त्यास तावडतोब उत्तरेंत येण्याविषयीं सुचविलें. ता. १८ नोव्हेंबर रोजीं शहाजहानास बातमी कळली आणि लगेच ता. २२ रोजीं जुन्नर सोडून त्यानें उत्तरेंत प्रयाण केलें. पुढील २८ जानेवारीस तो आगऱ्यास पोंचला, आणि ४ फेब्रुवारीस पदापन्न झाला.

---

† शहाजानास बादशाही पद मिळाल्यावर त्यानें गोपाळदासाची बढती केली आणि त्याचा मुलगा मनोहरदास यास माहुलीचा किल्लेदार नेमिलें. मनोहरदासानें माहुलीच्या तीन तटांची बंदस्ती करून पुष्कळ वर्षें तेथील कारभार केला. त्याजवर औरंगजेबाची सुद्धां मेहेरबानी होती. पहा—Dr. Modi's paper on Mahuli, *B.B.R. A. S., March 1915*; स. प. पृ. ७०; *Factory Records*; प. सा. ले. २३४, २३५, २५६. शिवजन्मतिथीच्या अनिश्चयामुळें या चारदोन वर्षांतील धडामोडींस विशेष महत्त्व आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इतिहासास कलाटणी देणाऱ्या कित्येक महत्त्वाच्या गोष्टी इ. स. १६२७ सालीं घडल्या हें वरील हकीकतीवरून लक्षांत येईल. इब्राहिम आदिलशहाच्या मृत्यूनें शहाजीचा विजापुरचा आधार डळमळित झाला होता, तो पुरा ढासळण्यास आणखी कारणें घडत गेलीं. कोंकणांतील दाभोळ प्रांत पूर्वी आदिलशहाचा असतां तो मलिकंबरानें जिंकून निजामशाहींत सामील केला होता. तो पुनः परत घेण्यास महंमद आदिलशहानें फौजा रवाना केल्या आणि त्यांचें साह्य करण्यास कान्होजी जेध्यास फर्माविलें $ (मार्च १६२८). या हल्ल्याचें निवारण निजामशहाचा वजीर फत्तेखान याच्यानें होईना, म्हणून मूर्तजानें हमीदखानाच्या सल्ल्यानें फत्तेखानास कैदेंत घातलें, आणि शहाजीस विजापुरांतून परत आपल्या नोकरींत बोलावून आणून पुणें प्रांताची पूर्वीची जागीर त्यास सुप्रत केली. ता. ८-३-१६२८ रोजीं शहाजीनें पुणें परगणा कबजांत † घेतला, यावरून त्यापूर्वीच तो परत निजामशाहींत आला असावा. लखुजी जाधवराव या वेळीं मोगलांचे पक्षांत राहून मुलुखगिरीनें द्रव्यार्जन करण्यांत गुंतला होता. § सारांश, ऐन तारुण्याच्या उमेदींत शहाजीच्या अंगांतील वीर्यतेज नुकतेंच कसें चमकूं लागलें होतें आणि आपली योग्य तजवीज लावून घेण्यासाठीं तो कसा धडपडत होता या गोष्टी त्याच्या वरील चरित्रक्रमांत व्यक्त होतात. लवकरच स्वपराक्रमानें त्यानें मोगल बादशहाच्या प्रचंड सत्तेस कसें दमविलें तो प्रकार पुढील प्रकरणांत सांगण्यांत येईल.

$ प. सा. २५७, २६४–२६८

† प. सा. २६२

§ प. सा. २३८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— ३ —

चहूंकडून कोंडमारा

१ खानजहान लोदीचा बंडावा २ शहाजीनें स्वीकारलेली मोगलांची ताबेदारी ३ शहाजीचा धाडसी डाव, पेमगिरीवर निजामशाहीची उभारणी

१ खानजहान लोदीचा बंडावा (स. १६२९-३१).—शहाजहान बादशहा व शहाजी भोसले यांच्या हालचाली स. १६२८ च्या पुढेंही पहिल्या इतक्याच महत्त्वाच्या आहेत. खानजहान लोदी या अफगाण सरदाराचें नांव पूर्वी आलेंच आहे. हा गृहस्थ भव्य व देखणा परंतु उद्दाम वृत्तीचा व चैनी होता. मागचा पुढचा पोंच व विवेक अंगीं नसल्यामुळें तो गोत्यांत आला. तो सुनी पंथाचा असून हिंदूंचा भारी द्वेष करी. जहांगीरची त्याजवर बहाल मर्जी असल्यामुळें तो बादशाही उमरावांत विशेष प्रसिद्धीस आला. शहाजहान बंडखोरी करून पांच सहा वर्षें भटकत असतां त्याच्या पाठलागावर पर्वीजबरोबर या खानजहानची नेमणूक होती; या मुळेंच खानजहान व शहाजहान यांचें वैमनस्य घडून आलें. पर्वीज स. १६२६ च्या नोव्हेंबरांत मरण पावल्यावर खानजहानची नेमणूक दक्षिणच्या कारभारावर कायम झाली. त्या पूर्वींच जहांगीरच्या शेवटच्या दोन तीन वर्षांत जी अस्वस्थता माजली तींत या प्रांतिक सुभेदारांना निश्चित धोरण राखणें कठिण पडूं लागलें. खानजहाननें तीन लाख रुपये घेऊन बालाघाट प्रांत निजामशहास परत दिला. अर्थात् शहाजहाननें केलेला उद्योग फुकट गेला आणि तो स्वतः खानजहानचें हें वर्तन जुन्नर येथें असतां पाहत होता. खानजहानला मात्र असें वाटत होतें कीं, शहाजहानला बादशाही पद कधींच मिळणार नाहीं, आणि नूरजहानच्या कृपेनें आपण वाटेल तो प्रकार निभावून नेऊं. दक्षिणचा कच्चा कारभार दर्याखान रोहिला याजकडे होता, त्यास बादशहाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दरबारांतील घडामोडींची बिलकूल कल्पना नव्हती. खानजहानची समजूत होती कीं, मुख्य सेनापतीची जागा महाबतखानाकडे आहे, ती आतां आपणांस मिळणार. पण शहाजहानला खानजहानच्या लबाड्या पूर्णपणें अवगत असल्यामुळें तो त्याजबद्दल अत्यंत साशंक झाला. तरी बादशहा होतांच प्रथम त्याजला शहाजहाननें दक्षिणच्या सुभ्यावर कायम केलें, आणि निजामशहानें बळकावलेला प्रदेश परत घेण्याची आज्ञा केली. या कामीं त्यानें अळंटळं चालविलेलें पाहून बादशहानें त्यास आपल्या भेटीस आगऱ्यास बोलाविलें. भेटींत खानाचा उद्धटपणा नजरेस आल्यावरून त्यास कांहीं तरी योग्य सजा करण्याचा विचार शहाजहाननें योजिला. याची बातमी कळतांच ता. ५-१०-१६२९ रोजीं खानजहान आगऱ्याहून पळून गेला. लगेच त्यास पकडण्यास बादशहाचे सरदार चालून आले. चंबळच्या कांठीं लढाई होऊन खानजहानचे दोन मुलगे व एक जांवई मारले गेले; आणि तो स्वतः जीव वचावून दक्षिणेकडे आला. तेव्हां शहाजहाननें इरादतखान यास आजमखान किताब व दक्षिणची सुभेदारी देऊन लोदीचे पाठलागास पाठविलें.

खानजहान दौलताबादेजवळ येतांच निजामशहानें त्याचा सत्कार करून त्यास सर्व प्रकारची मदत दिली. पुष्कळ वर्षें तो इकडे राहिलेला असल्यामुळें त्याच्या ओळखी चांगल्या होत्या. मोगलांच्या नोकरींत असलेले दर्याखानासारखे पुष्कळसे अधिकारी त्याचे स्नेही होते. तेव्हां आपला पूर्ववत् जम बसविण्यास ही संधि चांगली आहे असें मूर्तजास वाटून त्यानें आपला बीड परगणा खानास जागीर दिला आणि तेथें त्याची व्यवस्था लावून दिली. अर्थात् मोगल सेनापति ख्वाजा अबुल हसन खानजहानचा पाठलाग करीत आला, तेव्हां हें बीडचें ठाणें हस्तगत करून तेथून खानजहानचा उठावा करणें ओघास आलें. पुढील संग्राम बीडच्या आसपास झाले त्याचें प्रयोजन या प्रमाणें आहे.

शहाजी भोसले हा या वेळीं निजामशहाचा मुख्य सरदार असून त्याच्या व खानजहानच्या साह्यानें आपण आपलें राज्य पुनः चांगलें व्यवस्थित करूं अशी शहास उमेद आली. जहांगीरच्या उत्तरावस्थेंत मोगलांची सत्ता ढिली पडली होती तसाच प्रकार पुढेंही चालेल असें त्यांस वाटलें. शहाजहानच्या अंगीं विशेष कर्तृत्व दिसून येईल याची त्यांस आरंभीं कल्पना नव्हती. तिकडे शहाजहानलाही कळून चुकलें कीं, आपण या बंडाव्याची उपेक्षा क्षणभर सुद्धां करून उपयोगी नाहीं. उपेक्षा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केल्यास दक्षिणची सर्व कमाई हातची गेली म्हणून समजावें. स. १६१७ पासून दहा बारा वर्षें शहाजहानचीं दक्षिणेंतच गेल्यामुळें त्यास इकडील परिस्थितीची चांगली कल्पना असून बाप-आजांच्या हातून तडीस न गेलेला दक्षिण देश जिंकण्याचा उद्योग प्रथम पुरा करण्याचा त्यानें निश्चय केला. त्यासाठीं निव्वळ सरदारांवर भंरवसा न टाकतां स्वतःच त्यानें हें कार्य स्वीकारिलें. सरदार व फौजा पुढें रवाना करून ता. ३-१२-१६२९ रोजीं त्यानें आगऱ्याहून प्रयाण केलें. नर्मदापार होतांच ता. १२-२-१६३० रोजीं त्यानें आपल्या फौजेची पहाणी केली, आणि आजमखानाचे हाताखालीं निरनिराळे सरदार नेमून त्याचे मदतीस आणखी गुजरातची फौज महाराष्ट्रांत आणिली. ता. १ मार्च रोजीं तो बऱ्हाणपुरास दाखल झाला. बीड हस्तगत करून खानजहान लोदी व त्याचा साथीदार दर्याखान यांस पकडणें आणि निजामशाही जिंकून तो प्रदेश कबजांत आणणें हीं दोन मुख्य कामें त्यास करावयाचीं होतीं त्यासाठीं त्यानें आदिलशहाकडे वकील पाठवून विजापुरची फौज निजामशहावर आणिली आणि आपल्या सरदारांस पृथक् कामगिऱ्या वाटून दिल्या. अशा व्यवस्थेनें उत्तरेकडून मोगल सैन्य व दक्षिणेकडून आदिलशाही सैन्य अशा दोघांनीं एकदम निजामशाही प्रदेशावर चाल केली. आदिलशाही फौजेवर रणदुल्लाखान व कान्होजी जेधे हे मुख्य अंमलदार होते. त्यांनीं ता. २५-१२-१६२९ रोजीं निजामशहाचें शिरवळचें ठाणें हस्तगत केलें; आणि नंतर ते कोंडाणा काबीज करण्यासाठीं चालून आले.†

शहाजहानच्या व्यवस्थेचें प्रचंड व उग्र स्वरूप लगोलग चहूंकडे दिसूं लागलें आणि हा आतां सगळा दक्षिण देश जिंकल्याशिवाय परत जात नाहीं अशी लोकांची भावना झाली. जहांगीरच्या वेळच्या पूर्वीच्या अडचणी या वेळीं कांहीं एक उरल्या नव्हत्या. सर्व बादशाही सत्ता, ऐश्वर्य व संपत्ति यांची जोड शहाजहानच्या उत्साही तारुण्यास मिळून झटपट कार्यभाग उरकण्याचा मनोदय असल्यामुळें आजमखान, ख्वाजा अबुल हसन, शायिस्ताखान, आसफखान, खानजमान, मीर्झा राजा जयसिंग वगैरे शूर व प्रमुख सेनानी त्यानें बरोबर आणिले. तथापि मनुष्यहानि अगर क्रौर्य करण्याचें शक्य तितकें टाळून नुसत्या दबदब्यानें कार्य सिद्धीस नेण्याचा प्रयत्न त्यानें केला. त्यांत खानजहानचा बंडावा लवकर मोडला, पण निजामशाहीचें राज्य मात्र त्यास सुखासुखी प्राप्त झालें नाहीं, हें आतां कळून येईल.

† प. सा. सं. ३००,३०८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ता. १-३-१६३० पासून ता. ६-३-१६३२ पावेतों तब्बल दोन वर्षें शहाजहानचा मुक्काम बऱ्हाणपुरास झाला. याच दोन सालांत दक्षिणेंत मोठें अवर्षण पडून प्रांतांत अन्नान्नदशा उत्पन्न झाली, त्यामुळें एवढ्या प्रचंड फौजांच्या पोटास पुरविणें अशक्य होऊन बादशहास विमनस्कतेनें परत जाणें भाग पडलें. स. १६३० व १६३१ चे दोन पावसाळे कोरडे ठणठणित गेले आणि स. १६३२ सालीं पाऊस पडून पुनः सुबत्ता झाली. या दुष्काळाचीं वर्णनें वाचण्यास सुद्धां भयानक वाटतात, पण परिस्थिति लक्षांत येण्याकरितां त्यांतला कांहीं अंश खालीं देतों.

सस्यं सुदुर्लभमभूत्स्वर्णं तु सुलभं तदा ।
प्रस्थमात्राणि रत्नानि विनिमय्य धनी जनः ॥
कथंचन समाधत्त कुलत्थान्प्रस्थसंमितान् ।
आहाराभावतोत्यर्थं हाहाभूताः परस्परम् ॥
पशून्वै पशवोऽजक्षुर्मानुषा अपि मानुषान् ॥ शि. भा. ८.५३-५५

अर्थः—त्या दुष्काळांत धान्य महाग होऊन सोनें स्वस्त झालें. शेरभर रत्नें देऊन शेरभर कुळीथ मिळण्यास मुष्कील पडे. अन्नाभावानें विव्हल होऊन माणसें माणसांस व पशू पशूंस खाऊं लागले.§

शहाजहानचा मुक्काम दक्षिणेंत असतां हा जो अत्यंत भीषण स्वरूपाचा दुष्काळ पडला त्याचें स्वतः पाहिलेलें वर्णन सुरतच्या एका डच व्यापाऱ्यानें बटेव्हियाच्या डच कौन्सिलास ता. २१-१२-१६३१ च्या पत्रांत लिहून पाठविलेलें आढळतें तें असें :—

'अशा प्रकारची भयंकर महागाई सर्व देशभर पसरलेली कधीं कोणाचे अनुभवांत नाहीं. अवर्षणानें सर्व देशाची धुळधाण उडाली आहे. कितीही पैसा दिला तरी मनुष्यास सुद्धां खाण्यास अन्न मिळत नाहीं, मग जनावरास कोठचें ? पूर्वीच्याहून सात पटीपेक्षां जास्त महर्घता झाली आहे. कोष्टी, धोबी, रंगारी, सुतार वगैरे धंदेवाले घरेंदारें सोडून देशोधडीस गेले. पण बाहेरही त्यांना अन्न न मिळाल्यानें ते बापडे सर्व मरून गेले. अशा या महागाईत बादशहा दक्षिणेंत बसून लढाईची सारखी झोड उठवीत आहे. यामुळें व्यापार तर अजीबात बुडाला. जिकडे जावें तिकडे भुकेबंगालांच्या झुंडीच्या झुंडी वाटा अडवून बसतात. त्यांना जिवाची परवाच कशी ती वाटत नाहीं.

§ एल्यट ७ पृ. २४ यांत असेंच वर्णन आहे. टॉम्प्सन व गॅरेटचा इ० पहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घासभर अन्नासाठीं पाहिजे तो अत्याचार ते बेलाशक करितात. आमच्या फतेमारी पत्रें घेऊन जातात, त्यांतले लोक बहुधा रस्त्यावर मारले जातात; आणि कदाचित् मृत्यूंतून सुटलेच तरी जखमी होऊन त्यांच्याजवळचीं गुप्त पत्रें भलत्याच्या हातांत जातात. या तीन वर्षांत आज एका पैचा सौदा झालेला नाहीं. कोणालाही बाहेर पडावयाचें म्हणजे जिवंत परत कसा येतों ही धास्ती; एक तर बरोबर भरपूर धान्य घेऊन भेटतील त्यांस भिक्षा घातली पाहिजे, आणि न घातली तर मरण्याची तयारी पाहिजे. कारण लोकांचे थवे समोर येऊन आरोळ्या ठोकतात कीं, पोटास तरी घाला, नाहीं तर आम्हांस मारून टाका.'

या मुक्कामांतच शहाजहानची बायको मुम्ताजमहल बऱ्हाणपुर येथें ता. ७-६-१६३१ रोजीं प्रसूतिवेदनांनीं मृत्यु पावली, त्या मुळेंही त्याच्या चालू उद्योगांत पुष्कळसा व्यत्यय आला. त्याचा शोकावेग दोन वर्षेंपावेतों ओसरला नाहीं. मुम्ताजमहलचें दफन प्रथम बऱ्हाणपुरास झैनाबादच्या बागेंत होऊंन पुढें डिसेंबर १६३१ त तिचें शव आगऱ्यास नेलें. बरोबर शहा शुजा गेला. पुढें आगऱ्यास ताजमहालची इमारत उभी होऊन त्यांत त्या बाईचा कायम वास झाला. नंतर स. १६३२ च्या मार्चांत दौलताबाद राजधानी व निजामशाही प्रदेश जिंकण्याचें काम महाबतखानावर सोंपून शहाजहान परत आगऱ्यास गेला. आतां या अवकाशांत दक्षिणेंत काय विशेष प्रकार घडले त्यांचा निर्देश करूं.

२ शहाजीनें स्वीकारिलेली मोगलांची ताबेदारी (स. १६३० डि.–१६३२ मार्च). —शहाजहानच्या प्रचंड तयारीची बातमी निजामशहास कळतच होती. शहाजी भोसले, म्हालदारखान, दादा पंडित, उमरखान वगैरे निजामशाही सरदार खानजहान व दर्याखान यांसह मोगलांशीं सामना करण्यास गेले. मुकर्रबखान हा निजामाचा मुख्य सेनानायक होता. जाधवरावासारखे वजनदार व माहीतगार सरदार आयत्या वेळीं विश्वासघात करितात, तसा प्रकार होऊं नये म्हणून त्यांस पकडून अटकेंत ठेवण्याचा विचार निजामशहानें ठरविला. जाधव मंडळींस त्यानें दौलताबादचे किल्ल्यावर ता. २५-७-१६२९ रोजीं भेटीस बोलाविलें. त्यांस पकडीत असतां विलक्षण दंगल माजली, तींत खुद्द लखूजी, त्याचे दोघे पुत्र अचलोजी व रघूजी आणि नातू यशवंतराव इतके पुरुष मारले गेले. लखूजीची बायको गिरजाई, भाऊ जगदेवराव व मुलगा बहादूरजी एवढे बचावून सिंदखेडच्या गढींत आश्रयार्थ गेले. पुढें शहाजहानास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हा प्रकार कळल्यावर त्यानें या जाधव मंडळींस नोकरींत घेऊन मनसवी ठरवून दिल्या. शहाजीचे चुलत बंधु खेळोजी व मालोजी भोसले हे देखील शहाजहानकडून मनसवी मिळवून त्यास सामील झाले. अशा रीतीनें निजामशहाची बाजू ढांसळत गेली.$

फत्तेखानास कैद केल्यावर मग जाधवरावाचा खून झाला. वरील खुनांत जी मंडळी मारली गेली व ज्या स्त्रिया सती गेल्या त्यांच्या छत्र्या सिंदखेडच्या बाहेर कोटालगत असून भिंतीच्या दगडांवर तत्संबंधीं लेख कोरलेले आहेत. §

स. १६३० च्या उन्हाळ्यांत शहाजहाननें निजामशाहीवर आपल्या फौजा रवाना केल्या, परंतु पावसाळा आल्यामुळें चार सहा महिने विशेष लढणें झालें नाहीं. बीड हेंच लढाईचें मुख्य केंद्र असून खानजहान लोदी जालनापुरावर छावणी करून होता. स. १६३० च्या ऑक्टोबरांत मोगल सेनानी आजमखान लोदीचा तपास काढीत देऊळगांवाहून निघाला. मुख्य संग्राम नोव्हेंबरांत मच्छलीगांव व पिंपळनेर यांचे दरम्यान होऊन बीडचा किल्ला आजमखानानें काबीज केला, तेव्हां खानजहानचा मुख्य आधार नाहींसा होऊन दर्याखानासह तो मागें उत्तरेकडे हटत जाऊं लागला. आतां आपला निभाव लागत नाहीं अशी खात्री होऊन त्यांनीं दौलताबादेस निजामाची शेवटची भेट घेतली; आणि डिसेंबरांत नर्मदा उतरून माळव्यांत प्रवेश केला. त्यांचे पाठीवर अब्दुल्लाखान व सय्यद मुजफ्फर हे बादशहाचे सरदार धावून गेले. सिरोंज जवळ ता. ११-१-१६३१ रोजीं लढाई होऊन दर्याखान मारला गेला. खानजहानचीही वाताहत होऊन बुंदेलखंडांत कालिंजर जवळ त्याचे मुलगे व साथीदार सर्व मारले गेले आणि तो स्वतः ता. १०-६-१६३१ रोजीं प्राणांवर उदार होऊन लढत असतां मृत्युवश झाला.

आपणास मुख्यतः शहाजीचा चरित्रक्रम सांगावयाचा आहे. पण बाह्य घडामोडींत तो कोठें कसा जुळून बसतो हें दाखविण्याकरितां वरील हकीकती थोड्याशा विस्तारानें देणें भाग पडलें. शहाजहानची सत्ता व कर्तबगारी आणि निजामशाहीची दुर्बलता यांची शहाजीस आतां चांगली उमज पडून कोणत्याही प्रकारें आपला बचाव प्रथम करून

$ स तत्र बहुभिर्युध्यन्सपुत्रामात्यः बान्धवः ।
प्रत्युद्यातः सुरगणैः सुरलोकमलोकत ॥ शि. भा. ८·२३–३०
पहा प्रो. पिसुर्लेकर वि. ज्ञा. वि. आक्टोबर १९२६

§ पहा वि. ज्ञा. वि. एप्रिल १९३३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्यावा, मग पुढची बात पुढें पाहतां येईल, अशी त्याची भावना झाली असावी. शहाजहानचे साह्यास विजापुरी फौज घेऊन मुरार जगदेव व रणदुल्लाखान कान्होजी जेध्यासह पुणें प्रांतावर चालून आले. त्यांनीं शहाजीची जागीर सर्व उद्ध्वस्त केली. स. १६३० च्या पावसाळ्यांत मुरार जगदेवानें ' पुणें कसबा वसती जाळून गाढवाचा नांगर पांढरीवर धरिला. पुण्याचा कोट पाडून शहाजीचे वाडे जाळिले व लूट केली ; आणि भुलेश्वराच्या डोंगरावर दौलतमंगळ किल्ला बांधून तेथून पुणें परगण्याचा कारभार आदिलशहाकडून चालावा अशी व्यवस्था ठरविली. ' § येणेंप्रमाणें दहा वीस वर्षें केलेला सर्व उद्योग फुकट गेल्यामुळें मुलामाणसांस राहण्यास सुद्धां कोठें जागा नाहीं अशी स्थिति शहाजीस प्राप्त झाली. खुद्द निजामशहा असत्यवादी व अव्यवस्थित चित्ताचा असून मद्यप्राशनानें उन्मत्त होऊन अधोगतीस चालला होता असें शिवभारतकार लिहितो.† सासऱ्याच्या प्रतिष्ठित कुटुंबाची त्यानें कशी वाट लाविली हें शहाजीस धडधडीत दिसत होतें. आपलीही एखाद्या दिवशीं अशीच गत कशावरून नाहीं होणार अशी त्यास धास्ती वाटूं लागली. इकडे पुणें जळत असतां तो निजामशहाचे आज्ञेनें परिंड्याचे बाजूस मोगलांच्या हालचालींवर नजर ठेवीत होता. दुसरे कित्येक भोसले मोगलांस मिळाले, तसाच संदर्भ आजमखानाकडून शहाजीकडेही चालू होता. तेव्हां तो आपले दोन हजार स्वार घेऊन शेवगांव नजीक आजमखानास जाऊन भेटला. खानानें लगेच बादशहास लिहून त्याजकडून पंचहजारी मनसब व दुसरे मानमरातब शहाजीस देवविले. येणें प्रमाणें शहाजी मोगलांचा तावेदार बनला. ही गोष्ट बीडच्या लढाईनंतर म्हणजे स. १६३० च्या बहुधा डिसेंबरांत घडली.

शहाजी सोडून गेल्यामुळें निजामशहाचें पारडें अगदींच हलकें झालें. आजमखानानें धारूर काबीज केलें आणि मीर्झा राजा जयसिंहास बरोबर घेऊन परिंड्यावर चाल केली. तेथें लूट पुष्कळ मिळाली पण परिंड्यावर आजमखानाचा पराभव झाला. नंतर ता. ७-५-१६३१ रोजीं त्यानें कंधारचा किल्ला लढून घेतला. इकडे अबुलहसननें नासिक व संगमनेर हीं निजामशहाचीं स्थळें काबीज केलीं, तीं शहाजीचे मागणीवरून त्याचे कबजांत दिलीं. म्हणजे शहाजी फिरून आपली जागीर

§ शि. च. प्र. पृ. ७०.

† शि. भा. ८·२५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जमविण्याचे उद्योगास लागला. इतक्यांत विजापुरच्या आदिलशहानें आपलें धोरण बदलिलें. मूर्तजा निजामशहानें त्यास कळविलें कीं, आमचें राज्य संपतांच तुमच्यावर मोगलांची धाड येईल. हा प्रकार खराच होता. निजामशाहीचा मोगलांनीं जिंकिलेला प्रदेश आपणास मिळेल अशी आदिलशहाची अपेक्षा होती ती विफल ठरली. यास्तव त्यानें पुढें निजामशहास मदत करून मोगलांशीं विरोध आरंभिला. तेव्हां शहाजहाननें तावडतोब आसफखानास फौज देऊन विजापुरावर पाठविलें. पण आसफखानाची तेथें बिलकूल डाळ शिजली नाहीं. त्याचा पराभव झाला आणि सर्व फौजेची वाताहत होऊन त्यास परत यावें लागलें. यापूर्वींच दक्षिणचा कारभार महावतखानाकडे सोपून शहाजहान उत्तरेंत निघून गेला. महावतखान उत्तरेंतून येण्यास अवकाश होता, म्हणून त्याचा पुत्र खानजमान यासच तूर्त सर्व मुखत्यारी मिळाली.

इकडे मोगल फौजा निजामशहाचे प्रांत भराभर जिंकूं लागल्यामुळें त्याची त्रेधा उडाली. फत्तेखानाची बहीण निजामशहाची बायको होती. तिनें आपल्या भावास सोडण्याचा आग्रह चालविला आणि इतर पुष्कळांनीं फत्तेखानास सोडून त्याचे हातीं कारभार देण्याची सल्ला दिल्यावरून मूर्तजानें त्यास कैदेंतून मुक्त करून कारभारावर रुजू केलें (ता. १८-१-१६३१). स. १६२८ च्या मार्चपासून जवळ जवळ तीन वर्षें फत्तेखान कैदेंत होता. पण सुटकेनंतर त्याचें शहाशीं बिलकूल पटलें नाहीं. त्यानें मूर्तजास प्रतिबंधांत ठेविलें आणि तेथेंच पुढें दोन महिन्यांनीं शहाचा खून झाला (मार्च, १६३१). नंतर फत्तेखानानें मूर्तजाचा अल्पवयी मुलगा हुसेन निजामशहा यास तख्तावर बसवून मोगलांशीं तहाचें बोलणें चालविलें. फत्तेखानास वश केला कीं, दौलताबाद हातीं येण्यास अवकाश लागणार नाहीं, अशा समजुतीनें त्याच्याशीं मोगलांनीं स्नेहाचें वर्तन ठेवून शहाजीची जागीर काढून ती फत्तेखानास दिली त्यामुळें शहाजी अत्यंत संतापून गेला. स्वतःच्या मालकीची जागा असावी आणि अब्रूनें दिवस काढतां यावे, अशा हेतूनें चहूंकडून कोंडमारा होऊन तो मोगलांचे पक्षास मिळाला होता. पण विजापुरावर मोगलांची डाळ शिजली नाहीं, उलट निजामशाहीच्या बचावासाठीं आदिलशहा तयार झाला असें पाहून, शहाजी मोगलांची ताबेदारी सोडून परत निजामशाहींत आला. शहाजहान उत्तरेंत निघून गेला, त्याच सुमारास शहाजी परत आला, म्हणजे सुमारें दोन सव्वादोन वर्षें तो मोगलांकडे होता असें दिसतें. परत येतांच निजमशाहीचें संरक्षण करण्यास त्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कंबर बांधिली, आणि त्यासाठीं पुढील तीन चार वर्षांत जे युद्धकलेचे व राजकारणाचे व्यूह व डाव त्यानें रचिले व लढविले, त्यांत त्याचें धाडस व बुद्धिमत्ता हे गुण उत्कृष्ट व्यक्त झाले.

आसफखानास विजापुरावर मार खाऊन परत यावें लागल्यामुळें दक्षिणेंतील सत्तांना नवीन हुरूप प्राप्त झाला आणि सर्वांनीं एकमतानें झुंज केलें तर मोगल बादशहास परत फिरविणें शक्य आहे असें वाटून ते त्या उद्योगास लागले. फत्तेखानाच्या हातून निजामशाहीचा बचाव होणार नाहीं असें प्रत्ययास आल्यावर शहाजीनें रणदुल्लाखान व मुरार जगदेव यांच्या मार्फत विजापुरकरांशीं सख्य जोडिलें, आणि शहाजहानची पाठ फिरतांच त्यांनीं मोगलांवर चढाई आरंभिली. महावतखानाकडे मुख्याधिकार बादशहानें सोंपिला होता, तो उत्तरेंत असून त्याचा मुलगा खानजमान अधिकारावर होता. गाळणा किल्ला शहाजी घेणार होता तो खानजमाननें हातचा जाऊं दिला नाहीं. पुढें १-३-१६३३ रोजीं महावतखान दौलताबादेवर चालून आला. त्या वेळीं रणदुल्लाखान, मुरारि पंडित व शहाजी यांनीं दौलताबादचा बचाव करण्यांत शिकस्त केली. पण खानानें ता. १७-६-१६३३ रोजीं किल्ला काबीज करून फत्तेखान व हुसेनशहा यांस बादशहाकडे रवाना केलें. बादशहानें हुसेनशहास ग्वालेरीवर कैदेंत ठेवून फत्तेखानास आपले पदरीं मोठी मनसब दिली.

दौलताबादचा किल्ला हातीं आल्यानें निजामशाहीचें राज्य संपलें असें महावतखानास वाटत होतें, तो त्याचा अंदाज साफ चुकला. उलट शहाजीनें रणदुल्लाखान व मुरार जगदेव यांस मिळून मोगलांवर चढाई चालविली याचें महावतखानास अत्यंत वैषम्य वाटूं लागलें; आणि प्रथम तो शहाजीचाच पिच्छा पुरवूं लागला. शहाजीची बायको व मुलगा जुन्नरचे किल्ल्यावर होता, त्यांस पकडून ठेविलें म्हणजे तो वठणीस येईल अशा विचारानें त्यानें त्रिंबकचा किल्लेदार म्हालदारखान यास ती कामगिरी सांगितली. हा म्हालदारखान शहाजी व जिजाबाई यांच्या परिचयाचा होता. तो जिजाबाईचे भेटीस म्हणून गेला; पण त्याचा व्यूह अगोदरच ओळखून तिनें बालशिवाजीला गुप्तपणें शिवापुरास पाठवून दिलें, म्हणून तो खानाचे हातीं सांपडला नाहीं. जिजाबाईस मात्र त्यानें पकडून नेलें. परंतु तिचा चुलता जगदेवराव जाधव मोगलांकडे होता, त्यानें महावतखानास कळविलें कीं, 'शहाजी व जिजाबाई यांचें बिलकूल पटत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. त्यानें दुसरी बायको केली असून जिजाबाई त्याजवळ नांदत नाहीं, म्हणून हिला कैदेंत ठेवल्यानें शहाजीस उलटें वरें वाटेल. मात्र तेणेंकरून आम्हा जाधवांचा अपमान होतो. तर तिला सोडून द्यावी.' त्यावरून तिची सुटका झाली असा मजकूर बखरींत आहे. ‡

३ शहाजीचा धाडसी डाव, पेमगिरीवर निजामशाहीची उभारणी

(सेप्टें. १६३३).—दौलताबादचा किल्ला मोगलांचे हातीं पडला, तरी निजामशाहीचा पश्चिमेकडील डोंगरी प्रदेश अद्यापि मोकळा होता, तो ताब्यांत घेऊन शहाजीनें निजामशहाचा एक नातलग पुढें करून पेमगड § ऊर्फ भीमगड येथें त्यास गादीवर बसविलें आणि त्याच्या नांवानें पुनः राज्य उभारलें. पुढें लवकरच शहाजीनें पेमगड सोडून त्या नवीन शहास नेऊन माहुली किल्ल्यावर बंदोबस्तानें ठेविलें; आणि त्रिंबक संगमनेर, जुन्नर जीवधन, वगैरे किल्ले व उदगीर औसापर्यंतचा पूर्वेकडील गोदावरी पावेतोंचा मुलूख कबजांत आणिला. मुरार जगदेवानें पुणें जाळलें, तो प्रकार साफ विसरून त्याच्याशीं शहाजीनें एवढें सख्य जोडलें कीं, भीमा इंद्रायणींच्या संगमीं नागरगांव येथें भाद्रपद व॥ ३० च्या सूर्यग्रहणप्रसंगीं (ता. २३–९–१६३३) मुरारपंतानें आपली तुला केली, त्या समारंभास शहाजी हजर होता. नागरगांवाचें नांव त्या निमित्तानें तुळापुर असें पडलें.*

आपले भरंवशाचे लोक जमवून फौज ठेवणें, किल्ल्यांची बंदस्ती करणें, शत्रुपक्षीय

‡ या गोष्टीस ग्रँट डफनें विजापुरी कागदांचा आधार दिला असून किंकेडनेंही तिचें वर्णन केलें आहे. वैजापुर येथें जिजाबाई मोगलांचे कैदेंत पडली असे बखरकारांचे उल्लेख आहेत. जुन्नरचा श्रीनिवासराव वगैरे कित्येक इसम निजामशाहीच्या विरुद्ध वागत होते त्यांस शहाजीनें पकडलें होतें; त्या धांदलींत जिजाबाई देखील स. १६३३ च्या सुमारास पकडली गेली असावी.

§ अहंमदनगरचे पश्चिमेस संगमनेरजवळ सध्यांचे पेमगिरी.

* असें सांगतात कीं, मुरारपंताचे अंगावर कुष्ट होऊन तो फार दुःखी झाला. नागरगांव येथें रुद्रनाथ म्हणून एक सत्पुरुष होता, त्याच्या दर्शनानें व संगमावर स्नान केल्यानें त्याचा रोग बरा झाला; आणि तेथें पंतानें संगमेश्वर म्हणून देवालय बांधिलें तें अद्यापि विद्यमान आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरदार फोडणें, मावळे देशमुखांस हाताशीं धरणें, आदिलशाही अंमलदार रणदुल्लाखान ऊर्फ रुस्तुमजमा, मुरार जगदेव इत्यादिकांशीं स्नेह जोडणें, अशा युक्त्यांनीं सह्याद्रींतील डोंगराळ प्रदेशाच्या आश्रयानें शहाजीनें मोगलांशीं प्रचंड झगडा आरंभिला. त्याचा उद्देश एवढाच होता कीं, मोगलांनीं नर्मदेअलीकडील प्रदेशांत संबंध ठेवूं नये; इकडे तीनशें वर्षें स्वतंत्र राज्यें नांदत आहेत, तीं आपला कारभार आपण पाहून घेतील. अशी ईर्ष्या धरून शहाजीनें जो नेटाचा उद्योग चालविला, त्याचें फल जरी त्यासच मिळालें नाहीं, तरी या प्रयोगानें मराठी राष्ट्राला आपलें सामर्थ्य कळून आलें. एकीनें वागल्यास आपण प्रचंड मोगली सत्तेससुद्धां पुरे पडूं असा आत्मविश्वास त्याचे ठिकाणीं उत्पन्न झाला, आणि तोच पुढें शिवाजीच्या उपयोगी पडला यांत संशय नाहीं.

शहाजीचा हा उपक्रम महाबतखानास अत्यंत असह्य वाटूं लागला आणि विजापुरचा पाठिंबा शहाजीस मिळत होता तो कसेंहा करून तोडण्याची खटपट तो करूं लागला. परिंड्याचा मजबूद किल्ला पूर्वी निजामशहाकडे असून तो आतां आदिलशहानें घेतला होता. जयसिंह व आजमखान यांसही तो हस्तगत झाला नव्हता. तो जर आपण काबीज केला तर निजामशहा व आदिलशहा यांचे दरम्यान एक मोठी पाचर आपणांस उत्पन्न करितां येईल आणि त्यांचें जूग फुटेल असें मनांत आणून महाबतखानानें हा बेत बादशहास कळविला, आणि त्या कामीं मोठी फौज उत्तरेंतून मागविली. दक्षिण देश जिंकण्याची तीव्र आतुरता शहाजहानास असल्यामुळें त्यानें आपला पुत्र शुजा यास मोठ्या तयारीनें इकडे पाठविलें. तो येतांच महाबतखानानें थेट बऱ्हाणपुरपासून जफरनगर, जालनापुर, शहागड, बीड इत्यादि ठिकाणीं आपल्या फौजांची रांग बांधून पाया मजबूद केला; आणि पुत्र खानजमान यास पुढें परिंड्यावर पाठवून मागाहून महाबतखान व शुजा दोघेही तेथें दाखल झाले. परंतु शहाजी व विजापुरी सरदार यांनीं सभोंवारचा मुलूख मारून मोगल फौजेची अशी उपासमार केली कीं, शुजा व महाबतखान यांचा परिंड्यावर बिलकूल इलाज न चालतां पदरीं नामुष्की घेऊन ते परत बऱ्हाणपुरास गेले. एवढ्या खटपटीचा असा विपरीत परिणाम झालेला ऐकून शहाजहान संतापून गेला. त्यानें महाबतखानास ठपका दिला तो सहन न होऊन रोगानें पीडलेला तो खान स. १६३४ च्या ऑक्टोबरांत मरण पावला. शहाजादा शुजा परत गेला आणि दक्षिणच्या कारभारावर खानडौरान या सरदाराची नेमणूक झाली. या बनावानें शहाजीस आणखी स्फुरण चढलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घरभेदेपणामुळें शत्रूचें कसें फावतें हा अनुभव नित्याचा आहे. विजापुरास खवासखान म्हणून प्रधान होता, त्याचें व आदिलशहाचें वितुष्ट आलें, तेव्हां खानानें स. १६३५ त शहाजहानकडे आपला गुप्त वकील पाठवून कळविलें कीं, आपण विजापुरावर फौजा पाठवा म्हणजे हेंही राज्य आपल्या सहज हस्तगत होईल अशी तजवीज मी करितों. विजापुरास मुरार जगदेव व खवासखान हे एक विचारानें वागणारे होते. खानाच्या या हालचाली महंमद आदिलशहाचे नजरेस आल्यावर त्यानें रणदुल्लाखानाचे साह्यानें खवासखान व मुरार जगदेव या दोघां घरभेद्यांना एक महिन्याचे अवधींत यमसदनाची वाट दाखविली, (१६३५ ऑक्टोबर). याचा परिणाम त्या वेळच्या राजकारणावर कसा झाला तें पुढील प्रकरणीं सांगूं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— ४ —

"इत साहजी हैं उत साहजहां"

१ शहाजहानची दुसरी स्वारी, निजामशाही-विभागणीचा तह
२ माहुलीवरील शेवटचा झगडा, शहाजीचें उद्बोधक
उदाहरण ३ नवीन पराक्रमाचे अंधुक मार्ग

१ शहाजहानची दुसरी स्वारी, निजामशाही-विभागणीचा तह (६-५-१६३६).—निजामशाहींतील शहाजीची वाढती कळा व मोगल सत्तेचें मार्गे येत असलेलें पाऊल पाहून शहाजहानास बिलकूल चैन पडेना. त्यानें पुनः स्वतः दक्षिणेंत जाण्याचा निश्चय केला. ता. २९-९-१६३५ रोजीं आगरा सोडून बुंदेलखंड माळव्यांतून पुढें येऊन त्यानें ता. ४ जानेवारीस नर्मदा ओलांडली; आणि लगोलग दौलताबाद गांठली. बरोबर औरंगजेब, जयसिंह, शायिस्ताखान वगैरे मंडळी असून खानजमान व खानडौरान हे अगोदरच इकडे होते ते त्यास भेटले. आजूबाजूचे सत्ताधीशही त्यास शरण आले. दक्षिणेंत येतांच त्यानें औरंगजेबास मुख्य कारभार देऊन शहाजीचा पाठलाग चालविला. शायिस्ताखानानें चालून येऊन संगमनेर व जुन्नर हीं स्थळें काबीज केलीं; आणि शिवनेरीवर शहाजीचीं बायकामुलें होतीं तीं मोगलांचे हातीं गेलीं. § पण शहाजीनें अशा शिताफीनें शत्रूशीं खेळ चालविला कीं, ते अगदीं हताश झाले. तो पुणें, चाकण, जुन्नर वगैरे स्थळें घेऊन आणि बायकामुलें सोडवून कोंकणांत

§ डॉ. बनारसी प्रसाद सक्सेना यांच्या शहाजहानच्या इतिहासांत बायकामुलें सोडवून आणण्याचा शहाजीनें प्रयत्न केला असें वर्णन आहे. (पृ. १४७). हें पुस्तक नवीनच पुष्कळ आधार जमेस धरून खुलासेवार लिहिलेलें फार उपयुक्त आहे. वर सांगितलेल्या बऱ्याच हकीकती त्याच आधारावरून घेतल्या आहेत. वर पृ.४८ येथें म्हालदारखानानें जिजाबाईस पकडल्याचा उल्लेख आहे, तो प्रसंग हाच असेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माहुली किल्ल्यावर गेला. तिकडे मोगल गेले तेव्हां दुसऱ्याच वाटेनें वर येऊन त्यानें पाठलाग करणारांस चकविलें. या पाठलागांत शायिस्ताखानाबरोबर औरंगजेबही होता.

पण शहाजीला विजापुरचा आधार मिळे तो बंद करण्याचें काम शहाजहाननें प्रथम अंगावर घेतलें. त्यानें आदिलशहा व कुत्बशहा यांजकडे पत्रें देऊन आपले वकील रवाना केले. त्यांतील मतलब असा कीं, 'तुम्ही आमचें मांडलीकपण पत्करून दरसाल खंडणी देण्याचें कबूल कराल, तर आम्ही तुमच्या वाटेस जाणार नाहीं. नाहीं तर आम्ही तुमचीं राज्यें साफ जिंकून घेऊं.' असें दरडावणीचें पत्र जातांच आणि शहाजहानची तयारी व तडफ ओळखून कुत्बशहानें वरील अटी मान्य केल्या (एप्रिल १६३६). परंतु आदिलशहाला शहाजीचा मोठा भरंवसा वाटत असल्यामुळें त्यानें बादशहाच्या दरडावणीस न जुमानतां रणदुल्लाखानास फौज देऊन शहाजीची कुमक करण्यास पाठविलें. शहाजीची व रणदुल्लाची गांठ पडण्यापूर्वीच मोगलांनीं आदिलशाही फौजेवर चाल करून रणदुल्लाचा पराभव केला; आणि पुढें खुद्द विजापुरावर नेट चालविला. तेव्हां आदिलशहानें आजूबाजूचा मुलूख जाळून अशी सावधगिरी केली कीं, मोगलांस अन्नपाणी सुद्धां मिळूं नये.

हा प्रकार ध्यानांत घेऊन शहाजहाननें शहाणपणा करून विजापुरचा नाद सोडून दिला. त्यास कळून चुकलें कीं, तूर्त निजामशाहीचा ग्रास पुरता पदरांत पाडून घ्यावा; आणि शहाजीस विजापुरचा पाठिंबा मिळतो तेवढाच बंद करावा. अशा विचारानें त्यानें पुनः आपले वकील विजापुरास पाठवून आदिलशहास कळविलें कीं, 'आम्हांस तुमच्या वाटेस जाण्याची विलकूल इच्छा नाहीं. निजामशाही राज्य आम्हीं जिंकलें आहे, तेवढें काम पुरें करून आम्ही परत जाणार. तुम्हीं शहाजीचे साह्यास फौज पाठविली आहे ती एकदम परत बोलवा. निजामशाहींत मात्र शहाजीचा खेळ आम्ही चालूं देणार नाहीं. त्यास तुम्ही मनापासून सोडल्यास भीमेच्या पलीकडचा व कोंकणांतला निजाशाहीचा प्रदेश आम्ही सर्व तुम्हांस देऊं. शहाजी देखील निजामशहास आमचे हवालीं करून फितवा बंद करील तर त्याचे वाटेस जाण्याची आमची इच्छा नाहीं. तुम्ही त्यास आपले तैनातींत घेऊं म्हणाल तर त्यासही आमची हरकत नाहीं. मात्र निजामशाही राज्य आम्ही पुनः कोणासही पचूं देणार नाहीं, हा आमचा निर्धार आहे. त्यासाठीं शहाजीशीं आम्हांस लढणें प्राप्त आहे; आणि त्या कामीं तुम्ही आपली फौज आमचे मदतीस पाठविली पाहिजे. असें हें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नरमाईचें बोलणें बादशहाकडून येतांच आदिलशहास जास्त ओढून धरण्याचें कारण उरलें नाहीं. त्यानें लगेच रणदुल्लाखानास विजापुरास बोलवून घेतलें, आणि बादशहाकडून लिहून आलेल्या अटींस मान्यता लिहून दिली (६ मे, १६३६). तदनुसार तह§ कायम झाला तो सोनेरी पत्र्यावर खोदलेला आहे. त्यांत मुख्य कलमें दोनच आहेत तीं अशीं:— (१) आदिलशहानें नजराणा म्हणून वीस लाख रुपये बादशहास द्यावे; आणि (२) शहाजीनें जुन्नर वगैरे स्थळें व किल्ले सोडून दिल्यास त्यास आदिलशहानें आपले नोकरींत घ्यावें. पण आपण होऊन त्यानें स्थळें व किल्ले न सोडल्यास तीं जिंकण्याचे कामीं आदिलशहानें आपली फौज मोगलांचे साह्यास पाठवावी. यांशिवाय प्रदेशाच्या वांटणीचीं कलमें तहांत आहेत तीं अशीं कीं, सोलापुर, वांगी, परिंडा, मालकी, चिद्गुपा आणि पुणें चाकण धरून निजामशाहीचा कोंकणचा भाग म्हणजे सुमारें ८० लाख उत्पन्नाचा निजामशाहीचा मुलूख आदिलशहास मिळावा आणि बाकीचा सर्व मोगल राज्यांत सामील व्हावा. असा तह पुरा करून दिल्यावर शहाजहाननें दक्षिणच्या कारभारावर औरंगजेबाची नेमणूक करून त्याचे मदतीस खानजमान व खानडौरान यांस नेमिलें. या मुक्कामांत शहाजहानास दक्षिणेंतील अंब्यांची चटक एवढी लागली कीं, आपणास ते उत्तरेंत नेहमीं पाठवीत जावे अशी कायमची ताकीद त्यानें औरंगजेबास व आपल्या अधिकाऱ्यांस देऊन ठेविली.

२ माहुलीवरील शेवटचा झगडा, शहाजीचें उद्बोधक उदाहरण (ऑक्टोबर १६३६).—आतां फक्त शहाजीचा प्रश्न शिल्लक राहिला. त्या संबंधानें आदिलशहानें बादशहास विनंति केली कीं, 'आपण आतां परत जावें. येथें मोठ्या फौजा घेऊन राहिल्यानें लोकांचे शेतीचे वगैरे धंदे नीट चालत नाहींत. शहाजीच्या हातांत पांच किल्ले आहेत, ते आम्हीच लवकर काबीज करून आपले हवालीं करितों.' ती विनंति मान्य करून शहाजहान ता. ११-७-१६३६ रोजीं दौलताबादेहून निघून परत गेला. अशा प्रकारें अकबरानें अहमदनगरचें राज्य जिंकण्याचा प्रयत्न प्रथम सुरू केला तो सिद्धीस जाण्यास चाळीस वर्षें लागलीं. या चाळीस वर्षांत किती युद्धें व घडामोडी झाल्या त्यांचें वर्णन येथवर केलें आहे. आतां दक्षिणेंत विजापूर व गोवळकोंडा हीं दोन मुसलमानी राज्यें शिल्लक राहिलीं तीं बादशहाच्या हातीं पडण्यास आणखी पन्नास वर्षें लागलीं हें पुढें कळून येणार आहे.

§ हा तह सर जदुनाथ कृत औरंगजेब चरित्रांत विस्तारानें दिलेला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आदिलशहाचा आधार सुटतांच शहाजी उघडा पडला; आणि उभय सत्तांचा जोर त्या एकट्यावर कोसळला. उदगीर व औसा हे निजामशाहीचे दोन किल्ले मोगलांस अद्यापि मिळाले नव्हते. कदाचित् शहाजीनेंच किल्लेदारांस अंतस्थ फूस दिली असावी. खानडौराननें उदगीरवर चाल करून ता. १७-८-१६३६ रोजीं त्यास वेढा घातला; एक दोन सुरुंग उडवतांच किल्ला कबजांत आला. लगेच भोजराज नामक किल्लेदारानें औशाचा किल्लाही खालीं करून मोगलांचे हवालीं केला.

तहांतील करारामप्रमाणें आदिलशहानें लगेच रणदुल्लाखानास शहाजीवर रवाना केलें. त्यासह खानजमान माहुलीवर चालून गेला. येथें सुद्धां शहाजीनें अनेक युक्त्या लढवून चार दोन महिनेच पण जो धावपळीचा अप्रतिम संग्राम प्रचंड फौजांशीं केला, तो युद्धकलेच्या दृष्टीनें अभ्यसनीय आहे. माहुलीवर शहाजीचे चार दोनशेंच लोक होते, पण तितक्यांनीं वेढा घालणाऱ्यांस अत्यंत दमविलें. किल्ल्यावर सर्व प्रकारचा बंदोबस्त करून शहाजीनें राज्याचा कारभारही पूर्वीसारखाच चालविला. अखेरीस नाइलाज होऊन त्यानें सहा किल्ले व निजामशहा यांस खानजमानचे हवालीं करून रणदुल्लाखानाचे मध्यस्थीनें विजापुरास प्रयाण केलें, (आक्टोबर १६३६). या संबंधानें खुद्द शहाजीनें आदिलशहास लिहिलेल्या पत्रांत आधार आहे तो असा कीं, ' मागें रुस्तुमजमा (=रणदुल्लाखान) यांजबरोबर माहुलींहून आम्ही विसा रोजांत सरकारचरणीं दाखल झालों, त्या वेळीं चार लाखांची जागीर आम्हांस दिली. ' § आदिलशहानें शहाजीस पुढें कर्नाटकच्या कामगिरीवर नेमिलें, तो प्रकार त्याच्या उत्तरायुःक्रमांतला आहे. मिळून स. १६३६ च्या दसऱ्याचें सीमोल्लंघन मराठ्यांच्या इतिहासांत अत्यंत स्मरणीय झालें आहे. पारतंत्र्याची सीमा त्यांनीं या मुहूर्तावर ओलांडिली, हें येथें लक्षांत ठेवणें जरूर आहे.

शहाजीच्या चरित्रांतील या महत्त्वाच्या प्रसंगाचा उद्बोधक तपशील जेधे करीण्यांत वर्णिलेला आहे तो असा:—

" पेमगिरि किल्ला ल्हान या करितां पातशहास घेऊन माहुलीस गेले. फौजेनिसी राहिले. तेथें रणदुल्लाखान व खानजमान दुतर्फा वेढा घालून बैसले. कान्होजी नाईक जेधे रणदुल्लाखानासमागमें होते, त्यांणीं अंतस्थें शहाजी महाराजाशीं राजकारण

§ शिवाजी सूव्हनीर, पृ० ११५–१६.

पुस्तकालय गुरुकुल कांगड़ी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राखिलें होतें. किल्ल्यावरी सामान नाहीं. लोकांस उपास पडों लागले, किल्ला जेर जाहला. तेव्हां महाराजांनीं सल्ल्याची बोली घातली. तह जाला कीं, गंगेपलीकडील मुल्क व पातशहा मोगलांस द्यावे. गंगेअलीकडील मुल्क इदलशहाकडे द्यावा, तो महाराजांस जागीर द्यावा महाराजांनीं बारा हजार स्वारांनिशीं चाकरी करून, वजिरी करावी. ऐसी बोली रणदुल्लाखानांनीं विजापुरास लेहून फर्मान आणिला. नंतर महाराज किल्ल्याखालें उतरोन आले. खानाची भेटी जाली. सन्मान जाला. त्यावरी कान्होजी जेधे व दादाजी कृष्ण महाराजांचे भेटीस गेले. महाराज बोलिले, 'तुम्ही मावळांत जबरदस्त देशमुख आहां. मुल्क आपल्याकडे जागीर जाला आहे. मावळाचे देशमुख पुंड आहेत, ते रुजू होऊन अंमल सुरळीत चाले ते करावें.' त्यावरी कान्होजी नाईक बोलिले कीं, खानाजवळून आम्हांस आपल्याकडे मागोन घ्यावें. त्यावरी विजापुरास गेले. पातशहाची भेटी जाली. बोलीप्रमाणे सरंजाम जहाला. त्यावरी रणदुल्लाखानास भीड घालोन कान्होजीस आपणाकडे मागोन घेतलें. महाराजांची चाकरी जमावानिशीं करूं लागले."

हा कान्होजी जेधे भोरजवळच्या रोहिडखोऱ्यांतील कारीचा देशमुख रणदुल्लाचे हाताखालीं विजापूरचे तैनातींत होता. त्याचेच मार्फत खानाचा व शहाजीचा स्नेह जमला; त्यांतून पुढें शिवाजीचा उद्योग निर्माण झाला. मावळांतील देशमुखांचें मन वळवून त्यांचें साह्य शिवाजीस मिळवून देण्याचें कार्य या जेध्यांनीं व त्यांचे देशपांडे गुप्ते यांनीं केलेलें आहे हें पुढें दिसून येईल. रणदुल्लाखानानें शहाजीचा पराक्रम ओळखून त्याची आदिलशहाकडे शिफारस केली आणि विजापुरास सुव्यवस्था लाविली. पुणें प्रांताची जी जागीर निजामशाहींतून पूर्वी शहाजीकडे होती तीच सर्व आदिलशहानें त्याजकडे कायम ठेविली. त्या संबंधानें खालील उल्लेख जेधे शकावलींत आहे. 'शके १५५७$ शहाजी राजे भोसले यांसी बारा हजार फौजेची सरदारी इदलशहाकडून झाली. सरंजामास मुल्ख दिल्हे त्यांत पुणें देश राजांकडे दिल्हा. त्यांनीं आपले तर्फेनें दादाजी कोंडदेऊ मलठणकर यांसी सुभा सांगून पुणियास ठाणें घातलें, तेव्हां सोन्याचा नांगर पांढरीवर धरिला, शांति केली. मग दादाजीपंतीं पुणें कसब्याची व गांवगन्नाची वसती केली. कौल पांच वर्षें दिल्हे. सहावे सालीं तनखा घेतला.

$ श. १५५८ पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शहाजी राजे विजापुर प्रांतीं गेले.' पुणें हें मराठी राज्याचें केंद्र कसें बनलें आणि युद्ध थांबतांच शहाजीचें लक्ष मुलखाच्या आवादानीकडे कसें लागलें हें यावरून दिसून येईल. अशा प्रकारें दिल्लींद्राशीं मोठ्या हिंमतीनें चालविलेला पंधरा वर्षांचा हा सामना आवरून घेऊन शहाजीनें आपला पूर्वायुःक्रम पुरा केला. इतउत्तर रणदुल्लाखानानें व शहाजीनें एकविचारें वागून कर्नाटकांत आदिलशाहीची सत्ता वाढविली तो प्रकार पुढें सांगावयाचा आहे. रणदुल्लाखानास रुस्तुमजमा हा किताब आदिलशहानें दिला होता, तोच पुढें त्याच्या मुलास मिळाला. वडिलांचा आनुवंशिक ऋणानुबंध पुढें त्या उभयतांच्या पुत्रांनीं कसा चालविला तें उत्तरोत्तर व्यक्त होईल.

शिवाजीनें निर्मिलेल्या स्वराज्याचा उगम शहाजहान व शहाजी यांच्या करामतींतील पार्श्वभूमींतून झालेला आहे ही गोष्ट येथवरच्या वर्णनावरून स्पष्ट होते. याच ठिकाणीं या दोन व्यक्तींचा संबंध तुटून तो पुढें त्यांच्या पुत्रांत अवतीर्ण झाला. या दोन व्यक्ती सतराव्या शतकांतील हिंदुस्थानचा इतिहास बनविण्यांत अग्रगण्य होत्या ही गोष्ट केवळ आजच नवीन संशोधनानें सिद्ध होत आहे असें नसून, तत्कालीन कवीला देखील ती निखालस दिसत होती हें राधामाधव-विलास-चंपूंतील जयराम पंडिताच्या खालील उक्तींत ठळकपणें दिसून येते. तो म्हणतोः—

'जगदीश विरंचिकु पूछत हैं, कहो सृष्टि रची, रखे कोन कहां।
शशि वो रवि पूरब पश्चिम लों, तुम सोय रहो सिरसिंधु महां।
अरु उत्तर दच्छिन रच्छनकों इत साहजि हैं, उत साहजहां'॥ †

या दोन व्यक्तींचा ऐतिहासिक अभिनिवेश कवीनें कल्पिलेला आहे, या वरून त्यांचें कर्तृत्व व्यक्त होतें. शहाजहानचा जन्म इ. स. १५९२चा व मृत्यु स. १६६६ चा, आणि शहाजीचा जन्म स. १५९४ व मृत्यु १६६४ चा, हे त्यांचे ७४ व ७२ वर्षांचे हयातकाल लक्षांत घेतां आणि स. १६१६ पासून पुढें वीस वर्षें

---

† भगवंतांनीं ब्रह्मदेवास प्रश्न केला कीं, सृष्टि निर्माण केली, पण तिच्या संगोपनाची तजवीज काय ठरविली? त्याला ब्रह्मदेवानें जबाब दिला कीं, 'पूर्व पश्चिम दिशांस चंद्रसूर्य आहेतच; आणि दक्षिणेंत शहाजी व उत्तरेंत शहाजहान यांची योजना करण्यांत आली आहे, आपणांस कांहीं एक चिंता करण्याचें कारण नाहीं. आपण खुशाल क्षीरसागरांत शयन करा.'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पावेतों जो यांचा झगडा चालला त्याचा विचार करितां, वरील कवन केवळ कविकल्पना नसून तें बरेंच वस्तुस्थितिनिदर्शक आहे हें लक्षांत आल्यावांचून राहत नाहीं. ऐश्वर्याच्या मानानें जरी शहाजी व शहाजहान यांजमध्यें मोठी तफावत असली, तरी पराक्रमाच्या दृष्टीनें ते आपापल्या क्षेत्रांत समसमान होते या विषयीं संशय घेण्यास जागा नाहीं. शहाजहान सबंध वर्षभर जुन्नरास राहिला असतां त्यास शहाजीच्या कर्तबगारीची पूर्ण ओळख झाली असली पाहिजे; आणि सन १६३६ त त्यास पुनः दक्षिणेंत स्वारी करावी लागली ती सुद्धां शहाजीमुळेंच. नाहीं तर दौलताबादचा किल्ला स. १६३३ त महाबतखानानें काबीज केल्याबरोबर निजामशाही संपलीच होती. त्या पुढील तीन वर्षांची भानगड केवळ शहाजीनें उत्पन्न केली; आणि प्रचंड शक्तीच्या दिल्लीपतीला आळा घालणें यःकश्चित् दक्षिणी जागीरदाराला कसें शक्य आहे हें जगाच्या निदर्शनास आणून दिलें. एवढेंच नव्हे, तर दुसरा एक शहाणपणा शहाजहाननें केला. शहाजीला कबजांत आणण्याच्या दुराग्रहास तो बळी पडला नाहीं. मावळांतील दुर्गम प्रदेशांत शहाजीचा अंकुर वाढूं देणें इष्ट नाहीं, तो जर दुसऱ्या उद्योगक्षेत्रांत जाईल तर त्यास आपली हरकत नाहीं, असा पोक्त विचार करून बादशहानें शहाजीस विजापुरचे नोकरींत राहूं दिलें, आणि स्वारीचें अवडंबर पुरें केलें. शहाजी हातीं आल्याशिवाय परत जायचें नाहीं असला हट्ट त्यानें धारण केला नाहीं, यांतच तो शहाजीची योग्यता व सामर्थ्य किती ओळखीत होता हें दिसून येतें. असला पराक्रमी सरदार आपल्या हाताशीं असणें हें आपलें सामर्थ्य होय असें आदिलशहालाही वाटलें. म्हणूनच त्यानें त्यास आश्रय दिला, आणि माहुली, शिवनेर, जुन्नर वगैरे स्थळें शहाजीच्या हातीं राहूं द्यायची नाहींत एवढाच बंदोबस्त करून शहाजहान परत गेला. असा समंजसपणा पुढें औरंगजेबानें शिवाजीशीं वागण्यांत ठेविला असता तर भावी इतिहास पुष्कळसा बदलला असता. शिवाजी कोणत्या परिस्थितींत वाढला याची बिनचूक कल्पना येण्याकरितां हा पूर्वीचा इतिहास विशेष विस्तारानें द्यावा लागला. ऐतिहासिक घडामोडींचें हृद्गत कळून येण्यास त्याची अत्यंत जरूर आहे.

३ नवीन पराक्रमाचे अंधुक मार्ग.—दौलताबादेपासून नासिक त्रिंबकावरून वाई साताऱ्यापर्यंतचा पश्चिम महाराष्ट्राचा भूप्रदेश मराठी राज्याचें मुख्य अधिष्ठान कां बनला, हेंही वरील इतिहासावरून चांगलें कळून येईल. भोसले व घोरपडे दोघेही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकाच घराण्याचे वंशज व एकाच धन्याचे सेवक असतां घोरपड्यांचें वास्तव्य मुधोळसारख्या सपाट, सुपीक व संपन्न प्रदेशांत झाल्यानें त्यांचा आयुःक्रम भोसल्यांहून अगदीं वेगळा बनला. आदिलशहाच्या सान्निध्यांत सेवाधर्मानें निर्वाह करण्याची इतिकर्तव्यता त्यांच्या ठिकाणीं बाणली. त्याचे उलट निजामशहाचे सान्निध्यांत मलिकंबराच्या हाताखालीं वागून मालोजी व शहाजी यांचे ठिकाणीं स्वतंत्रतेचें वारें संचारलें, हा विरोध इतिहासाभ्यकास स्पष्ट करितां आला पाहिजे. यास नैसर्गिक परिस्थिति पुष्कळशी कारण आहे. जुन्नर व मुधोळ यांची भौगोलिक रचना ध्यानांत आणावी म्हणजे वरील विरोधाचा उलगडा होतो. शिवाय मलिकंबरासारख्या व्यक्तीचें कर्तृत्व डोळ्यांसमोर असणें हाही मालोजी शहाजीला कांहीं लहान फायदा झाला नाहीं. ‘ सद्गुरुवांचोनी सांपडेना सोय ’ हा न्याय वेदांताइतकाच प्रत्यक्ष व्यवहारांतही लागू पडणारा आहे. म्हणूनच व्यक्तींचा पराक्रम बाहेर झळकण्यास योग्य गुरूची आवश्यकता लागत असते. मलिकंबराच्या सहवासांत मालोजी शहाजींना दूर पल्ल्याच्या क्षितिजांतील नवीन पराक्रमाचे अंधुक मार्ग दिसूं लागले, तसा मार्गदर्शी गुरु घोरपड्यांना आदिलशाहीच्या कारभारांत लाभला नाहीं. शिवाजीच्या यशस्वी उद्योगाची गुरुकिल्ली या पूर्वेतिहासांतच धुंडाळली पाहिजे. §

अलाउद्दीन खिलजीनें दक्षिणेंत यादवांचें राज्य बुडविल्यापासून सुमारें तीनशें वर्षें पावेतों मुसलमानांची सत्ता वाढत जाऊन हिंदूंचा पाडाव होत गेला. उत्तरेंत तर मुसलमानांना कोणीच विरोध करूं शकले नाहींत. अशा प्रकारें सर्वत्र निराशा पसरली असतां महाराष्ट्रांत शिवाजीनें स्वतंत्र राज्य उभारून औरंगजेबासारख्या प्रबल बादशहास हतवीर्य, केलें ही गोष्ट सतराव्या शतकाच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाची गणली जाते. ही क्रांति घडून येण्यास काय कारणें झालीं, आणि हिंदुस्थानांतील इतर प्रांतांच्या हिंदूंपेक्षां दक्षिणेंतील मराठ्यांनाच असें सामर्थ्य कसें प्राप्त झालें, हा

§ श्रीयुत द. वि. आपटे यांनीं मुधोळच्या इतिहासांत घोरपडे भोसले यांच्या भिन्न कर्तृत्वाची बरीच चर्चा केली आहे, तिला उद्देशून वरील विवेचन आहे. बहामनी राज्याचे अंमदानींत महंमद गावानसारखा योग्य गुरु भेटतांच घोरपड्यांचा पराक्रम विशेष झळकला आणि घोरपडे हें नांवसुद्धां त्यांस त्यावरून प्राप्त झालें ही गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदी इतिहासांतला एक गहन प्रश्न समजला जातो, आणि त्याचें समाधानकारक उत्तर देण्यांत अनेक विद्वान अभ्यासकांचे श्रम खर्ची पडले आहेत. त्यांवरून असें निष्पन्न होतें कीं, हिंदुस्थानांतील इतर प्रांतांच्या मानानें महाराष्ट्राची भूरचना विशिष्ट युद्धपद्धतीला पोषक आहे. मलिकंबरासारख्या चतुर राजकारणी पुरुषानें भोसले वगैरे मराठे सरदारांना हाताखालीं घेऊन प्रबल मोगल बादशहांशीं जोराचा विरोध केला, या उत्साहजनक प्रयोगांत भाग घेण्याची संधि शहाजी भोसले व जिजाबाई यांना मिळाली आणि त्याच आणीबाणीच्या परिस्थितींत त्यांना शिवाजी पुत्र झाला. अर्थात् या पूर्वतयारीचा फायदा गर्भावस्थेपासूनच शिवाजीस मिळून मुसलमानांच्या वाढत्या सत्तेस विरोध करण्याचें सामर्थ्य त्यास प्राप्त झालें, तेणेंकरून मराठ्यांचें स्वतंत्र राज्य निर्माण होऊन अठराव्या शतकांत त्यांची सत्ता सार्वभौम बनली. यास्तव मराठ्यांचा व विशेषतः शिवाजीचा इतिहास स्वातंत्र्यासाठीं झगडणाऱ्या लोकांस मार्गदर्शी वाटतो, आणि त्याचा उगम शहाजीच्या वरील व पुढील चरित्रक्रमांत भरपूर दिसून येईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— ५ —

इकडे आड, तिकडे विहीर

१ कर्नाटकांतील हिंदु सत्तांचा अहवाल २ शहाजीच्या तीन स्वाऱ्या, बंगलोरास वास्तव्य ३ मुस्ताफाखानाशीं शहाजीचा बेबनाव

१ कर्नाटकांतील हिंदु सत्तांचा अहवाल.— निजामशाहीचा संहार शहाजहाननें करून मोगल बादशाहीचें नांव बऱ्याच अंशीं सार्थ केलें. अकबरानंतर बादशाहीचा विस्तार अहमदनगरास पोंचण्यास तीस वर्षें लागलीं; आणि पुढील राज्यवृद्धीच्या कार्यासाठीं शहाजहाननें औरंगजेबास दक्षिण देशांत ठेवून दिलें. पूर्वी मोगलांचें ठाणें बऱ्हाणपुरास असे, तें औरंगजेबानें आणखी दक्षिणेस औरंगाबादेस आणिलें. याचा सरळ अर्थ असा कीं, आदिलशाही व कुत्वशाही या राज्यांस उत्तरेकडे पाय पसरण्यास आतां अवकाश राहिला नाहीं. हा वचपा इतरत्र भरून काढून आपलें जीवन समृद्ध करण्याची आवश्यकता त्या दोन राज्यांस लगोलग भासली. कारण कोणत्याही राज्याचा संसार केवळ वडिलार्जित सांचलेल्या कमाईवर फार दिवस चालणें शक्य नसतें. या बद्दल त्या दोन राज्यांमध्यें कैक दिवस विचारविनिमय चालला.

तालिकोटच्या लढाईत विजयनगरची हिंदुशाही संपली, तरी तेथील राजवंश पुढें कैक वर्षें थोडी बहुत सत्ता बाळगून नांदत होता. शिवाय पूर्वपश्चिम समुद्रास लागून थेट दक्षिण टोंकापर्यंतच्या प्रदेशांत विजयनगरचे प्रांतिक कारभारी ठिकठिकाणीं नेमलेले होते, ते मध्यवर्ती सत्ता नष्ट झाल्यावर आपापल्या सामर्थ्याप्रमाणें हातीं असलेला प्रदेश बळकावून बसले. कांहींचा क्षय होत गेला, तर कांहींना स्वतंत्र राज्यें स्थापण्याची शक्ति आली. मिळून महाराष्ट्रांत निजामशाहीचा अंत झाला त्या सुमारास दक्षिणेकडच्या द्वीपकल्पांत लहान मोठीं राज्यें किती तरी होतीं. हीं राज्यें जिंकून सर्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देशांत आपला यावनी अंमल चालू करण्याचे आदिलशहा व कुत्बशहा यांचे प्रयत्न चालू होते उत्तरेकडून मोगलांचें आक्रमण चालू असल्यामुळें वरील दोघां सुलतानांस दक्षिण देश जिंकण्यास अवसर मिळाला नव्हता. पण स. १६३६ त शहाजहानशीं त्यांची गोडी होऊन उत्तरेची धास्ती नाहींशी होतांच त्या दोघांनीं आपसांत सख्य व करारमदार करून दक्षिण देश जिंकून आपली क्षीण होत असलेली सत्ता व संपत्ति व्रद्धिंगत करण्याचा उद्योग चालू केला. या दोन सुलतानांना आतां विशिष्ट कामगिरी कांहीं नव्हती. पदरीं फौजा होत्या त्यांस काम पाहिजे होतें. महंमद आदिलशहा तरुण, चलाख व महत्त्वाकांक्षी होता. रणदुल्ला व शहाजी हे दोन कर्तबगार सरदार विजापुरीं येऊन बसले होते. शहाजीच्या कर्तबगारीची जाणीव महंमदशहास चांगली होती. त्यास त्याच्या पुण्याच्या जागिरींत वावरूं दिल्यास हा कोणतें अरिष्ट आपल्यावर आणील याचा नेम नव्हता. म्हणून त्याच्या कर्तबगारीचा उपयोग करून कर्नाटकच्या प्रदेशांत धर्म व राज्य वाढविण्याचें काम त्या दोन शहांनीं हातीं घेतलें. पूर्वेकडील प्रदेश कुत्बशहाचे वाटणीस जावे आणि मधले व पश्चिमेकडचे आदिलशहानें घ्यावे असा करार ठरून स. १६३७ च्या दसऱ्यानंतर फौजा बाहेर पडल्या. शहाजीला या परिस्थितीची जाणीव असून ही एक प्रकारची हद्दपारी त्यानें सावधतेनें स्वीकारिली.

विजयानगरचा राजवंश स. १५६५ नंतर पेनुकोंडा येथें जाऊन राज्य करूं लागला, त्याचे खालील राजे झाले:—

तिरुमल पहिला (स. १५६५–८५); श्रीरंगराय दुसरा (१५८५–९५);
व्यंकटपति पहिला (१५९५–१६१४); राम (१६१४–१६३५);
व्यंकटपति दुसरा (१६३५-ऑक्टोबर १६४२); श्रीरंगराय तिसरा.

या शेवटच्याची कारकीर्द नोव्हेंबर १६४२ पासून स. १६७३ पर्यंत झाल्यानें त्याचा संबंध शहाजीशीं आला.

हे सहा हिंदु राजे बरेच पराक्रमी झाले. शेवटच्या श्रीरंगरायाचें मुख्य स्थान वेलोर येथें होतें, तें स. १६५० त मुसलमानांनीं हस्तगत केल्यावर तो चंद्रगिरीस जाऊन राज्य करूं लागला.

या मुख्य राज्यवंशांखेरीज विजयनगर राज्याचे प्रांतिक अंमलदार नाइक या संज्ञेनें अनेक ठिकाणीं थोडी फार सत्ता वाळगून होते, त्यांत इक्केरीचा वीरभद्र,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोंगूचा $ कैंगनायक, कावेरीपट्टणचा जगदेवराय, श्रीरंगपट्टणचा कांतिराय नरस वोडियार, तंजावरचा विजयराघव, मदुरेचा तिरुमल नायक, जिंजीचा व्यंकट नायक इत्यादींचा संबंध पुढील हकीकतींत शहाजीच्या कर्तृत्वाशीं येतो. कष्टाची कहाणी एवढीच कीं, या सर्वांस एका कक्षेंत वागवून मुसलमानी आक्रमणास एकजुटीनें विरोध करणारा तेजस्वी पुरुष त्यांजमध्यें निपजला नाहीं. उलट त्यांनीं एकमेकांच्या द्वेषानें शत्रूंना घरांत आणिलें. महंमद घोरी वगैरेंनीं हिंदु सत्ताधीशांत फूट पाडून उत्तरेंत मुसलमानी सत्ता प्रसृत केली, तसाच प्रकार दक्षिणेंत झाला. हा प्रकार शहाजीनें ओळखून थोडा बहुत हिंदूंचा कैवार घेतला, त्याचीच सांगता पुढें महाराष्ट्रांत शिवाजीनें केली तूर्त आदिलशाही फौजांनीं कर्नाटकीय प्रदेशांत काय आक्रमण केलें तेंच प्रथम सांगावयाचें आहे.

महाराष्ट्रांतील संशोधनानें जसा शहाजी-शिवाजींचा उद्योग निश्चित होतो, तसेंच मद्रासकडील संशोधनानें कर्नाटकांतले व्यवहार उलगडून दाखविण्याचें काम अलीकडे विशेष बारकाईनें झालें आहे; आणि निरनिराळे राजवंश, त्यांच्या शाखा, सत्ताधीश व्यक्ती व त्यांचे काल हे बहुतांशीं आतां निश्चित करण्यांत आले आहेत. परंतु आपणांस केवळ मराठ्यांपुरतेंच काम असल्यामुळें बारीक तपशिलांत शिरणें शक्य नाहीं.

२ शहाजीच्या तीन स्वाऱ्या, बंगलोरास वास्तव्य (स. १६३७-४०).- रणदुल्लाखानानें शहाजीला बरोबर घेऊन कर्नाटकांत लागोपाठ तीन स्वाऱ्या केल्या, त्या स. १६३७ पासून १६४० पावेतों झाल्या. दसऱ्यास फौजा स्वारीस निघावयाच्या त्या पुढील पर्जन्यापूर्वी परत यावयाच्या असा क्रम चालला. महंमदशहाचा असा सक्त हुकूम होता कीं, कर्नाटकांतील हिंदु सत्ताधीशांस जिंकून त्यांचा प्रदेश हस्तगत करावा, हिंदु धर्माचा पाडाव करून मुसलमानी धर्म वाढवावा, आणि संपत्ति लुटून विजापुरास आणावी. पहिली स्वारी पश्चिम बाजूनें मालनाड प्रांतांतील इक्केरीवर झाली. हें धनाढ्य शहर हल्लींच्या दक्षिण कॅनरा जिल्ह्यांत होतें. तेथें भद्राप्पा नाइकाचा पराक्रमी पुत्र वीरभद्र राज्य करीत होता. आदिलशाही फौजा प्रचंड व सज्ज असल्यामुळें त्यांजपुढें वीरभद्राचा निभाव लागला नाहीं. एक दोन महिन्यांत त्याचा पाडाव होऊन

$ हल्लींचें कंगय्यं, कोइमतूरच्या पू. ५० मैल. शिवभारतांतील नकाशाचा उपयोग पुढील विवेचनास होऊं शकेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इक्केरी शहर मुसलमानांचे हातीं गेलें. नाइकानें शरण येऊन अर्धे राज्य व अठरा लाख होन दंड देऊन आपला बचाव केला. त्यानें पुढें बेदनुरास जाऊन वस्ती केली. एवढा विजय संपादून शहाजी व रणदुल्लाखान स. १६३८ च्या पावसाळ्यास विजापुरीं परत आले.

दुसरी स्वारी पुढील सालच्या दसऱ्यास निघाली. तींत रणदुल्लाखानाचे हाताखालीं अफझलखान व शहाजी हे दोन मुख्य सरदार होते. कर्नाटकांत प्रवेश केल्यावर रणदुल्लानें अफझलखानास शिऱ्यावर पाठविलें. शिरें येथें मजबूद किल्ला असून तेथें कस्तुरीरंग नाईक याचा अंमल होता. अफझलखानानें किल्ल्यास वेढा घालून नायकास जेर केलें, तेव्हां नाइलाज होऊन त्यानें खानाकडे तहाची याचना केली. वाटाघाटीसाठीं अफझलखानानें नायकास अभयवचन देऊन भेटीस बोलाविलें. पुढें भेटीच्या प्रसंगीं विश्वासघात करून अफझलखानानें नायकाचा शिरच्छेद केला, आणि किल्ला व संपत्ति कबजांत घेऊन पुढें प्रयाण केलें. खानाच्या या विश्वासघातावद्दल चहूंकडे अत्यंत बोभाटा होऊन आदिलशाही दरबारावरील लोकांचा विश्वास उडाला. अफझलखान अत्यंत विश्वासघातकी आहे असा त्याचा लौकिक देशांत इतका पसरला होता कीं, पुढें वीस वर्षांनीं शिवाजी त्याचे भेटीस गेला, तेव्हां खानाचा हा कपटी स्वभाव तो पूर्णपणें ओळखून होता.

अफझलखान शिऱ्यावर चालून गेला, त्याच वेळीं शहाजीची रवानगी बंगलोरवर झाली. तेथें केंपगौडा नांवाचा अंमलदार होता. त्याचा पराभव करून शहाजीनें बंगलोर हस्तगत केलें. नंतर रणदुल्लाखान स्वतः तेथें गेला आणि तेथील कारभारावर त्यानें शहाजीचीच नेमणूक केली. केंपगौडा पळून सावणदुर्गावर राहिला. नंतर शहाजी श्रीरंगपट्टणावर चालून गेला. तेथें कांतिराय नरसराज वोडियार हा अधिकारी होता. शहाजीनें कांतिरायापासून मोठा दंड घेऊन त्यासच आपले तर्फेनें तेथें स्थापिलें आणि तो बंगलोरास परत आला. रणदुल्लानें आपले वकील मदुरा व कावेरीपट्टण§ येथील अधिकाऱ्यांकडे पाठविले. तेथील सत्ताधीशांनीं आदिलशहाचें स्वामित्व कबूल करून खंडणी पाठविली. येणेंप्रमाणें विजय मिळवून रणदुल्लाखान पावसाळ्यापूर्वीं विजापुरास परत आला. मागील बंदोबस्तासाठीं शहाजी बंगलोरास राहिला. या वेळीं बंगलोरास इसलामपुर हें मुसलमानी नांव देण्यांत आलें.

§ बंगलोरच्या द. ५० मैल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रणदुल्लाखानाची तिसरी स्वारी सन १६३९-४० त झाली. या स्वारींत त्यानें बसवापट्टणाचा केंगनायक याचा पाडाव केला. बसवापट्टणच्या लढाईंत शहाजीनेंही मोठा पराक्रम केल्याचें वर्णन शिवभारतांत आहे. लगेच चिक्कनायकहळ्ळी, वेलूर, टुमकूर, कांदळ, बाळापुर इत्यादि स्थळें आदिलशहास हस्तगत होऊन लूटही अपरंपार पैदा झाली. तिचा कांहीं अंश सरदारांस मिळूनही या स्वाऱ्यांत विजापुरास इतकी संपत्ति आली कीं, तिच्यांतून दादमहाल वगैरे कित्येक प्रचंड इमारती तेथें बांधल्या गेल्या.

तीनही स्वाऱ्यांत कल्पनातीत यश मिळाल्याबद्दल महंमदशहास मोठी धन्यता वाटली. 'आपण दक्षिणचे सर्व राजे व महाराजे जिंकिले, मोठमोठीं मंदिरें धुळीस मिळविलीं, तीन वर्षांच्या अवधींत सेतुबंध रामेश्वराची भक्ति करणाऱ्या हिंदूंच्या शेंड्या कापून काफरांचें निर्मूलन केलें.' असा अभिमान शहानें जाहीर केलेला विजापुरच्या इतिहासांत आढळतो. शहाजीला मात्र ही बढाई कितपत रुचली असेल ती असो. त्याला शक्य तितका खूष ठेवण्याची खबरदारी शहानें घेतली होती. रणदुल्लाखान पुढें दरबारीं परत आल्यावर शहाजीच कर्नाटकांत आदिलशहाचा मुख्य हस्तक झाला. प्रथम कांहीं वर्षे बंगलोरास काढून नंतर बाळापुर व कोलार येथें त्यानें कित्येक दिवस वास्तव्य केलें. पुष्कळ ब्राह्मण व इतर हुन्नरी लोक त्यानें दक्षिणेंतून कर्नाटकांत नेले, त्यांची वस्ती अद्यापि तिकडे आढळून येते. जिंकलेल्या प्रदेशाची, वसुलाची व इतर व्यवस्था लावण्याकरितां त्यानें आपल्या भरवंशाचीं अनेक कुटुंबें बरोबर नेलीं. त्यानें तिकडच्या रयत लोकांस न दुखवितां त्यांचें प्रेम संपादन केलें आणि ठिकठिकाणीं आपले हस्तक नेमून नियमित वसूल जमा करून जवळ धनसंचय केला. विजापुरास वेळेवर रकमा तो पाठवीत असल्यामुळें त्याचा कारभार शहास चांगला पसंत पडला. कोणाही मुसलमान सरदाराचे हातून पूर्वी प्रांताची सुव्यवस्था इतकी चांगली लागली नव्हती.

स. १६४० नंतरच्या तीन वर्षांत कर्नाटकांत पुनः मोठी स्वारी झाल्याचें दिसत नाहीं. शहाजी बंगलोरास राहून सर्व कारभार पाहत होता. आपल्या हातून हिंदूंचा निःपात होतो हें या उद्योगाचें खरें मर्म त्यानें ओळखलें. हिंदु सत्ताधीशांचे वकील त्याजकडे जाऊं येऊं लागले. केव्हां उघड वाटाघाटी, तर केव्हां गुप्त कावे, त्यांचे सारखे चालू असत. दक्षिणेंतील हिंदूंचा पुरस्कार त्याजकडे येऊन, स्वतंत्र राजाचा थाट त्यानें जमविला. स्वभावाचा थोडासा रंगेल असल्यामुळें त्याचेजवळ आश्रित, कवी, शाहीर, गवई वगैरेंचा भरणा जमून, बंगलोरास हिंदु राज्य उत्पन्न झाल्याचा देखावा चालू झाला. शिवभारत, राधामाधवविलासचंपू इत्यादिकांतून वरील ध्वनि स्पष्ट उमटलेला दिसतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वाऱ्या संपून बंगलोरास शहाजीची व्यवस्था स्थायिक झाल्यावर त्यानें जिजावाई व शिवाजी यांस पुण्याहून आपल्याकडे बोलावून घेतलें. या हालचालींचे काल मिश्रित ठरवितां आले तर पुष्कळ गोष्टी स्पष्ट होतील. सन १६४० पासून सुमारें दोन वर्षे शिवाजीचें वास्तव्य बापाजवळ बंगलोरास व विजापुरास झालें. 'भेटी होऊन आनंदोत्सव झाला. भोजन करून जिजाऊचें व शहाजी राजाचीं बोलणीं, नूतन लग्न, पुत्रसंपादनीं प्रीतिव्यवहाराचीं होऊन हास्यविनोद केला. शिवाजी महाराजांस हजरतीचे भेटीस नेलें शहाजी राजांचे स्वारीपुढें शिवाजी महाराजांची स्वारी, चिमणीं घोडीं, चिमणी पालखी, चिमणे भोई, चिमणे चोपदार समागमें चालत असतां हजरतींनीं कौतुक केलें.' § शिवाजीचें पहिलें लग्न ता. १६-५-१६४० रोजीं दादाजी कोंडदेवानें पुण्यास केलें असें शिवदिग्विजयकार म्हणतो. कोणी म्हणतात हें लग्न विजापुरास झालें. विजापुरचा मुसलमानी दरबार व बंगलोरचें निर्भेळ हिंदु वातावरण यांचा तीव्र विरोध कोणाच्याही नजरेस उघड दिसणारा होता. शहास कुर्निसात न करणें किंवा कसायांचे हातून गाई सोडविणें हे प्रकार शिवाजीचे हातून या मुक्कामांत घडले असल्याचा संभव आहे. सन १६४२ च्या आंत बाहेर शिवाजीची रवानगी परत पुण्यास झाली.

३ मुस्ताफाखानाशीं शहाजीचा बेबनाव (सन१६४४–४७).–शहाजी विजापुरास असतां मागें कर्नाटकांत कित्येक नायकांनीं पुनः बंडाळी चालू केली. वीरभद्राचा धाकटा भाऊ शिवाप्पा हा बेदनूरच्या गादीवर आला, तो शूर व बाणेदार होता. त्यानें बाहेर स्वाऱ्या करून नवीन प्रदेश हस्तगत केले व इक्केरी सुद्धां पुनः परत घेतली. हा त्याचा बंडावा मोडणें आदिलशहास प्राप्त होतें. सन १६४३ च्या मार्च–जूनच्या दरम्यान रणदुल्लाखान मरण पावला, तेव्हां त्याचे जागीं शहानें मुल्ला महंमदाचा जांवई मुस्ताफाखान खानबाबा या कडव्या मुसलमानाची नेमणूक करून शहाजीसह त्यास इक्केरीवर रवाना केलें; आणि मागून ता. ३-१-१६४४ रोजीं खुद्द महंमदशहा त्याचा पाठपुरावा करण्यासाठीं विजापुर सोडून निघाला आणि बंकापुरास मुक्काम करून राहिला. शिवाप्पानें मुस्ताफाखानाशीं निकराचा सामना केला. इक्केरी व सागर येथें तुंबळ संग्राम होऊन शिवाप्पा शरण आला, तेव्हां पहिल्यासारखा बंदोबस्त करून मुस्ताफाखान व शहाजी एप्रिलांत परत विजापुर येथें आले.

§ श्रीशिवाजीप्रताप पृ. ६२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आतां पूर्व बाजूकडील कुत्बशाही आक्रमणाचा थोडा वृत्तांत सांगितला पाहिजे. त्या भागांत चंद्रगिरि, वेलोर, जिंजी, तंजावर, मदुरा हीं स्थलें महत्त्वाचीं होत. चंद्रगिरीस श्रीरंगराय तिसरा हा बराच कर्तृत्ववान पुरुष जिंजी, तंजावर, मदुरा येथील नायकांस मिळवून घेऊन पूर्वीचें विजयनगरचें राज्य पुनः उभारण्याची खटपट करूं लागला. पश्चिमेकडील रणक्षेत्रावर जसे रणदुल्ला व मुस्ताफाखान मुख्य होते, तसा पूर्वेकडील क्षेत्रांत कुत्बशहाचा वलिष्ठ सरदार मीरजुम्ला मुखत्यारीनें वावरत होता. ठिकठिकाणच्या नायकांस आपले बाजूस आणून श्रीरंगरायाचा प्रयत्न हाणून पाडण्याचा उद्योग मीरजुम्ल्यानें चालविला. चंद्रगिरीच्या राज्यांत वेलोरचा किल्ला मजबूद असल्यामुळें तेथेंच मुख्य रणसंग्राम माजला. श्रीरंगराय सन १६४२ च्या नोव्हेंबरांत राज्य करूं लागला, तेव्हांपासून तीस वर्षेंपावेतों हा झगडा सारखा चालूच होता असें म्हटलें तरी चालेल. सन १६४३ त कुत्बशाही फौजा वेलोरवर चालून गेल्या असतां वेदनूरच्या शिवाप्पा नायकानें श्रीरंगरायाचें साह्य करून मीरजुम्ला यास वेलोरहून घालवून दिलें; आणि तेथें दोन वर्षांत श्रीरंगरायानें आपला जम पुष्कळसा बसविला. अर्थात् श्रीरंगरायाचा बंदोबस्त वेळींच न झाला तर सर्व कर्नाटक हातचें जाईल असें वाटून, आदिलशहा व कुत्बशहा यांनीं पुनः एकत्र वाटाघाट करून पहिला संगनमताचा करार ताजा केला. तदनुसार त्या दोनही शहांच्या संयुक्त फौजांनीं सन १६४५ त श्रीरंगरायावर चढाई करून वेलोरचा किल्ला हस्तगत केला. त्याबरोबर पूर्व किनाऱ्यावरील बहुतेक ठाणीं मुसलमानांस प्राप्त झालीं. कुत्बशहा व आदिलशहा यांनीं या प्रचंड विजयानिमित्त मोठा आनंदोत्सव करून एकमेकांस नजराणे व पोषाख पाठवून पूर्वीचें सख्य आणखी दृढ केलें.

या घडामोडींत शहाजीची परिस्थिति कशी होती तें समजून घेतलें पाहिजे. हिंदूंचा निःपात करण्यांत त्यानें प्रथम मुसलमानांना साह्य केलें, तरी श्रीरंगरायाचा बचाव व्हावा अशी त्याची मनापासून इच्छा होती. बहुधा त्या दोघांनीं गुप्तपणें संगनमत केलें असावें. त्यांचे वकील एकमेकांकडे सारखे जात येत होते. सन १६४२-४३ त शहाजी विजापुरास असून तेथें शिवाजीसह दादाजी कोंडदेवही त्याजपाशीं असावा. कुत्बशहा व आदिलशहा यांचे उद्योग त्यांना पूर्णपणें कळत होते. सन १६४४ च्या पहिल्या सहामाहींत दादाजी कोंडदेवानें शिवाजीच्या नांवानें मावळांत चढाई करून कोंडाणा, राजगड, तोरणा, पुरंदर, हे किल्ले व तत्समाविष्ट प्रदेश आटोक्यांत आणिला;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि तेणेंकरून आदिलशहाच्या आक्रमणास पश्चिमेकडून नवीन शह उत्पन्न केला. अर्थात् शहाजीची बंगलोरास स्थायिक होण्याची प्रवृत्ति आदिलशहास जाचक वाटूं लागली.

या वेळीं शहाजीला एक नवीन भाईबंदकी विशेष बोचूं लागली. मुधोळकर घोरपडे व वेरूळकर भोसले या एका पूर्वजाच्या दोन शाखांत वतनांची वाटणी झाल्यापासून थोडी बहुत धुसपूस चालूच होती. माहुली किल्ल्यास वेढा घालून रणदुल्लाखानानें शहाजीस कोंडलें, त्या प्रसंगांत मुधोळकर प्रतापराव घोरपडे रणदुल्लाचें साह्य करीत होता. त्यामुळें शहाजी व घोरपडे यांचें पूर्ण वैमनस्य उद्भवलें. वाई कराडकडचीं भोसल्यांचीं वतनें मुधोळकर प्रतापराव दाबून बसला आहे तीं आपलीं आपणांस परत मिळावीं, अशी फिर्याद शहाजीनें विजापुरास आदिलशहाकडे केली. त्यावरून शहानें सन १६३७त वाटणीपत्र करून दिलें, त्यांत वाईकडील जागिरीचा निम्मा विभाग शहाजीस देऊन त्याचे बदल्यांत कनकगिरीचे बाजूस कित्येक नवीन गांवें शहानें घोरपड्यांस दिलीं. घोरपडे आदिलशाहीचे कट्टे अभिमानी होते.

सन १६४४ च्या अखेरीस शहाजी बंगलोरास जाऊन आपल्या कारभारावर रुजू झाला. श्रीरंगरायानें वेलोर पुनः परत घेतलें म्हणून आदिलशहानें त्याचा पाडाव करण्यांकरितां मोठी फौज तयार करून ती मुस्ताफाखानाचे हाताखालीं कर्नाटकांत रवाना केली. ता. ५-६-१६४६ रोजीं मुस्ताफा स्वारीस निघाला. त्याचे हाताखालीं रणदुल्लाचा पुत्र धाकटा रुस्तुमजमा, अफझलखान, वगैरे अनेक सरदार होते. गदग, लक्ष्मेश्वराहून फौजा बसवापट्टणवर आल्या. या ठिकाणीं ता. ३-१०-१६४६ रोजीं आसदखान व शहाजी राजे मुस्ताफाचे फौजेस सामील झाले. तदनंतर शिवाप्पा नाईक, श्रीरंगपट्टणचा वोडियार, आबाजी घाटगे झुंजारराव, केंगनायकाचा भाऊ बाळाजी हैबतराव हेही खानास येऊन मिळाले. दर्यांतील तुफानाप्रमाणें ही आवाढव्य फौज आग्नेयीकडे वाट चालू लागली, तेव्हां ठिकठिकाणचे लोक व सत्ताधीश भयग्रस्त झाले. मुस्ताफाखानानें आजूबाजूस आपले हस्तक पाठवून प्रदेश आपल्या कबजांत आणिला. असें करीत फौजा वेलोरपुढें येऊन थडकल्या. त्याबरोबर श्रीरंगराय व जिंजी, मदुरा, तंजावर येथील अधिकारी, शरणचिठ्ठ्या पाठवून मुलखास उपद्रव देऊं नये अशी याचना करूं लागले. पैकीं श्रीरंगरायानें गुप्तपणें मुसल्मानांस मागें हटविण्याचा अंतस्थ यत्न चालू केला. परंतु मुस्ताफाखानानें जिंजीच्या नायकास वश करून श्रीरंगरायाचे गुप्त बेत समजून घेतले. तेव्हां कठिण प्रसंग जाणून श्रीरंगरायानें शहाजीस भिडेस घातलें. त्यावरून शहाजीनें श्रीरंगरायाबद्दल खानाकडे रदबदल केली, ती खानास बिलकूल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रुचली नाहीं. त्यानें वेलोरच्या किल्ल्यास वेढा घालण्यासाठीं निरनिराळ्या सरदारांस बाजू वाटून दिल्या. श्रीरंगरायाचा सेनापति दामलवार म्हणून होता, त्याची व शहाजीची गांठ पडून तुंबळ रणकंदन झालें. त्यांत दामलवारनें मुसलमानांची रेवडी उडवून देण्याचा प्रसंग आणिला असतां ऐन प्रसंगीं तो मारला गेला, आणि श्रीरंगरायाची फौज उधळून पळाली, त्याबरोबर वेलोरचें ठाणें मुसलमानांस हस्तगत झालें, (मार्च १६४७).§ पुढें पाऊसकाळ येणारसें पाहून शहाजी व आसदखान यांस बंदोवस्तास ठेवून मुस्ताफाखान विजापुरास परत गेला. या विजयाबद्दल महंमदशहास संतोष व धन्यता वाटून तो मुद्दाम चाळीस मैल पावेतों पुढें येऊन कृष्णेवर खानास सामोरा गेला. तेथें सन्मानानें भेटून शहानें खानाचा गौरव केला. शहाजीच्या पराक्रमाबद्दल त्याचाही शहानें 'महाराज फर्जंद शहाजी भोसले' या शब्दांनीं सन्मान केला.

याच वेलोरच्या युद्ध प्रसंगांत मुस्ताफाखान व शहाजी यांचें वैमनस्य प्रथम उद्भवलें. रणदुल्लाखान शहाजीची योग्यता ओळखून होता, पण त्यानंतरचे मुस्ताफा व अफझलखान यांना शहाजीच्या पराक्रमाचा हेवा वाटूं लागला. उलट पक्षीं सर्व कामें यशस्वी करून दाखवावीं शहाजीनें, आणि गौरव व्हावा दुसऱ्यांचा, हा प्रकार शहाजीलाही दुःसह वाटला. वेलोरच्या युद्धापूर्वी श्रीरंगरायानें शहाजीच्या मार्फत तहाची याचना केली आणि श्रीरंगरायाचा बचाव करावा अशी शिफारस शहाजीनें मुस्ताफाखानाकडे केली, ती सिद्धीस गेली नाहीं हा प्रकार वेगळा. परंतु शहाजी हिंदूंचा पुरस्कार करितो आणि मुसलमानांच्या राज्यवृद्धीस हरकत आणितो, अशी सामान्य समजूत दरबारी मंडळीची झाली. तसेंच हिंदुधर्माच्या नाशास आपण कारण व्हावें ही गोष्ट शहाजीस बिलकूल रुचली नाहीं, आणि शहाजी शिवाजींचे व सल्लागारांचे विचार या संकटाचा परिहार कसा करावा इकडे चालूं लागले. एकंदरींत इकडे आड व तिकडे विहीर अशी बिकट परिस्थिति पुनः शहाजीस प्राप्त झाली.$

---

§ *Shivaji the Great* by Dr. Balkrishna, Pt. I. p. 123; शि. भा. ९. २८–४४.

$ शिवभारतकारानें,

> कार्णाटकाः क्षोणिभृतः परिहाय मदीयतां ।
> बतैतन्मन्त्रयोगेन प्रथयन्त्येतदीयतां ॥

हें वाक्य महंमदशहाच्या तोंडीं घातलें आहे. त्याचा अर्थ असा कीं 'कर्नाटकांतले सत्ताधीश माझा ताबा झुगारून देऊन शहाजीच्या शिकवणीनें आम्ही त्याचेच अंकित आहों असें उघड बोलतात.'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— ६ —

बेलरोटीवर शपथा

१ शहाजीची कैद २ शहाजीच्या पुत्रांचा आदिलशहास शह
३ शहाजीची गौरवयुक्त सुटका

१ शहाजीची कैद (ऑगस्ट १६४८).—वेलोरचा निकाल लावल्यावर मुसलमानांची दृष्टि जिंजीकडे वळली. मुसलमानांचें हें आक्रमण बंद पाडण्यास श्रीरंगराय कसून झटत होता. सन १६४८ च्या जानेवारींत मुस्तफाखान आदिलशहाच्या हुकमानें विजापुराहून निघाला तो जिंजीवर आला. मीरजुम्लाही त्याजबरोबर होता. जिंजीचा अधिकारी रूपनायक यानें मुसलमानांशीं सामना करण्याची सिद्धता केली. त्यानें मदुरा व तंजावर येथील नायकांस आपल्या मदतीस आणिलें. पण मदुरेचा तिरुमल नायक श्रीरंगरायाचा द्वेष करी. श्रीरंगरायास वर्चस्व प्राप्त झाल्यास आपली स्वतंत्रता नाहींशी होईल अशी भीति तिरुमल यास वाटून तो अंतस्थपणें मुसलमानांस सामील झाला. अर्थात् हिंदूंची जूट घडून आली नाहीं. शहाजी, आसदखान व रुस्तुमजमा यांचें एकमत असून, त्यांना मुस्तफाखानाची अरेरावी दुःसह वाटत होती. खानानें जिंजीस वेढा घातला, पण चौघांचीं तोंडें चार दिशांस झाल्यामुळें वेढ्याचें काम बिघडलें. मीरजुम्ला व मुस्ताफा यांचें वाकडें आलें. मीरजुम्ला आपली फौज घेऊन जिंजीहून निघून गेला. अशा स्थितींत मुस्ताफाखानास कळून चुकलें, कीं प्रथम ही आपसांतील फूट बंद पाडिली पाहिजे, त्याशिवाय जिंजी हस्तगत होणार नाहीं. ह्या फुटीचा उत्पादक शहाजी होय अशी त्याची खात्री होऊन त्यासच प्रथम वठणीस आणण्याचें त्यानें योजिलें; आणि त्यास आपला संशय येऊं नये म्हणून बाह्यतः अत्यंत गोडी दाखविली. मीरजुम्ला व शहाजी यांचें अंतस्थ सूत चालू झालें. आपणास कुत्बशहा आपले नोकरींत घेईल तर आपण त्यांचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कार्य उत्कृष्ट बजावून दाखवूं, आदिलशहाचे नोकरींत मुस्ताफाखान आपणास कधींच वर डोकें काढूं देणार नाहीं, असा निराळाच बेत मनांत रचून शहाजीनें ता. २३-१२-१६४७ रोजीं एक लेखी अर्जी कुत्बशहास पाठवून, मला आपले नोकरींत घ्या अशी विनंति केली. ही गोष्ट मुस्ताफाचे कानावर गेल्यानें तो जास्तच चिडून गेला आणि हात धुऊन शहाजीचे पाठीस लागला. जिंजीचा वेढा सुरू झाल्यावर शहाजीनें खानास कळविलें कीं, 'माझी फौज थकून गेली आहे, तर थोडे दिवस मी बंगलोरास जाऊन फौज ताजी तवानी करून परत येतों.' खानानें उत्तर पाठविलें, 'हल्लीं वेढ्याचें काम चालू आहे तर तुम्हांस बाहेर जाण्यास परवानगी देतां येत नाहीं.' त्यावर शहाजीनें खानास जबाब दिला, कीं 'खर्चास नसल्यामुळें माझ्या लोकांची उपासमार होत आहे, तर आतां परवानगीची वाट न पाहतां मला निघून जाणें प्राप्त आहे.' हा उद्धटपणाचा प्रकार पाहून शहाजीस कैद करण्याचा इरादा खानानें ठरविला. मात्र शहाजीचें कर्तृत्व खान ओळखून असल्यामुळें, त्यानें मोठी सावधगिरी ठेविली, आणि बाह्यतः त्याजवर जास्तच विश्वास दाखविला. मध्यंतरींच्या काळांत त्यानें विजापुरास पत्रें पाठवून शहाजीला कैद करण्याविषयीं आदिलशहाची परवानगी आणिली. श्रावण वद्य १ स (ता. २५-७-१६४८) पहाटेच्या प्रहरीं मंडळी निद्रित असतां मुस्ताफाखानानें बाजी घोरपडे वगैरे कित्येक हिंदु व कांहीं मुसलमान सरदार शहाजीचे गोठावर पाठवून, बिछान्यांतच त्यास पकडून आपल्या संन्निध बंदोबस्तांत ठेविलें, आणि पुढील व्यवस्थेविषयीं आदिलशहाकडून खुलासा मागविला. शहाजीजवळ त्याचा विश्वासु हस्तक कान्होजी जेधे होता त्यासही खानानें कैद करून कनकगिरीस ठेविलें.

२ शहाजीच्या पुत्रांचा आदिलशहास शह.—आदिलशहाजवळ खानखानान महंमदखान हा वजीर असून त्याच्याच सल्ल्यानें शहा कारभार करी. शहाजीला अटक केल्याची बातमी आल्यावर शहानें या वजिरास जिंजीकडे रवाना केलें. त्याजबरोबर अफझलखानास दिलें आणि असें फर्माविलें कीं, अफझलखानानें शहाजीस घेऊन विजापुरास यावें, आणि वजिरानें जिंजीस राहून युद्धाचें काम पुरें करावें. इतकें होईपर्यंत शहाजी मुस्ताफाखानाचे छावणींत होता; पण तो खान आजारी होऊन ता. ९-११-१६४८ रोजीं मरण पावला. लगेच वेढ्याचें काम खान महंमदानें अंगावर घेऊन ता. २८-१२-१६४८ रोजीं रूपनायकापासून जिंजीचा किल्ला हस्तगत केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या पूर्वी सातशें वर्षे रूपनायकाचे पूर्वज जिंजीस नांदत होते; आणि तेथें अपार संपत्ति जमली होती, ती सर्व म्हणजे सुमारें वीस कोट रुपयांची मत्ता या प्रसंगीं आदिलशहास मिळाली. ही संपत्ति व मोलवान सामान ८९ हत्तींवर लादून आणि शहाजीस बंदोबस्तानें बरोबर घेऊन अफझलखान जिंजीहून निघाला, तो सन १६४९ च्या उन्हाळ्यांत विजापुरास पोंचला. पांच सहाशें मैलांचा हा लांब प्रवास हलके हलके करण्यास निदान तीन महिने लागले असावे. मागें खान महंमद मात्र आणखी एक वर्ष कर्नाटकांत राहिला आणि तंजावर, मदुरा वगैरे स्थळें हस्तगत करून व आणखी लूट पैदा करून नंतर तो विजापुरास परत आला. या विजयांनीं आदिलशहाचा लौकिक मुसलमानांमध्यें केवढा वाढला असेल याची कल्पनाच केलेली बरी. श्रीरंगरायानें मात्र आपली चिकाटी सोडली नाहीं. आलेल्या संकटांस तोंड देऊन त्यानें कर्नाटकांत आपलें राज्य टिकविण्याचा प्रयत्न चालू ठेविला.

आदिलशहानें कर्नाटकचा प्रदेश जिंकण्यासाठीं दहा बारा वर्षें सारखे प्रयत्न केले, ते सिद्धीस न जाण्याचें कारण शहाजी होय, तो हिंदूंचा कैवार घेतो, बंगलोर येथें स्वतंत्र राज्य स्थापण्याचा त्याचा उद्देश आहे, त्याचा बंदोबस्त झाल्याशिवाय तिकडील प्रांताची व्यवस्था लागणार नाहीं, अशा प्रकारच्या कागाळ्या मुस्ताफाखान व अफझलखान यांनीं विजापुरास कळविल्या होत्या. बाजी घोरपडे जसा निष्ठेनें व नम्रतेनें वागतो, तसा शहाजी वागत नाहीं असा त्याजबद्दल बोभाटा झाला होता.

शहाजीला कैद केल्याबरोबर बंगलोर व कोंडाणा हस्तगत करण्यास शहानें फौजा रवाना केल्या. मुस्तफाखानानें मृत्युपूर्वींच रुस्तुमजमा ऊर्फ फर्हादखान व तानाजी डुरे वगैरेंना फौज देऊन बंगलोरवर पाठविलें होतें. त्या ठिकाणीं शहाजीचा वडील पुत्र संभाजी होता, त्यानें फर्हादखानाचा पराभव करून त्यास परत फिरविलें, (सन १६४८ डिसेंबर व सन १६४९ जानेवारी). या वेळीं शहाजीपुत्र एकोजी अठरा एकोणिस वर्षांचा बंगलोरच्या बचावांत लढत असावा.

याच वेळीं विजापुराहून मावळांत शिवाजीवर फौजा चालून आल्या, त्या बेलसर येथें तळ देऊन राहिल्या असतां शिवाजीनें पुरंदरावरून संभाजी कावजी कोंढाळकर § यास

§ कावजी कोंढाळकर हा कान्होजी जेध्याबरोबरच शहाजीचे तैनातींत होता. कान्होजीबरोबर तोही शिवाजीकडे आला होता. वरील लढायांचीं वर्णनें शिवभारतांतलीं वाचण्याजोगीं आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांजवर रवाना केलें. फत्तेखान, मुसेखान व बाळाजी हैबतराव हे विजापुरी सरदार आसमंतात संचार करूं लागले. कोंढाळकर चालून आला तेव्हां बाळाजी हैबतराव बचावासाठीं शिरवळ (शिरोवल) चे गढींत शिरला. कोंढाळकरानें गढीवर निकरानें हल्ला करितांच हैबतराव ठार होऊन त्याची भग्न फौज तळावर परत गेली. तेव्हां फत्तेखानानें मोठ्या संतापानें शिवाजीस पकडण्याकरितां खुद्द पुरंदरावर चाल केली. विजापुरी सैन्य गड चढूं लागतांच वरून बंदुकांच्या गोळ्यांचा व शिलांचा असा जबरदस्त मारा त्यांजवर झाला, कीं पुष्कळांचा संहार होऊन बाकीचे जीव घेऊन पळून गेले. त्या प्रसंगांत मुसेखान ठार झाला, आणि फत्तेखानास अपयश घेऊन विजापुर गाठणें भाग पडलें. खळदबेलसर (बिल्वसर) चा हा संग्राम स. १६४९ च्या प्रथमार्धांतला असला पाहिजे. याप्रमाणें मावळांत व कर्नाटकांत दोनही ठिकाणीं शहाजीच्या पुत्रांनीं विजापुरकरांस हटविल्यामुळें त्याचे जिवास अपाय करण्याची दरबारास छाती झाली नाहीं. याच अवधींत शहाजी विजापुरास दाखल झाला.

३ शहाजीची गौरवयुक्त सुटका (ता. १६-५-१६४९).—बंडखोर शहाजीला चांगली शिक्षा करण्याचे शहाचे विचार चालू असतां आणि तो विजापुरास येऊन दाखल होतो तोंच, त्याच्या दोघां मुलांनीं स्वपराक्रमानें दोन भिन्न प्रदेशांत विजापुरी फौजेचा रिघाव होऊं दिला नाहीं, हें वर्तमान दरबारांत आल्यावर पुढें काय करावें याचा विचार शहास पडला. इकडे यत्किंचित् माघार घेण्याचा प्रसंग वडिलांवर येऊं न देतां आपण त्यांची सुटका करूं अशी धमक शिवाजीस होती, म्हणूनच त्या संबंधानें बाह्य उपाय त्यानें चालविले. शहाजादा मुरादबक्ष मोगल सुभेगिरीवर होता, त्यास शिवाजीनें पत्र लिहून त्याचे मार्फत शहाजीच्या सुटकेचा इलाज सुरू केला. या पत्रास ता. १४-३-१६४९ चा जबाब शहाजाद्याकडून आला कीं, ' तुमचा इतबारी वकील बोलणें करण्यास पाठवा. ' त्यावर शिवाजीनें कांहींच जबाब पाठविला नाहीं; तेव्हां शहाजाद्याचें पुनः त्यास ता. १४-८-१६४९ चें पत्र आलें कीं ' तुम्ही हुजूर यावें म्हणजे मनसब व इनाम दिल्हा जाईल. ' याचेंही उत्तर शिवाजीनें पाठविलें नाहीं, त्या वरून ता. ३-११-१६४९ चें शहाजाद्याचें पत्र शहाजीस आलें कीं ' तुमची मोकळिक करण्याविषयीं शिवाजीनें लिहिलें आहे. हल्लीं आम्ही दिल्लीकडेस जात आहों. हुजूर पावल्यावर तुमचेविषयीं अर्ज करून बंदोबस्त करून देऊं. तुमचा इतबारी वकील पाठवावा. तुम्हांकरितां पोषाख पाठविला आहे. ' याच तारखेचें शिवाजीसही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुरादचें पत्र आलें कीं 'जुन्नर व अमदानगर येथील देशमुखीविषयीं तुम्ही लिहिलें त्यास हुजूर गेल्यानंतर हा मजकूर घडोन येईल, ही खातरजमा ठेवावी.§ आपणाकडील एक वकील पाठवावा म्हणजे काम होण्यास दिरंग लागणार नाहीं.' या वरून स्पष्ट आहे कीं मोगलांकडे वशिला लावून शहाजीच्या सुटकेचा प्रयत्न शिवाजीनें केला. त्या वरून मोगल बादशहापाशीं या पितापुत्रांचें वजन भारी आहे आणि हे जाऊन मोगलांस सामील झाल्यास आपणांवर कठिण प्रसंग ओढवेल अशी आदिलशहाची खात्री झाली.

दुसरी एक भीति शहाला होती कीं, शहाजी पुत्र संभाजी व श्रीरंगराय वगैरे हिंदु सत्ताधीश, ज्यांना शहाजीबद्दल मोठा आदर वाटत होता, ते सर्व एक होऊन कर्नाटकांत मिळविलेला प्रदेश हिसकावून घेतील, आणि मावळांतही शिवाजीची बंडखोरी वाढेल. अशीं संकटें मुद्दाम ओढून आणण्यापेक्षां शहाजीलाच समजुतीनें वळवून प्रकरण मिटविण्यांत राज्याचें हित आहे ही गोष्ट शहास पटली. † मुस्ताफाखानाचे मरणानें दरबारांतला कट्टर पक्ष बहुतेक नरमला होता. अफझलखानासारखे शहाजीला पाण्यांत पाहणारे कित्येक होते, त्यांचें वजन खान महंमद वजिरापुढें चाललें नाहीं. हा वजीर मृदु वृत्तीचा, सभेटानें कारभार उरकणारा होता. खुद्द शहा आजारानें जर्जर झाल्यामुळें शत्रुत्व न वाढवितां सौम्योपचारांनीं प्रकरण मिटविण्यास अनुकूल झाला. या संबंधानें दोन महिने पावेतों दरबारांत भरपूर वाटाघाट झाली. नौरोजच्या म्हणजे मेषसंक्रमणाच्या दिवशीं (मार्च २१ ?) दरबार भरल्यावर शहानें कल्याण महालांत शहाजीची भेट घेतली. बोलणें झाल्यावर त्यास शहानें सरलष्कर खान अहंमद याचे ताब्यांत ठेविलें. खानानें त्यास स्वतःचे राहत्या घरीं आणून सन्मानानें वागवून बोलणें केलें कीं, 'कोंडाणा, बंगलोर व कंदापिली हीं ठिकाणें तुम्ही अजीवात सोडून शहाचे कबजांत द्यावीं, आणि इत उत्तर निष्ठेनें त्याची सेवा करावी.' या गोष्टीस शहाजीनें विरोध दाखविला नाहीं. 'माझी व कुटुंबाची अन्नें उद्योग करण्याची व्यवस्था लावून द्यावी, म्हणजे आम्ही सर्व इमानें इतबारें पूर्ववत् सेवा करण्यास तयार आहों, बंडाळी करून

§ प्रभात बखर ले. १–४. † या प्रकरणासंबंधानें शिवभारताचा १५ वा अध्याय वाचनीय आहे. शहा म्हणतो,—

जनकः शंभुशिवयोर्न मोक्तव्यो मया यदा ।
समृद्धायै श्रियेऽमुष्यै बत देयोऽञ्जलिस्तदा ॥ १५·२०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्यास अपाय करण्याची विलकूल इच्छा नाहीं', असा भाव त्यानें व्यक्त करितांच समेट मान्य झाला. शहाजीवर मुख्य आरोप दोन होते. मुस्ताफाखानाची त्यानें अवज्ञा केली, आणि त्याचे मुलगे बंडाळी करून मुलूख दाबून बसले. पैकीं पहिल्याचें निराकरण होऊन गेलें; आणि दुसऱ्या मुद्द्याची खात्री पटण्याकरितां वरील तीनही ठिकाणें सोडून द्यावीं अशीं स्वदस्तुरचीं पत्रें शहाजीनें आपल्या मुलांस लिहून दिलीं. नंतर शहानें शहाजीस भेटीस आणून त्याला सर्व प्रकार समजावून सांगितले, गोड शब्दांनीं त्यास राजनिष्ठ राहण्याचा इशारा दिला, आणि ता. १६-५-१६४९ रोजीं त्याची सन्मानपूर्वक सुटका करून त्यास पुनः कर्नाटकांत कामगिरीवर पाठविलें; आणि पांच लक्ष होनांची जागीर देऊन तंजावरची मसलत उरकण्याचा हुकूम केला. कान्होजी जेधे व त्याचा कारभारी दादाजी कृष्ण लोहकरे यांसही त्याच वेळीं सोडिलें. शहाजीची व त्यांची भेट झाली तेव्हां त्यांस शहाजी म्हणाला, 'तुम्ही आम्हांमुळें बंदीखान्यांत श्रमी झालां. या उपरी आम्ही पातशहांशीं कबूल केलें कीं बेंगरूळ प्रांत पांच लक्ष होनांचा जागीर घेऊन कर्नाटकची मसलत करूं. तुमचें वतन मावळांत आहे तेथें जाऊन तुम्ही जमावानिशीं चिरंजीव शिवबाजवळ राहावें. त्या प्रांतांतील अवघे मावळे देशमुख सुद्धां त्यास रुजू होऊन आज्ञेंत वर्तून जबरदस्तीनें राहवें. मोगली किंवा आदिलशाही फौज चालून आली तर इमान राखून त्यांशीं लढाई करावी.' अशा प्रकारच्या शपथा उभयतांनीं बेलरोटीवर हात ठेवून केल्या आणि वस्त्रालंकार व पत्रें देऊन शहाजीनें कान्होजी नाईक व दादाजी कृष्ण यांस शिवाजी राजांकडे रवाना केलें.

वरील कराराप्रमाणें संभाजीनें बंगलोर सोडलें नाहींच; पण शिवाजीसुद्धां सिंहगड सोडण्यास अत्यंत नाखूष होता. सिंहगड सोडणें म्हणजे आपला इतक्या वर्षांचा उद्योग फुकट घालविण्यासारखेंच होतें. त्या संबंधानें शिवाजी-जिजाबाईनीं सोनोपंत डबिराशीं पुष्कळ वाटाघाट केली. मुख्यतः शिवाजीच्या पराक्रमामुळें त्याच्या बापाच्या या कैदेस एक प्रकारचें भीषण स्वरूप लोककल्पनेंत आलेलें होतें. पण एकंदर प्रकार पाहतां मुख्य गोष्ट लक्षांत येते ती ही कीं, शहाजी व त्याचे पुत्र मिळून एक विशिष्ट शक्ति बनली होती. त्यांना कोणत्याही तऱ्हेनें आळा घालण्याचें सामर्थ्य आदिलशाही सरकारास बिलकुल उरलें नव्हतें. तेव्हां शक्य तितकें त्यांस गोंजारून त्यांच्या मनांतलें शल्य काढून टाकण्यापलीकडे महंमदशहासारख्या कडव्या सत्ताधीशास कांहीं करिता आलें नाहीं. हे भोसले उघडपणें आपल्या धर्माचा पुरस्कार करीत होते, त्यांचा अटकाव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शहास करितां आला नाहीं. दहा वर्षांपूर्वी शहाची आज्ञा स्वीकारून शहाजी कर्नाटकांत हिंदूंचा पाडाव करण्याच्या कामगिरीवर गेला, तेव्हांपासून पुढील दहा वर्षांत शहाजीनें जी करामत केली, तिजमुळें त्याजवर कैदेंत पडण्याची पाळी आली. तींतून सुटका होतांच आणखी दहा वर्षांनीं शहाजीनें तीच कामगिरी आदिलशहावर उलटून दाखविली. असे हे दहा दहा वर्षांतले फरक ऐतिहासिक विवेचनांतले मुख्य दुवे होत. शिवभारताच्या सोळाव्या अध्यायांत शिवाजी व सोनोपंत डबीर यांचा संवाद दिला आहे तो राजनीतीचा एक उत्कृष्ट मासला गणला जाईल. कोंडाणा किल्ला परत देऊन इतक्या दिवसांचा उद्योग फुकट घालविणें शिवाजीच्या जिवावर आलें, त्या वेळीं सोनोपंत डबिरानें शिवाजीची समजूत घातली तो प्रसंग शिवभारतांत सुंदर वर्णिलेला आहे. '**सुविक्रान्तस्य नृपतेः सर्वमेव महीतलम्**'§ म्हणजे 'राजाच्या अंगीं पराक्रम असल्यास सर्व पृथ्वी त्यास मोकळी आहे, तुम्ही एका सिंहगडाची एवढी काय गोष्ट घेऊन वसलां, वडिलांस सोडविणें हें तुमचें आद्य कर्तव्य होय,' असें सांगून डबिरानें शिवाजीकडून सिंहगड परत देवविला, तेव्हांच शहाजीची सुटका झाली. पुढें सन १६६५त तो किल्ला मोगलांकडे गेल्यावर त्यांजकडून सन १६७०त तानाजी मालुसऱ्यानें परत हस्तगत केला, ती हकीकत पुढें येईल.

किल्ला तात्पुरता परत दिल्यानें शिवाजीच्या उद्योगास खळ पडला नाहीं. त्या भागावर स्वामित्व गाजविण्यास शिवाजीसारखाच कोणी वस्ताद पाहिजे होता. आदिलशहानें त्या भागावर अफझलखानाची नेमणूक करून वाई जावळीपावेतोंच्या बिकट प्रदेशावर सुरळित अंमल वसविण्याची त्यास आज्ञा केली. शहाजी व शिवाजी यांचे बेत पूर्णपणें जाणणारा हाच एकटा अधिकारी दरबारांत होता, त्यानें शिवाजीस आळा घालण्याचा जो पुढें कसून प्रयत्न केला, त्याचा परिणाम अंतीं कसा झाला तें उत्तरोत्तर व्यक्त होईल.

---

§ अ. १६-४५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

—७—

अखेरची पुण्याई

१ शहाजीचा उत्तरायुःक्रम, आदिलशहाला बाणेदार पत्र
२ तंजावर जिंकण्याचा प्रयत्न ३ बेदनूरचे स्वारींत मृत्यु
४ बायकामुळें ५ शहाजी चरित्राचा विहंगमावलोक
६ श्रीरंगरायाचा शेवट

१ शहाजीचा उत्तरायुःक्रम, आदिलशहाला बाणेदार पत्र (१६५०-१६५७).—सन १६५० नंतर कर्नाटकांत आदिलशहा व कुत्बशहा यांचे जे व्यवहार घडले त्यांतही शहाजी व श्रीरंगराय यांचा संबंध पूर्वीच्या इतकाच येतो. पैकीं पहिलीं पांच सात वर्षे शहाजी कनकगिरीचे बाजूस राहून विजापुर व महाराष्ट्र येथील घडामोडींकडे लक्ष देत राहिला, आणि सन १६५७ च्या पुढें त्यानें जिंजी तंजावरकडील प्रदेश हस्तगत करण्याची कामगिरी केली. जिंकलेल्या प्रदेशाची वाटणी करितांना सन १६५१त आदिलशहा व कुत्बशहा यांचें युद्ध जुंपलें. त्यांत आदिलशहाचे तर्फेनें शहाजी व कुत्बशहाचा मीरजुम्ला हेच प्रमुख होते. शहाजीनें मीरजुम्ला याच्याशीं लढून त्याचा धुव्वा उडावला आणि दंड म्हणून नऊ लाख होनांचा ऐवज वसूल केला. या विजयाबद्दल आदिलशहाची मर्जी शहाजीवर फारच संतुष्ट झाली. सन १६५३-५४त शहाजी हाच आदिलशाच्या मर्जीतला मुख्य उमराव होता असे पाश्चात्यांचे उद्गार आहेत. †

सन १६५३ पुढील शहाजीच्या हालचालींत त्याचे दोघे पुत्र संभाजी व एकोजी यांचें साहचर्य दिसून येतें. संभाजी बरोबर नारो त्रिमल हणमंते वगैरे मुत्सद्दी विजयनगराच्या प्रदेशांत वावरतांना आढळतात. त्या ठिकाणीं हिंदूंची अवनति त्यांचे मनावर

† फोर्ट सेंट जॉर्जचीं पत्रें; राधामाधवविलासचंपू; प. सा. ६९६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विशेष बिंवली. नारोपंत हणमंत्याचे दोघे पुत्र जनार्दन व रघुनाथ हे पुढे वडिलाच्या उद्योगाचे अंशभागी झाले. कनकगिरीचा पाळेगार आपाखान आदिलशहाचा ताबेदार होता, त्यानें बंडखोरी केली म्हणून त्याचें पारिपत्य करण्याकरितां शहानें अफझलखानास पाठविलें. अफझलखान व संभाजी एकत्र होऊन कनकगिरीवर चालून गेले. त्या प्रसंगीं लढाई झाली; तींत-संभाजीस तोफेचा गोळा लागून मृत्यु आला (सन १६५४). तें वर्तमान शहाजीस कळतांच त्यानें त्वेषानें हल्ला करून पाळेगारास जिंकिलें. अफझलखानानें प्रथम संभाजीस लढाईत पुढें करून मागून त्याचा पाठपुरावा बरोबर केला नाहीं, म्हणून शहाजीस खानाचा भारी राग आला; आणि शिवाजीच्या मनांतही हें वैषम्य कायम राहिलें.

सन १६५२–५४ चे दरम्यान शहाजीच्या नांवानें सुटलेलीं पुष्कळ सनदापत्रें महाराष्ट्रांतलीं आहेत, त्यांवरून दिसतें कीं दोनही क्षेत्रांतील कार्यक्रमावर नजर ठेवून तो आपल्या पुत्रांस उत्तेजन देत असावा. मोऱ्यांचे प्रकरणांत शिवाजी बापाच्या सल्ल्यानेंच वागत असावा असा अंदाज होतो. महंमद आदिलशहा दिवसेंदिवस क्षीण होत जाऊन शेवटीं ता. ४-११-१६५६ रोजीं मरण पावला. त्याचा मुलगा अली लहान होता, त्यास गादीवर स्थापून बायको बडी साहेबीण हिनें कारभार चालविला. इतक्यांत औरंगजेबानें विजापुरच्या राज्यावर स्वारी केली (फेब्रु. १६५७– फेब्रु. १६५८), त्या अवसरांत शहाजीचें दरबारांतील वस्तान बिघडलें. याच वेळीं मावळांत शिवाजीचें आक्रमण जोरांत चालू झाल्यामुळें दरबारीं शहाजीबद्दल पुनः वहीम उत्पन्न होऊन त्यास नोकरींत नाराजी वाटूं लागली. तितक्यांत त्याचा पुरस्कर्ता जो वज़ीर खान महंमद तो ता. ११-११-१६५७ रोजीं मारला गेला. अशा संधींत शहाजीनें आदिलशहास जें वैतागाचें पत्र लिहिलें तें भोसल्यांची मनोरचना समजण्यास अत्यंत उपयुक्त आहे. त्यांत तो म्हणतो, "मागें रुस्तुमजमाबरोबर माहुलीहून आम्ही विसां रोजांत सरकारचरणीं दाखल झालों, त्या वेळीं चार लाखांची जागीर आम्हांस दिली. त्याचीं फर्मानें वारंवार आम्हांस मिळत गेलीं आहेत. असें आपलें आश्वासन असतां हाल्लीं अकर्तुकांचे सांगण्यावरून आमचे जागिरींत गैरहिशेबानें साहेब आतां खलेल करतील तर आम्ही रजपूत लोक आहों, आजपावेतों चार पातशाहींत नोकरी केली, भलतेंच नुकसान सोसून बेअब्रूनें पूर्वी नोकरी केली नाहीं व पुढें करणार नव्हों. आज दीड वर्ष आम्ही उमेद राखून नुकसान सोसलें तें याच भरंवशावर कीं, पूर्वी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थोरले हजरत साहेबांचे मेहेरबानगीस आम्ही पात्र झालों, व आप हजरत साहेबही आज पावेतों मेहेरबानगीच राखीत आले; आणि हाली प्रसंगही अडचणीचा हें मनांत आणून आतांपर्यंत सबुरी केली. परंतु यापुढें हजरतसाहेबांस आमची जरूर असेल तर हिशेबाचे राहे आमचा सरंजाम पूर्वींप्रमाणें आपण करून देवविला पाहिजे, आणि आमची दरकार नसेल तर खुषीनें आम्हांस रजा दिली पाहिजे. इतउत्तर आम्हांस जास्त पराक्रमाचे मामले संपादण्याची हौस बिलकूल राहिली नाहीं. एखाद्या तीर्थांत राहून परमेश्वराची सेवा करून हजरतसाहेबांस दुवा देत राहूं." (ता. ६-७-१६५७). §

शहाजीनें केलेल्या पराक्रमाचे व जिंकलेल्या मुलखाचे जे उल्लेख या पत्रांत आहेत, त्यांवरून त्याच्या कर्तबगारीची साक्ष पटते. त्यानें आपला क्षत्रियबाणा बोलून दाखविला आहे. औरंगजेब, मीरजुम्ला इत्यादींचे कावे तो ओळखून होता. अशा दृष्टीनें या पत्राचें मनन करितां येतें. शहाजीनें आपलें जीवितसाफल्य मुसलमानांच्या खिदमतींत मानिलें, तर शिवाजीनें पूर्ण स्वातंत्र्याची पुढची पायरी गांठली. या दृष्टीनें शिवाजी, शहाजी व मालोजी ही त्रयी आणि औरंगजेब, शहाजहान व जहांगीर ही त्रयी, यांचे इतिहास बनविणारे उद्योग अभ्यासकांनीं तोलून पाहण्यासारखे आहेत.

२ तंजावर जिंकण्याचा प्रयत्न (सन १६५७–१६६२).–सन १६५७त विजापुरास जी धांदल उडाली, तिजमुळें कर्नाटकांतील नाइकांनीं पुनः उचल करून विजापुरचा ताबा झुगारून दिला. तो परत कायम करण्यासाठीं मुल्ला महंमद व शहाजी यांना आदिलशहानें रवाना केलें. हाच उद्योग शहाजीला त्याच्या अखेरीपर्यंत पुरला. सन १६५८ त शहाजीनें कनकगिरीच्या पूर्वेस श्रीशैलमल्लिकार्जुन म्हणून स्थान आहे तें हस्तगत करण्यास पुत्र एकोजीस पाठविलें. त्या वेळीं एकोजी बरोबर कवि जयराम पिंडे होता, त्यानंतर ता. १९-३-१६५९ रोजीं शहाजी तंजावरावर चालून गेला, पण तेथील नाइकानें त्यास मुळींच दाद दिली नाहीं. तेव्हां शहाजी त्रिचनापल्लीवर गेला, पण तेंही ठिकाण त्यास मिळालें नाहीं. सन १६६१ त मदुरा, तंजावर व जिंजी येथील नाइकांनीं एक जूट करून शहाजीच्या आक्रमणास विरोध चालविला. शिवाजीनें जसें या वेळीं महाराष्ट्रांत आपलें स्वतंत्र राज्य निर्माण केलें, तसें कर्नाटकचें राज्य एकोजीचे नांवानें सिद्ध करून तंजावरास त्याची स्थापना करावी अशी शहाजीची मोठी इच्छा होती. परंतु तंजावरचा लिंगण्णा नाइक त्यास वश झाला नाहीं.

§ शिवाजी सूव्हनीर पृ. ११५-६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुढें शहाजीनें भेदनीतीचा अवलंब करून लिंगण्णास आपल्या बाजूस वळविलें, पण तंजावर कांहीं त्यास हस्तगत झालें नाहीं: फक्त तेगनापट्टण व पोर्टोनोव्हो हीं ठिकाणें त्यानें सन १६६१ त काबीज केलीं. सन १६६२ च्या एका पत्रांत खालील मजकूर आहे. "शहाजी व मुल्लामहंमद यांच्या फौजा आज दोन वर्षे जिंजी व तंजावर येथील राज्यें जिंकण्याचा प्रयत्न करीत आहेत, आणि त्या प्रदेशांतील लोकही या नवीन अधिकाऱ्यांची सत्ता संतोषानें कबूल करीत आहेत." परंतु या सालीं कर्नाटकांत भयंकर दुष्काळ पडल्यामुळें विजापुरी फौजांचा उद्योग यशस्वी झाला नाहीं. तंजावर जिंकून तेथें स्थायिक होण्याचा शहाजीचा मोठा प्रयत्न चालला होता, पण तो त्याचे हयातींत सिद्धीस गेला नाहीं. पुढें दहा बारा वर्षांनीं शिवाजीनें सन १६७४ त रायगडावर आपणास राज्याभिषेक करून घेतला त्याच सुमारास, एकोजीनें तंजावरचा कबजा घेऊन तेथें स्वतंत्र्य राज्य स्थापिलें. मिळून, जो स्वतंत्रतेचा प्रयोग खुद्द शहाजीला साधला नाहीं तो त्याच्या दोघां पुत्रांनीं पुढें यथावकाश आपापल्या क्षेत्रांत सिद्ध करून दाखविला.

महाराष्ट्रांत शिवाजीचे पराक्रम एकामागून एक प्रगट होऊं लागले, तेव्हां त्यास भेटण्याची इच्छा शहाजीस होऊन तो केव्हां तरी जन्मभूमीचे दर्शनास आला असावा. त्या भेटीचें खालील वर्णन हृदयंगम आहे. 'शहाजी राजे फौजेसहवर्तमान देशास पुण्यासंनिध आले. शिवाजी राजे सामोरे भेटीस गेले. हत्तीवर महाराज देखतांच घोड्याखालीं उतरोन मुजरा करीत पुढें गेले. भेटी जाली. एक प्रहर आनंदाश्रुपूर लोटला. शहाजी महाराज पालखींत बसून चालले. राजे पालखीसमागमें पायीं चालत पांच कोस पुण्यास गेले. जिजाऊची भेटी जाहली. मोठा आनंद जाला. बाहीर सदरेस येऊन बैसले ते समयीं शिवाजी राजांनीं पादरक्षा घेऊन मागें उभे राहिले. महाराजांनीं मागें फिरोन पाहून हातीं धरून बळें संनिध बसविलें. दोन मास समागम होता. शिवापुर, खेडेबारें पाहून जेजुरी महादेव यात्राकरून परत कर्णाटकांत गेले.' या भेटी सन १६६१–६२ च्या सुमारास झाल्या असाव्या. परंतु या पूर्वीच शहाजी व त्याचे पुत्र आपणास भारी आहेत अशी आदिलशाही दरबारची खात्री होऊन चुकली होती. पश्चिम महाराष्ट्रांतून तर शिवाजीनें आदिलशाही अंमल पार उठवून दिला आणि कर्नाटकांत शहाजी व एकोजी तसेंच करणार असा अंदाज दिसूं लागला. अशा स्थितींत वेळेवर शहाजीला आळा घालतां आला तर पाहवा, अशा इराद्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बरोबर मोठी फौज घेऊन अली आदिलशहानें स्वतः पश्चिम कर्नाटकांत स्वारी केली आणि एप्रिल सन १६६३ त तो बंकापुरास गेला. बंकापुरचा किल्ला अब्दुल करीम बहलोलखान याचे ताब्यांत होता, तोही पुंडावा करून यजमानास जुमानीत नव्हता. अली आदिलशहा बंकापुरावर गेला, तेव्हां शहाजी व बहलोलखान दोघेही अर्काटच्या पूर्व बाजूस मोहिमेवर होते. फक्त बहलोलची आई बंकापुरास होती, ती शहास आंत घेईना. तेव्हां शहानें बहलोलखान व शहाजी यांस निकडीचें बोलावणें पाठवून आपल्याकडे आणिलें आणि जवळ येतांच दोघांसही पकडून त्यांचे पायांत बिड्या ठोकल्या. † या प्रमाणें शहाजीस दुसऱ्यांदां कैद भोगण्याची पाळी आली. परंतु या वेळीं त्यास फार वेळ कुचंबत राहवें लागलें नाहीं. शहाचें व त्याचें बोलणें होऊन दोन दिवसांतच शहाजीची सुटका झाली आणि आदिलशहानें त्यास बेदनूर जिंकण्याची कामगिरी सांगून तिकडे रवाना केलें. बहलोलखानाची हकीकत या ठिकाणीं सांगण्याचें प्रयोजन नाहीं.

३ बेदनूरचे स्वारींत मृत्यु (ता. २३-१-१६६४).—बेदनूरकर नाईक आदिलशहाचा ताबेदार असून त्याची हकीकत पूर्वी येऊन गेली आहे. अलीकडे तो खंडणी वगैरे पाठवीना आणि स्वतंत्रतेनें वागूं लागला, तेव्हां त्यास वठणीस आणण्यासाठीं आदिलशहानें शहाजीस लढाईचा भरपूर सरंजाम देऊन बंकापुराहून रवाना केलें. शहाजी चालून गेला तेव्हां त्याजपुढें नाइकाचा इलाज चालला नाहीं. त्यानें शरण येऊन विजापुरची ताबेदारी पत्करिली; तेव्हां बेदनूरचा कार्यभाग पुरा करून शहाजी परत फिरला. शहाजीचा हा विजय ऐकून आदिलशहा संतुष्ट झाला. त्यानें मरातबाचीं पत्रें, वस्त्रें, भूषणें, हत्ती, घोडे वगैरे पाठवून शहाजीचा गौरव केला. बेदनुराहून परत येत असतां आसपासच्या बखेडेखोर ठाण्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं तुंगभद्रातीरीं बसवापट्टणजवळ होडिकेरी, (जि. शिमोगा) या गांवीं त्यानें मुकाम केला. या ठिकाणीं अनेक श्वापदें उठलीं. राजांस शिकार करावयाची इच्छा होऊन, घोड्यावर स्वार होऊन हरणाचे पाठीस लागले. ईश्वरेच्छा, त्या योगें घोड्याचा पाय भंडोळींत अडकून, घोडा व राजे एकावच्छेदें पडले, ते गतप्राण झाले (शनिवार, माघ शु. ५ शके १५८४, ता. २३-१-१६६४). मागाहून लोक माणसें आलीं. त्यांनीं एकोजी राजांस तेथें आणविलें. एकोजी राजे यांनीं उत्तर क्रिया सांग केली.

† प. सा. ९४६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आदिलशहाकडून दुखवटा येऊन मनसबदारीचीं वस्त्रें एकोजीचे नांवें झालीं. शिवाजी सुरतेच्या स्वारीहून परत आल्यावर वृत्त कळून जिजाबाई सुद्धां शोकसमुद्रीं पडून बहुत विलाप केला. शहाजी राजे तुंगभद्रातीरीं वारले, त्या जागयास छत्री इमारत मजबूद करविली; आणि पातशाही सनद घेऊन यरगटनहळ्ळी गांव तेथील खर्चास लावून दिला.' तो गांव छत्रीकडे अद्याप चालत आहे.

४ बायका मुलें.—शहाजीचे पश्चात् जिजाबाईचे मनांत सती जावयाचें फार होतें, परंतु शिवाजीनें अत्याग्रह करून तिला त्या कृत्यापासून परावृत्त केलें.

जिजाबाईचें इतिवृत्त मागें ठिकठिकाणीं आलेंच आहे. शिवाजीला योग्य शिक्षण व प्रोत्साहन देऊन त्याजकडून मराठ्यांचें स्वराज्य स्थापण्याची सिद्धता जिजाबाईनें करून दिली. नानाविध विपत्ती सहन करून जो हा सुयोग तिनें घडवून आणिला, त्यामुळें तिला 'वीरसू' व 'राजमाता' हीं स्पृहणीय पदें लाभून महाराष्ट्राचा भाग्योदय झाला. 'जिजाऊ सारखें कन्यारत्न श्रीनें पैदा केलें §' असा उल्लेख करून बखरकार तिची वास्तविक योग्यता दर्शवितात. शिवाजीनें आपल्या आरंभाच्या मसलती तिच्याच सल्ल्यानें पार पाडिल्या, आणि त्याचें राज्य चालू झाल्यावर सुद्धां अनेक वाटाघाटींत व घडामोडींत तिचें अंग असे. तिनें स्वतः वादीप्रतिवादी आपल्यासमोर आणून तंट्यांचे निकाल केले त्यांचे निवाडे उपलब्ध आहेत; तसेंच लोकांस इनामें व देणग्या करून दिल्या त्यांच्या सनदा प्रसिद्ध आहेत. फलटणचा बजाजी निंबाळकर कैक वर्षें मुसलमान झाला होता, त्याला पुनः स्वधर्मांत घेण्यामध्यें तिनेंच पुढाकार घेतला, आणि त्याचा मुलगा महादाजी निंबाळकर याला शिवाजीची कन्या सखूबाई देऊन त्या प्रमुख घराण्याशीं आप्तपणा जोडिला. हा प्रकार सन १६५५ च्या सुमाराचा आहे. कारण या शुद्धि प्रकरणाचा उल्लेख असलेली व सखूबाईस वाल्हें गांव इनाम दिल्याची शिवाजीची सनद ता. २७-१०-१६५७ ची आहे.

एका दृष्टीनें जिजाबाईचें जिणें फार खडतर होतें असें म्हणतां येईल. सासरचें व माहेरचें भांडण जुंपलें असतां जिजाबाईस गृहसौख्य तें कसलें मिळणार ? पण या सर्व हालअपेष्टांची भरपाई तिच्या उत्तरायुःक्रमांत झाली. आपला मुलगा 'छत्रपति'पदावर विराजलेला तिनें पाहिला. मुलाचा हा राज्याभिषेक समारंभ अवलोकन करून लगेच

§ ९१ कलमी बखर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बारा दिवसांनीं ती ता. १७-६-१६७४ रोजीं रायगडाखालीं पांचाड येथें मरण पावली. वरील पावसाळी सर्द हवा सोसवत नसल्यामुळें तिला खालीं निवाऱ्याचे जागीं आणिलें असावें.

शिवाजीनें मातुःश्रीच्या सेवेस हुशार माणसें व बायका नेमून दिल्या होत्या. पहाऱ्याचे शिपाई, पुजारी, पुराणिक वगैरे नेमून देवतार्चनाची व दानधर्माची स्वतंत्र व्यवस्था लावून दिलेली होती. एक दिवाण, एक चिटणीस, एक फडणीस व एक पोतनीस इतके कामगार व कारकून मंडळी तिच्या तैनातीला असत. तिच्या व्यवस्थेंत यत्किंचित् कमी पडूं न देण्याविषयीं शिवाजी अत्यंत काळजी बाळगीत असे.

जिजाबाईचें लग्न मार्गशीर्ष शु॥ ५ शके १५२७ (डिसेंबर १६०५) रोजीं झालें. तिला एकंदर पांच सहा मुलें झालीं, पैकीं संभाजी व शिवाजी हे दोघेच मोठे झाले. 'शहाजी राजे यांस प्रथम पुत्र पंचवीस वर्षांचे वयांत जिजाबाईचे पोटीं झाले.' † असा उल्लेख आहे. त्यावरून संभाजीचा जन्म सन १६१९ चे सुमारचा असावा. शिवाजीचे जन्मानंतर एक दोन वर्षांत शहाजीनें दुसरें लग्न तुकाबाईशीं केलें. त्या नंतर जिजाबाई नवऱ्याजवळ फारशी राहिलेली आढळत नाहीं. तुकाबाईला एक पुत्र झाला तो एकोजी. या चार पुत्रांशिवाय भिवजी, प्रतापजी, संताजी व रायभानजी असे चार अनौरस पुत्र शहाजीस असल्याचा दाखला सांपडतो.

शहाजीचा वडील पुत्र संभाजी सन १६५४ त कनकगिरीचे स्वारींत मृत्यु पावला हें वर सांगितलेंच आहे. त्यास सुरतसिंग व उमाजी असे दोन पुत्र होते. त्या दोघांचींही इनामपत्रें उपलब्ध आहेत. उमाजीचा जन्म जेधे शकावलींत ता. २५-११-१६५४ चा दिलेला आहे आणि त्याच सालीं संभाजी वारला, या वरून सुरतसिंग वडील ठरतो. सुरतसिंगाच्या सनदा सन १६६५-६६ पावेतोंच्या सांपडतात.

५ शहाजी चरित्राचा विहंगमावलोक.—येथवर शहाजीचें चरित्र उपलब्ध तपशिलाच्या साह्यानें जुळवून वर्णिलें आहे, त्यावरून त्याची योग्यता अजमावतां येते; आणि ठिकठिकाणीं तत्संबंधीं विवेचनही करण्यांत आलें आहे. तो कल्पक, धाडसी व विपन्नावस्थेंत न डगमगणारा असा पण थोडा बहुत रंगेल होता. त्याचा सर्व पराक्रम मुसलमानी राज्यें तारण्यांत खर्च झाला. कर्नाटकांतील

† श्रीशिवाजीप्रताप पृ. २६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रदेशांत मराठ्यांचा प्रवेश प्रथम शहाजीनें करविला; आणि तिकडे ब्राम्हण, क्षत्रिय, कारागीर वगैरे नानाविध मराठी कुटुंबें अद्यापि दृष्टीस पडतात, तीं आरंभीं शहाजींच्या वेळेस तिकडे गेलीं. अशा कुटुंबांनीं मोडकी तोडकी मराठी भाषा, त्या वेळचे रीतरिवाज व मराठी संस्कृति थेट दक्षिणेंत टिकविलेली अद्यापि दिसते. तंजावरास मराठी राज्य नांदत होतें तोंपर्यंत या महाराष्ट्र संस्कृतीस राजाश्रय होता.

शहाजीच्या चरित्राचे दोन ठळक भाग नजरेंत येतात, एक सन १६३६ पर्यंतच्या निजामशाही कारभाराचा, व दुसरा त्या पुढील कर्नाटकीय कारभाराचा. पहिल्या भागांत त्याचा स्वतंत्र बाणा जास्त उठावदार दिसतो. दुसऱ्या भागांत त्याच्या पराक्रमाचा उपयोग मुसलमान सत्ताधीशांनीं आपल्या कार्याकडे करून घेतला. अर्थात् राजकीय दृष्टीनें पाहतां मुसलमानांविषयीं शहाजीचे मनांत वैरभाव नव्हता. गोब्राह्मणप्रतिपालनाचें शिवाजीचें ध्येय शहाजीनें स्वीकारिलें नव्हतें. त्याची आकांक्षा इतकीच होती, कीं मोगल बादशाहीला नर्मदेअलीकडे उतरूं देऊं नये, त्या आक्रमणास दक्षिणेंतील सत्ताधीशांनीं एकमुखी विरोध करावा. याच उद्देशानें सन १६२७–३६ पावेतों त्यानें कमालीचे प्रयत्न केले. शहाजहानची दोन लाख फौज छातीवर असतां शहाजीनें कैक वर्षें तीस दाद दिली नाहीं. चाळीस हजार पावेतों सैनिक त्यानें पदरीं बाळगिले होते. हातीं द्रव्य असल्यावर पुरेशी फौज पदरीं बाळगून हिंदुस्थानचा प्रदेश जिंकणें शक्य आहे, ही गोष्ट डुप्ले–क्लाइव्हच्या पूर्वीं शंभर वर्षें शहाजीनें प्रत्यक्ष सिद्ध करून दाखविली. यास्तव तत्कालीन ऐतिहासिक व्यक्तींत राष्ट्रीय स्वत्व दिमाखानें मिरविणारा शहाजीशिवाय दुसरा एकही हिंदु सत्ताधीश दक्षिणेंत आढळत नाहीं. म्हणून शिवाजीला जन्म देऊन त्याचे ठिकाणीं स्वातंत्र्याचें वारें उत्पन्न करण्याचें श्रेय त्याला अवश्य मिळतें. या दृष्टीनें शिवाजीला जर 'राज्य–संस्थापक' म्हणावयाचें तर शहाजीला **'राज्य–संकलपक'** असें पद देण्यास हरकत नाहीं.

आपण हिंदु असून मुसलमानी राज्य व मुसलमानी धर्म यांची वृद्धि करण्यास कारण होतों याची जाणीव शहाजीला वारंवार होत होती, परंतु प्राप्त परिस्थितींत त्याला अन्य मार्ग राहिला नाहीं. हा कष्टमय प्रयोग त्याच्या अंतःकरणास झोंबत होता हें शिवभारतावरून दिसतें. आदिलशहानें त्यास कैद करून राजनिष्ठेची कबुली घेऊन मुक्त केलें. आपल्या दोघां मुलांस आळा घालण्याचा उघड जाहीरनामा पुकारून त्यानें आपली सुटका करून घेतली. परंतु अशा बाह्य पुकाऱ्यानें मनांतली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वातंत्र्येच्छा थोडीच नष्ट होणार ! शहाजी विजापुरचा तावेदार असो वा नसो, पण तो व त्याचे मुलगे उपेक्षणीय नाहींत अशी आदिलशहाची खात्री पटली होती. यास्तव त्यांच्या जागिरी काढून घेण्याची छाती शहास झाली नाहीं. संभाजीनें बंगलूर सोडून दिलें नाहीं, तें शहाजीच्या व एकोजीच्या कबजांत राहून एकोजीनेंच तें सन १६८३ त म्हैसूरचा चिक्कदेवराज वोडियार यास खरेदी दिलें. शहाजी व एकोजी यांचें वास्तव्य आलटून पालटून बंगलूर, कोलार व बाळापुर येथें होत असे. त्या ठिकाणीं अद्यापि मराठी अंमलाचे अवशेष दिसतात. शहाजीचा पक्का दुष्मन् जो मुस्ताफाखान तो मेल्यावर खानमहंमद मुख्त्यार झाला, त्यानें जिंजी, तंजावर वगैरे प्रांत जिंकण्याची भिस्त शहाजीवरच टाकिली. विजयनगरचा वंशज श्रीरंगराय याजबद्दल शहाजीस आदर वाटत असून त्याचा बचाव करण्याची त्यानें शिकस्त केली. महंमद आदिलशहाच्या मृत्युनंतर रुस्तुमजमा व सीदी जौहर यांचें अनुकरण करून शहाजीनेंही कर्नाटकांत स्वतंत्र बाणा धारण केला, ही गोष्ट कंपनीच्या पत्रांत व्यक्त होते. मदुरा व तंजावर हे प्रांत जिंकून आपल्या कबजांत घ्यावे अशी शहाजीची इच्छा होती, ती त्याला पूर्ण करितां आली नाहीं. पण त्यानें तंजावर पोखरून खिळखिळें केल्यामुळें सन १६७४ त एकोजीला सहज हस्तगत करितां आलें. वेदनूर वगैरे पश्चिमेकडील प्रदेश शहाजीच्या जागिरींत कधींच दाखल नव्हते. असो. महाराष्ट्रांतील संशोधनानें शिवपूर्वकालीन भाग जसा विशद झाला आहे, तसा कर्नाटकांतील भागही नवीन संशोधनानें नक्की होणें जरूर आहे.

पूर्वपरंपरेची, प्राचीन संस्कृतीची व संस्कृत विद्येची आवड शहाजीचे ठिकाणीं व्यक्त होते, तितकी कदाचित् शिवाजीचे ठिकाणींही दिसून येत नाहीं. शहाजी विद्याकलांचा भोक्ता होता. त्याचा स्वभाव थोडासा चैनी असून त्यास गायनादि ललितकलांची आवड होती. या गोष्टी शिवभारत, राधामाधवविलासचंपू इत्यादि ग्रंथांत स्पष्ट दिसतात. शहाजीच्या या विलासी स्वभावामुळें बाह्य सावधगिरींत ढिलेपणा उत्पन्न होऊन त्याजवर संकटें उद्भवत गेलीं. तो अष्टपैलू, मनमिळाऊ, पड खाऊन वागणारा असल्यामुळें शिवाजीची तडफ, बेपर्वाई किंवा सावधानता हे गुण शहाजींत आढळत नाहींत. एकोजी वगैरे त्याचे मुलगेही बापाच्या वळणावर गेले. त्यांनीं बरेंचसें मुसलमानी दरबारांतील थाटाचें अनुकरण केलें. विशेषतः कवींना व शिल्पज्ञांना बंगलोर तंजावरास जो आश्रय मिळाला, तो महाराष्ट्रांत मिळाला नाहीं. ही विद्येची आवड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तंजावरचे राज्यांत आनुवंशिक परंपरेनें उत्तरोत्तर वाढत गेली आणि शेंकडों ग्रंथ निर्माण होऊन अनेक विद्वानांना राजाश्रय मिळाला, तो प्रकार महाराष्ट्रांतील श्रावणमास दक्षिणेलाही साध्य झाला नाहीं. एका दृष्टीनें शहाजीनें निर्माण केलेली प्राचीन संस्कृतीची आवड आज सुद्धां बंगलोर तंजावरकडे टिकलेली दिसते, तितकी महाराष्ट्रांत दिसत नाहीं, ही गोष्ट शहाजीची योग्यता ठरवितांना अवश्य ध्यानांत ठेविली पाहिजे.

६ **श्रीरंगरायाचा शेवट** (सन १६७३).—विजयनगर राज्याचा शेवटचा पराक्रमी वंशज श्रीरंगराय याचें इतिवृत्त पूर्वीं ठिकठिकाणीं आलें असून त्याच्याशीं शहाजीचें सर्व उत्तरायुष्य निगडित आहे, सबब त्याची अखेरही येथेंच सांगणें इष्ट होईल.

दक्षिण कर्नाटकांत आपला जम बसविण्याचा पूर्वींचा उद्योग श्रीरंगरायानें अखेरपर्यंत सोडला नाहीं. औरंगजेब सन १६५३ त पुनः दक्षिणच्या सुभेगिरीवर आला, तेव्हां त्याजकडे वकील पाठवून श्रीरंगरायानें मदत मागितली. परंतु हिंदूस साह्य करणें औरंगजेबास युक्त वाटलें नाहीं. दक्षिणेंत श्रीरंगरायाचा मुख्य शत्रु मीरजुम्ला होता. मीरजुम्लानें सन १६५७ त त्याचा पराभव केला, तेव्हां त्यास अत्यंत निकृष्टावस्था प्राप्त झाली. राजधानी शहर पेनुकोंडा त्याचे हातून गेल्यामुळें तो चंद्रगिरीस जाऊन राहिला, पण तेंही ठिकाण पुढें मीरजुम्लानें हस्तगत केलें. तेव्हां तंजावर, मदुरा, म्हैसूर इत्यादि ठिकाणच्या नाइकांकडे त्यानें आश्रय मागितला, पण त्या सर्वांनीं कानावर हात ठेविले. पुढें तो बेदनूरकराच्या आश्रयास जाऊन राहिला. सन १६६१ त बेदनूरचें साह्य घेऊन म्हैसूर जिंकण्याचा प्रयत्न त्यानें केला, पण तोही यशस्वी न होतां त्याची कष्टदशा वाढतच गेली. तरी संकटावस्थेमुळें श्रीरंगरायानें अखेरपर्यंत प्रयत्न मात्र सोडिला नाहीं. म्हैसूरच्या वोडियारांनीं त्याचा अगदीं पिच्छा पुरविला. देवराज वोडियार हयात असतां त्याचा पुत्र चिक्कदेवराज यानें ईरोडच्या लढाईंत श्रीरंगराय व त्याचे साह्यकारी यांचा साफ फन्ना उडविला. या लढाईंत श्रीरंगरायाचे तर्फेनें एकोजी भोसले हजर असून ती सन १६६९–७०त झाली असें अनुमान आहे. पुढें श्रीरंगराय पुनः बेदनूरच्या शिवाप्पा नाइकाकडे गेला. शिवाप्पानें आणखी एकवार त्याच्या साह्यार्थ चिक्कदेवराजावर स्वारी केली, तेव्हां देवराज मरण पावून चिक्कदेवराजच गादीवर होता. अर्थात् ही स्वारी सन १६७२ च्या पुढें म्हणजे सन १६७३–७४ सालीं झाली असावी, पण चिक्कदेवराजापुढें श्रीरंगरायास यश मिळालें नाहीं. यावरून सन १६७३ पर्यंत श्रीरंगरायाची हकीकत मिळते. त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सालच्या सुमारास श्रीरंगराय मरण पावला आणि त्या बरोबरच विजयनगरचें राज्य कायमचें बुडालें असें म्हणतां येतें. प्राचीन समृद्ध राज्याचा हक्कदार पण सदैव अपेशी अशी जर एखादी व्यक्ति इतिहासांत असेल तर ती हा श्रीरंगराय होय. त्याची सन १६४२–७३ ची कारकीर्द लक्षांत घेतल्याशिवाय त्या काळचा कर्नाटकचा इतिहास नीट समजणार नाहीं. §

---

§ पहा, सरकारकृत औरंगजेब भा. १ व कृष्णस्वामी ऐयंगार यांचा लेख, जर्नल ऑफ् इंडियन हिस्टरी, ऑगस्ट १९३१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

☞ विशेष सूचना

पुस्तकांत पृ. ५५ वर शहाजी मोगलांस शरण गेल्याची हकीकत आहे, त्यासंबंधानें गोवा येथील पोर्तुगीझ दप्तरांतून खालील विशेष माहिती माझे मित्र प्रो. पां. स. पिसुर्लेंकर कळवितात.

'ता. २६-९-१६३६ रोजीं एक मुसलमान गृहस्थ शहाजीचें पत्र घेऊन चौलच्या कॅप्टिनकडे येऊन विनंति करूं लागला, कीं 'चौल येथें आपल्या हद्दींत राहण्यास शहाजी राजांस आश्रय द्या.' पत्रांत शहाजीनें लिहिलें होतें, कीं 'निजामशाहीचा मालक अकरा वर्षांचा आमचे पाशीं असून त्याचें वास्तव्य त्रिंगलवाडीच्या किल्ल्यावर आहे. तीन वर्षें झालीं, त्यांचे नांवें आम्ही स्वतंत्र कारभार सुरू केला आहे. परंतु मोगल बादशहा व आदिलशहा हे दोन प्रबल शत्रु आमचेवर चालून आल्यामुळें आपण आमच्या कुटुंबांस व मुलांस चौल येथील किल्ल्यांत सुरक्षित राहण्याची सोय करून द्यावी.'

'शहाजीला आतां बाहेर आधार राहिला नाहीं. म्हणून प्रसंग पडला तर चौलच्या किल्ल्यांत येऊन राहण्याचा त्याचा विचार आहे. या साह्याबद्दल तो निजामशाहीपैकीं कांहीं प्रदेश फिरंग्यांस देण्यास तयार आहे.

'या संबंधानें गोवा येथील काउन्सिलनें असें ठरविलें कीं ज्या अर्थी दोन बलिष्ठ सत्ताधीशांचें आक्रमण शहाजीवर झालें आहे, त्या अर्थी त्यास आपण उघडपणें मदत करणें श्रेयस्कर नाहीं. म्हणून त्यास चौलचे किल्ल्यांत आश्रय देऊं नये. मात्र दंडा (राजपुरी) येथील तटबंदीच्या ठिकाणीं तो किंवा त्याच्या बायका जाऊन राहतील तर चौलहून दंडा येथें पोंचविण्यास त्यांस गुप्त मदत करावी. बायका चौल येथें आल्यास तेथें ठेवून न घेतां दंडा येथें पोंचवून द्याव्या. दंडा येथील किल्ला जरी शहाजीनें आपल्या हवालीं केला, तरी देखील त्यांस चौल येथें आश्रय देऊं नये.'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूचि

अकबर–दक्षिण देशावर आक्रमण २३.

अफझलखान, विजापुरचा सरदार–दगेबाजीनें कस्तुरीरंगाचा वध ६४; शहाजीस बंदोबस्तानें विजापुरीं आणिलें ७१, संभाजीच्या मृत्यूस कारण ७८.

अलाउद्दीन खिलजी–१८,२३,५९.

अलाउद्दीन बहामनी,जाफरखान–१९.

आजमखान, मोगल सेनापति–४२, ४५, ४६, ५०.

आसफखान, शहाजहानचा सासरा–४२,४७,४८.

इब्राहिम आदिलशहा–२४,२६,३१, ३३,३४, मृ. ३९.

उदाराम, माहूरचा ब्राह्मण जागीरदार–२५,२८,३१,३४,३५.

उमाजी, शहाजीचा नातू, संभाजीपुत्र–८३.

उमाब्वा, मालोजीची वायको–२०.

एकोजी, शहाजीपुत्र–७२, ७७, तंजावर जिंकण्याचा उपक्रम ७९, ८०, वडिलांची उत्तर क्रिया ८१, बंगलोरची विक्री ८५.

औरंगजेब–ओलीस ३२, ५२, ५४, ५९, ६१, ७८, ७९, ८६.

कस्तुरीरंग, शिऱ्याचा नाइक–अफझलखानानें दग्यानें मारिला ६४.

कांतिराज नरस वोडियार श्रीरंगपट्टणचा ६४.

कान्होजी जेधे–३९, ४२, ४६, ५५, ५६, ७५.

केंग नायक–६३, ६८.

क्षेमासिंह–१८.

खवासखान–विजापुरचा वजीर–मृ.५१.

खळद बेलसरची लढाई–७३.

खानखानान, जहांगीरचा सरदार–२५.

खानजमान, महावतखानाचा पुत्र–४२, ४७, ५०.

खानजहान लोदी, मोगल सरदार–२८, चा बंडावा ४०–४४, मृ. ४५.

खान महंमद, विजापुरचा वजीर ७१, ७२, ७४, वध ७८.

खुस्रू, जहांगीरपुत्र–२९,३०.

गोपाळदास, शहाजहानचा विश्वासु सरदार–३८.

घोरपडे–घराण्याची उत्पत्ति १८, १९; भोसल्यांहून भिन्न चरित्रक्रम ५९, ६८.

चांदबिबी–२३.

चिक्कदेवराज वोडियार–८६.

जगदेवराव जाधव–४४, ४८.

जयराम पिंडे, राधामाधव–विलास–चंपूचा कर्ता ७९.

जयंतीबाई, जिजाबाईची वडील सून–३६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जयसिंह मिर्झा राजा–४६,५०.
जहांगीर–दक्षिणेंत आक्रमण २३,२५, नूरजहानचें वजन ३१, मृत्यु ३८,७९.
जाधव घराणें–१७,२०–२२,२६,२७.
जिजाबाई–बालपण २१, लग्न २२, सवत ३६, मोगलांकडे कैद ४८, ६०, नवऱ्याशीं भेट ६६,७५, योग्यता ८२, मृत्यु व परिवार ८३.
जिंजी–६३,६७, आदिलशहास प्राप्त ७१,७२.
तालिकोट–लढाई ६१.
तिरुमलनायक, मदुरेचा–६३.
तुकाबाई, मोहिते–शहाजीची बायको–३६,८३.
दत्ताजी जाधव–३०.
दर्याखान रोहिला–४०, ४२, ४४, मृ. ४५.
दादाजी कृष्ण लोहकरे–५६, ७५.
दादाजी कोंडदेव–पुणें वसविलें ५६, शिवाजीचें लग्न केलें ६६, शहाजीची भेट ६७.
दामलवार, श्रीरंगरायाचा सेनानी ६९.
दुर्गाबाई–जिजाबाईची जाऊ,शरीफजीची बायको–३६.
दुष्काळ दक्षिणेंत–४३, ४४.
नारो त्रिमल हणमंते–७७.
नूरजहान–शहाजहान विरुद्ध कारस्थानें ३१, ३७, ३८.
पर्वीज जहांगीरचा पुत्र–२५, ३१, ३२, मृ. ३७.
पुणे–विध्वंस ४६; वसती ५६, ५७.
प्रतापराव घोरपडे मुधोळकर–६८.
फत्तेखान, मलिकंबराचा पुत्र–निजामशाही वजीर ३७, कैद ३९, सुटका ४७, मूर्तजा निजामशहास ठार मारिलें ४७, बादशाही मनसब प्राप्त ४८.
बजाजी निंबाळकर–शुद्धि ८२.
बहलोलखान, विजापुरी सरदार–८१.
बाजी घोरपडे–शहाजीस पकडतो ७१, ७२.
बाबाजी काटे–२५, घराणें २७.
बाबाजी भोसले–१९.
बाळाजी हैबतराव, केंगनायकाचा भाऊ ६८, मृ. ७३.
भातवडीची लढाई–२२, ३२–३८.
भोसले–दक्षिणेंत आगमन १७, कुलाचा उगम १७, घोरपड्यांशीं संबंध १८, –चीं वतनें २०, जाधवांशीं वैर २१, २७,३०, घोरपड्यांहून भिन्न पंथ ५९.
मलिकंबर–चरित्र २४, जहांगीरशीं गनिमी काव्याचें युद्ध २५, रोशनगांवची लढाई २७, शहाजहानला शरण २८, खडकी शहर वसविलें २९, भातवडीची लढाई व तीन राज्यांवर मात ३२–३४; मृ. ३७.
महंमद आदिलशहा–३९, ४७, ४८, मुरार जगदेव व खवासखान यांचे वध ५१, कर्नाटक जिंकतो ६२,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुत्वशहाशीं तह ६७; शिवाजीचा शह ७१-७२, शहाजीस कैदमुक्त ७३; मृ. ७८.

महंमद तुघ्लक-१८.

महंमूद गावान-१९, घोरपड्यांचा गुरु ५९.

महादाजी निंबाळकर, शिवाजीचा जावई-८२.

महाबतखान, मोगल सेनापति-३१, ३७, ४४, ४७; दौलताबाद काबीज ४८, मृ. ५०.

मालोजी भोसले-२०-२५, मृत्यु ३०, ७९.

मावळ प्रांत-२३, ५८.

मीर जुम्ला-६७, ७०, ७७, ८६.

मुम्ताजमहल-मृ. ४४.

मुरादबक्ष, शहाजहानचा पुत्र-७३.

मुरार जगदेव-पुण्याचा विध्वंस ४६, तुला ४९,५०, मृ. ५१.

मुल्ला महंमद, विजापुरी सरदार-२६, भातवडीचे लढाईत मृ. ३२-३४.

मुस्ताफाखान, मुल्ला महंमदाचा जावई-२६, शहाजीशीं बेवनाव ६६,६८, शहाजीस कैद केलें ७०-७१; मृ. ७१.

मूर्तजा निजामशहा-४१, जाधवांचा वध ४४, लायकी ४६, खून ४७.

म्हालदारखान-२५,२६, जिजाबाईस पकडतो ४८,५२.

रणदुल्लाखान रुस्तुमिजमा,-४२,पुण्याचा विध्वंस ४६,५०,५१,५३,५५,६३, ६४,६५, मृ. ६६.

रायभानजी, शहाजीचा दासीपुत्र-८३, भीवजी, प्रतापजी व संताजी हे तिघे बंधु ८३.

रूपनायक-जिंजीचा-७२.

रोशनगांवची लढाई-२७.

लखूजी जाधवराव-२०, २१, जिजाबाईचें लग्न २२, मोगलांस सामील २५, जावयाशीं विरोध ३०, ३१, ३४,३९, निजामशहाकडून वध ४४.

विजयनगरचे राजवंश-६१-६२; शेवट ८७.

विजयराघव तंजावरचा-६३.

विठोजी भोसले-१९, आठ पुत्र २२.

वीरभद्र इक्केरीचा-६२, भद्राप्पाचा पुत्र ६३.

शरीफजी, मालोजीचा मुलगा-२०

शहर्यार, जहांगीरपुत्र, नूरजहानचा जावई-३१.

शहाजहान-दक्षिणेंत स्वाऱ्या २८, जुन्नर येथें अज्ञातवास ३१, खानजहान लोदीचा बंदोबस्त ४०; दक्षिणेंत स्वारी ४२, दुष्काळ ४३, शहाजीस मनसब दिली ४६, दक्षिणेंत दुसरी स्वारी ५२, निजामशाहीची वाटणी ५४, शहाजीशीं साम्य ५७-५८; ७९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शहाजी भोसले–जन्म २०, लग्न जिजाबाईशीं २२, सासऱ्याशीं विरोध ३०, भातवडीच्या लढाईंतला पराक्रम ३५, दुसरें लग्न तुकाबाईशीं ३६, आदिलशाहींत प्रवेश व सरलष्कर ३६–३७, पुणे प्रांत हस्तगत व निजामशाहींत पुनरागमन ३९; ४१, शहाजहानची तावेदारी ४५, पुण्याचा विध्वंस ४६, निजामशाहींत परत ४७, पेमगिरीवर निजामशाहीची उभारणी ४९, ५३; माहुलीवरील झगडा ५४, विजापुरास प्रयाण ५५; शहाजहानशीं साम्य ५७; शिवाजीला प्रोत्साहन ५९, ७५; कर्नाटकच्या स्वाऱ्या व वंगलोरास वास्तव्य ६३, ६५; हिंदूंना आश्रय ६५; घोरपड्यांचें वैर ६८; मुस्ताफाखानाशीं वैर व कैद ६९–७१; गौरवयुक्त सुटका ७३; उत्तरायुःक्रम ७७; तंजावर जिंकण्याचा प्रयत्न ७९; दुसऱ्यांदा कैद व सुटका ८१; मृत्यु ८१; परिवार ८२; चार दासीपुत्र ८३, योग्यता ८३–८५.

शहानवाजखान–२५.

शायिस्ताखान–४२,५२.

शिवाजी–शेवटचें अपत्य ३७, शिवापुरास गुप्त वास्तव्य ४८, लग्न, वंगलोरीं भेट ६६, विजापुरास भेट ६७, गर्भावस्थेंची शिकवण ६०,–चा आदिलशहास शह ७३; सोनोपंत डबिराचा सल्ला ७६,–चा राज्याभिषेक ८०; शहाजीशीं भेट ८०.

शिवाप्पानायक वेदनूरकर–वीरभद्राचा धाकटा भाऊ ६६,६७.

शुजा, शहाजहानचा पुत्र–५०

शेषाप्पा नाईक पुंडे–२१.

श्रीरंगराय–विजयनगरचा शेवटचा राजा ६२, ६७, ७४, ७७; शेवट ८६–८७.

सखूबाई, शिवाजीची कन्या–८२.

सजनसिंह, भोसल्यांचा पूर्वज–१८.

संभाजी कावजी कोंढाळकर, शिवाजीचा सरदार–७३.

संभाजी, शहाजीचा पुत्र–३६, वंगलोरचा बचाव ७२, ७७, मृ. ७८, ८३; पुत्र सुरतसिंह व उमाजी ८३.

सिंहगड–शिवाजीकडून आदिलशहानें परत घेतला ७५–७६.

सुरतसिंह, शहाजीचा नातू, संभाजी-पुत्र–८३.

सोनोपंत डबीर–७५,७६.

हुसेन निजामशहा–४७.

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठी रियासत

लेखक : गो. स. सरदेसाई, बी. ए.

		मूल्य
१	शहाजी राजे भोसले	·॥·
२	शककर्ता शिवाजी	१॥
३	उग्रप्रकृति संभाजी	·॥·
४	स्थिरबुद्धि राजाराम	·॥।
५	पुण्यश्लोक शाहू	
	१ पेशवा बाळाजी विश्वनाथ	१
	२ पेशवा बाजीराव	२॥
	३ पेशवा बाळाजीराव : १	२

रियासतकारांच्या गेल्या ४० वर्षांच्या परिश्रमाचें, व्यासंगाचें आणि संशोधनाचें हें फल आहे. मराठी रियासतीचें संकलित कार्य त्यांनीं १९३२ सच पूर्ण केलें, पण मध्यंतरींच्या काळांत मराठ्यांच्या इतिहासाचीं पुष्कळच नवीन साधनें उपलब्ध झालीं त्यामुळें हा प्रचंड ग्रंथ पुन्हा सुधारून लिहिण्याची आवश्यकता वाटूं लागली. आजतागायत उपलब्ध असलेल्या सर्व साधनांचा उपयोग करून सुधारून वाढविलेली रियासतीची ही नवीन आवृत्ति प्रसिद्ध करण्यांत येत आहे. मराठ्यांचा स्फूर्तिप्रद नवसंशोधित इतिहास आपल्या संग्रहीं असावा असें कोणत्या महाराष्ट्रीयास वाटणार नाहीं ? इतिहासाच्या अभ्यासूंसही हा ग्रंथ उपयुक्त व्हावा म्हणून भरपूर टीपा, मूळ कागदपत्रांतील उतारे आणि सविस्तर सूचि प्रत्येक विभागांत दिली आहे. रियासतकारांच्या परिश्रमांचें चीज प्रत्येक 'मराठ्या'नें केलें पाहिजे.

केशव भिकाजी ढवळे, मुंबई ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar